Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष [५२] आकोला--सोमवार तारीख ४ माहे फेब्रुवारी सन १९१८ ई० [अंक ५

सर्व औषधांचा राजा.

## अमृतबहार.

(२०० रोगांवर चालणारें एकच औषध)

सदर्हू औषध घरांत असल्यास कोणत्या ही प्रकारें इतर औषधाची जरूर पडत नाहीं. खरूज, गजकर्ण, खोकला, ताप, महामारी, प्लेग, गरमी, परमा, डोकेंदुखणें, पोटदुखणें, दाढदुखणें, दमा, थंडी, हॉंब वगैरे वर मूल्य १ बाटलीस रुपये २ अर्धाशिशी कान ठणकणें वगैरे सर्व प्रकारचे २०० रोगावर आणि रामबाण आहे. ट. ख. निराळा. जागोजागीं एजंट पाहिजेत.

पत्ता

भाई रामसिंग ॲन्ड सन्स मॅनेजर

अमृत बहार कंपनी सुभाबाद

जिल्हा मुलतान (पंजाब)

नो. नं. २०

## लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कामिशनचे (अडतीचे) काम चालत असून आह्मी येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचे सामान** वैगरे वगैरे सर्व प्रकारच माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठावितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, स्पांपस् वगैरे तेल पुरावितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. २१

शक्तिदायक; रामबाण युनानी इलाज.

संजीवनी पाक.



यांत प्रवाळ. मौक्तिक शीलाजतु, कस्तुरी अंबर इत्यादि अमोल औषधें वापरलीं आहेत. प्रमेह, धातुक्षीणता, अग्निमांद्य इ० रोगांवर वस्ताद २० तोळ्यास १ रु. ट. ख. नि.

असंख्य सार्टीफिकेटें व पदकें प्राप्त!

संजीवनी दवाखाना नांदुरा-निमगांव (वऱ्हाड)

नो० नं० ३६

### नोटीस

विद्यमान सेकंड सबजज्ज साहेब कोर्ट अकोला

यांजकडून:—

कि० मु० नं० ४ सन १९१८

चौ० ता० २३-२-१८

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, आमचे कोर्टांत अर्जदार पुर्णाई मर्द विठु कुणबी रा. सोनोरी ता. मुर्तिजापूर इनें ता. १८-१-१८ रोजीं कि. मु. नं. ४ सन १८ चा अर्ज मयत विठू वा परहाजी कुणबी रा. सोनोरी याच्या इस्टेटीसंबंधानें सक्सेशन सर्टिफिकीट मिळणें करितां केला आहे. तरी सदर्हू संबंधानें कोणाची तक्रार असल्यास ता. २३-२-१८ रोजीं कोर्टांत येऊन जबाब द्यावा. याप्रमाणें न केल्यास कोणाची तक्रार नाहीं असें समजून अर्जदार इच्या अर्जाचा विचार करून सर्टिफिकीट देण्यांत येईल कळावें. ता. ३०-१-१८

सही

अकोला ३०-१-१९१८ } S. N, Trivedi सेकंड सबजज्ज अकोला

नो० नं० ५३

### NOTICE.

Tenders are invited for the supply of the undermentioned grain to the Nagpur Central Jail for the year 1918. Sealed samples with the prices and conditions, percentage of refractions &c. clearly stated should be submitted to the Superintendent not later than 10 A. M. on the date mentioned below. Contractors are also requested to be present at the Jail gate at 10 A. M. on that day to bid for the Contract

Jawari,.........6000 Maund-14 th February 1918.

Toor. ......... 2000 Maunds-7th March 1918.

Jagni......... 500 Maunds-14 th February 1918,

Dated Nagpur, the 29 th January 1918,

Sd. E. E. Thomas,
Superintendent, Central Jail
Nagpur,

N. N. 44

### जाहिर नोटीस

विद्यमान सेकंड सबजज्ज साहेब अकोला

यांजकडून:—

कि. मु. नं. ११ सन १७

चौ. ता. १६।२।१८

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, आमचे कोर्टांत अर्जदार राधाबाई जवजे गुलजारगीरजी गोसावी रा. उगव ता. अकोला इनें ता. २८-११-१७ रोजीं कि. मु. नं. ११ सन १७ चा अर्ज मयत शिवचरणगीर गुरु रामगीर गोसावी रा. उगवा याच्या इस्टेटीसंबंधानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळणें करितां केला आहे. तरी सदर्हू संबंधानें कोणाची तक्रार असल्यास ता. १६-२-१८ रोजीं कोर्टांत येऊन जबाब द्यावा. याप्रमाणें न केल्यास कोणाची तक्रार नाहीं असें समजून अर्जदार इच्या अर्जाचा विचार करून सर्टिफिकेट देण्यांत येईल कळावें. ता. ३०-१-१८

सही

अकोला ३०-१-१८ } S. N, Trivedi सेकंड सबजज्ज अकोला

नो. नं. ५५

### जाहिर नोटीस

खालीं सही करणार याजकडून या नोटिशीनें सर्वत्र लोकांस असे कळविण्यांत येत आहे कीं माझी भावजय नामे जयनबी मर्द कालेखा व तिचे वडील वजीरखा वा बिसमिल्लाखा यांचे जवळून माझे इस्टेटी पैकीं शेतें व घरें कोणीही, खरेदी, गहाण, बटाईनें अगर पट्यानें वगैरे कोणतेही रितीनें घेऊं नये. घेतल्यास घेणार व देणारा दोघेही जबाबदार राहतील व त्याचप्रमाणें माझे भावजईस अगर तिचे वडीलास कोणीही कर्ज वगैरे देऊं नये दिल्यास त्याबद्दल मी कोणतेही प्रकारें जबाबदार राहणार नाहीं कळावे. अकोला तारीख २९-१-१९१८ इ.

सही

इसबखा वा लालखा रा० आकोला

दस्तुर खुद

नो. नं. ३६

### नोटीस

जयनबी मर्द कालेखा रा. आकोला.

इस:—

१ खालीं सही करणार याजकडून तारीख ७-१-१८ चे नोटिशीस जबाब देण्यांत येत आहे कीं, तमचे नवऱ्यानें तुह्मांस पंचासमक्ष जग्र समयीं जो मेहेर कबूल केला होता, तो त्याचे मरणानंतर पंचासमक्ष तुह्मी माफ केला होता. शिवाय तुह्मांस तुमच्या नवऱ्यानें दोन वर्षे पावेतों टाकून दिलें होतें त्यावेळीं तुमचे वडील वजीरखा वा बिसमिल्लाखां व तुमची आई अमीरबी व तुह्मी स्वतः असे तिघांनीं मिळून मे. काजी मिरजा रहिमानबेग बेंच म्याजिस्ट्रेट यांच्या समक्ष फारकती मागितली होती, त्या वेळेस तुह्मी महमदी शास्त्राप्रमाणें निक्याच्या बाहेर गेला सबब तुह्मास मेहेर मागण्याचा कांहीं एक हक्क राहिला नाहीं.

२ तुह्मी आपले नोटिशींत लिहिलेली शेतें आह्मा दोघा भावांची समाईक होती. तिची कोणतेही प्रकारें वाटणी झाली नव्हती. व मी सर्व कुटुंबाचा कर्ता पुरुष आहे व त्याप्रमाणें त्या सर्व शेतांची खातीं मे. तहसिलदार साहेब आकोला यांनीं कालेखांचे मरणानंतर माझे नावें लाविलीं आहेत. तुमचे वडील वजीरखां वा बिसमिल्लाखा हे माझे नावें खातीं बदलण्याचे वेळेस तुमच्या बद्दल " मी माझे मुलीचा वडील व मुखत्यार ह्मणून " हजर राहून तुमच्या बद्दल, मे. तहसीलदार साहेब यांचेकडेस तक्रार केली तेव्हा तुमचे साठीं एक ५ तिफणीचे शेत तुमचे अन्न वस्त्राबद्दल दिले आहे व त्यास तुमचे वडील व मुखत्यार या नात्यानें त्यांनीं कबूल केलें व कदाचीत पुढेमागें मी बदलून जाईन या दहशतीनें त्यानें एक करारनामा लिहून घेऊन तो मे. सबरजीस्टर साहेब यांचे कचेरींत नोंदून घेतला.

३ कालेखाचे लग्नाचे वेळेस मी तुमचे अंगावर सुमारें ५०० पांचशे रुपयाचे दागिनें घातले होते ते सध्या तुमचे जवळ आहेत, व जोपर्यंत आपण पुन्हा निका लावणार नाहीं तोंपर्यंत ते आपले जवळ राहतील. परंतु आपण निका लावल्यास ते दागिने आह्मांस परत करावे, तसें न केल्यास आपले वडील व मुखत्यार वजिरखां वा बिसमील्लाखां यांचे जवळून घेतले जातील. त्यांनीं न दिल्यास दिवाणींत दावा करून घेऊं. आपणास उलट ह्या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं आमची शेतें, व घरें याजवर आपला कोणतेही प्रकारें हक्क नाहीं व तसा हक्क आपणास करणें असेल तर दिवाणी व फौजदारी ही दोन्हीही कोर्टें आपणास मोकळीं आहेत कळावें आकोला तारीख २९-१-१९१८ इ.

सही

इसबखां वा लालखां द. खु.

नो. नं. ५७

### नोटीस

नोटीस बेशमी सखाराम वा तेजमल मारवाडी रा. कानसनी ता. आकोला. यासी खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यात येते कीं मी तुह्माला ता. ११-२-१६ रोजी रकम ४०० रुपयाचे गहाणखत रजीष्टर करून दिले. त्यापैकीं मजला रोख १५० रुपये दिले व बाकीचे २५० रुपयाचा मौलादीन कचो दु. आकोला याचा तुह्मी हवाला लावून घेतला. व तुह्मी मजला असे ह्मटले जर मौलादीनचे रुपये २५० चे वर निघतील तर मी कोठून देऊ. तर मौलादिनचे जास्त रुपये निघतील ह्मणून भी आपला जंगम माल मौलादिनचे रुपये तोडण्यासाठी दिला तो!

नथा २ एक तुऱ्याची व एक साधी अं. रुपये ५० बाळ्या सोन्याच्या वजन मासे ६ आ. रुपये १२ चांदीचेकडे, कोपरवाळ्या, करदोडा, साखळ्या कंठ्या एक हसली एकंदर वजन तोळे ७० अं. किंमत रुपये ७० व परशराम वा गोम्या कुंभार

भांबोर यास जोडी विकली त्यापैकी पें ९० चा हवाला तुह्मी लावून घेतला रुपये ९० व गणपत वा वाजी रा. दोनद याचे मोहोती- करितां पुंजाजी वा चिंतामण कुणबी रा. नद यासी रुपये २९ दिले होते तर त्याचा हवाला तुह्मी लावून घेतला त्याज ळ रुपये २९ एकूण रुपये ०७ इतक्या रुपयाचा माल व कांहीं ाला असे एकंदर मी तुह्मास देऊन ा गोष्टीला आज सरासरी दोन वर्षे ाली. तरी गहाणाचा दस्तैवज सोडवून तला नाहीं. त्यानंतर आतां सरासरी णजे दिपवाळी सन १९१७ ची झाल्या- तर पुन्हा मौलादीन रुपये तोडण्याचे ांगून मजजवळून जंगम माल नेला तो:– ापूस मण १६ दर मणीं रु० ९ प्रमाणें ४४, जवारी खंडी १ दरखंडी १२९ रु. माणें १२९ व पूर्वीचे नेलेला माल ागीने व हवाल्याबद्दल रु. २७० एकंदर ७६ रुपयाचा माल तुह्मी घेऊन गेला री अद्यापि तुह्मी मौलादीनचे गहाण सोड- न घेतले नाहीं. करितां तुह्मांला या ोटिशीनें कळवितो कीं ही नोटीस पावल्या- ासून आठ दिवसाचे आंत मौलदीन चे ठाणखत सोडवून घेऊन माझा नेलेला ंगम माल दागिने व कपाशी व जवारी गेरे हवाल्याचे रुपयाचा निकाल करून ाकावा. त्याप्रमाणें तुह्मी न केल्यास व ा नोटिशीचा जबाब न दिल्यास मी ुमचेवर रितीप्रमाणें तजवीज करीन. मग ापुढें कोणतीच तक्रार ऐकली जाणार ाहीं. व सन १९१६ चे फेब्रुवारी महि- ापासून गहाणाच्या मौलदीनचे रकमेस व्याज ह्मास द्यावे लागेल. कारण मी त्याचवेळेस मचेजवळ दागिने वगैरे मोडण्यासाठीं आणून दिले आहेत व रकमेचे हवाले दिले ाहेत सबब तक्रार केल्यास मजला कबूल ाहीं. ही नोटिस दिली. ता. २९-१-१८ ० दस्तुर देविदास जैराम पी. रा. अकोला

सही

दत्तु वा इश्राम पा० द० खुद राहणार भांबोर पोष्ट कानसनी

नों० नं० ५८

---

## नोटीस.

परशराम रायसिंग जाणोरकार राहणार ोडग पोष्ट पिंजर ता० व जि० आकोला

यांस:—

खालीं सही करणार जनी मर्द परशराम ंजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी ुमची लग्नाची बायको आहे, तुह्मी मला पांच वर्षांपासून टाकून दिल्यामुळें मला शिवराम वा गोविंद तायडे रा. शेळवाडी ा माझा मामा आहे. याचे घरीं राहणें ाग पडलें. माझ्या वागण्याबद्दल ह्मणजे ान्नवस्त्राबद्दल मामाला येथच्या लोकांचे कर्ज ााले आहे. आता त्याची इच्छा मला ागाविण्याची नाहीं. व आपण ही मला ेत नाहीं. व नीट रितीनें वागवित नाहीं री असें न, करितां तुह्मी मला घेऊन ाावे. व माझे ५ पांच वर्षांचा खावटीचा ्चे दरमहा रुपये ५ प्रमाणें रुपये ३०० पाठवून द्यावा व तुह्मी मला स्वतः नेण्या- करिता न आला तर वरील रुपये ३०० व माझे येण्याचे भाडे ही नोटीस तुह्मास मिळाल्यापासून १५ पंधरा दिवसाचे आंत पाठवावें या प्रमाणें तुह्मी न केल्यास तुमचा माझे वरील असलेला "नवरेपणाचा हक नष्ट होईल" व मी दुसरा नवरा करण्यास मुखत्यार आहे असें समजावे. व मी कोणते ही प्रकारें जबाबदार नाहीं. हे यापुढें समजावे. ही नोटीस दिली. ता. २३।१।१८ इ० दस्तुर हरी रावजी चोभे आटर्नी रा० आकोला

सही

जनी मर्द परशराम जाणोरकार हल्लीं मु० आकोला हिचे डावे हातचा आंगठा असे.

नो० नं०५९

---

## जाहीर नोटीस

खालीं सही करणार यांजकडून जाहीर नोटीस देण्यांत येते कीं, आह्मी गोविंदा हरजी मुंढे रा. सावरगांव प्रगणे लोणार ता. मेहेकर जि. बुलठाणा यांस ता. ३-४-१७ रोजीं कुलमुखत्यारपत्र लिहून देऊन रजिष्टर करून दिलें. परंतु त्याची वर्तणुक चागली नसल्यावरून आह्मी तें कुलमुखत्यार- पत्र आज तारखेपासून रद्द केलें आहे. तरी आमचे दुकानसंबंधानें कोणी त्याचेशीं व्यवहार करूं नये. केल्यास तो रद्द समजला जाईल कळावें. ता. २१ १-१८ इ.

सही

हरी वा कमळुजी नागेर रा. ब्राह्मण सोइंदेव ता. मेहेकर नि. आंगठा

नो० नं० ६०

---

## नोटीस

नोटीस बेशमी मारुती वा विठोबा शेळके कुणबी राहणार असोला जहागीर ता. मेहेकर जि० बुलडाणा पोष्ट देऊळगांव राजा

यांस:—

खालीं सही करणार यांचेकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मी बिरादर असून तुमची आमची जागा समाईक आहे. त्या जागेचा तपशील येणें प्रमाणें:—

पूर्वेस नामदेव ह्याचा वाडा पश्चिमेस रस्ता व गढी दक्षिणेस भवानजीची जागा उत्तरेस गांव कोस या चतुःसिमेच्या आंतील जागा लांब हात ५० रुंद हात ३२ आहे. ह्या जागेत माझा निमे हिस्सा असून तुह्मी मला माझे हिश्याची जागा वाटून देत नाहीं. ह्यासाठीं नोटिस देणें भाग झालें. तरी नोटिस पावतांच आमची जागा आह्मांस वाटून देणें नाहींपेक्षां तुम- चेबद्दल कायदेशीर बंदोबस्त करून खर्चा- सुद्धां रकम व जागा भरून घेतली जाईल. कळावें. ता० १६-१ १९१८

सही

बापू वा सदाशिव शेळके कुणबी राहणार मौजे असोले जहागीर ता. मेहेकर जि. बुलडाणा पो. देऊळगांवराजा याचा आं.

नो० नं०६१

---

## नोटीस

नोटिस बेशमी धनजी कानजी भाटे दुकान खामगांव तालुके मजकूर

यासी:—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे आमचे सराकतींत सन १९१५-१६ व १९१६-१७ या दोन सालांत उभयतांनीं कपाशी रुई सरकी व अळशी हाजर व वायद्याचा व्यापार केला. त्यांत बराचसा नफा आहे. शिवाय तालुके जळगांव ( वऱ्हाड ) येथें ही वरप्रमाणें कपा- शी रुईचा व्यापार केला त्यांत ही नफा आहे. तर आह्मी बरेचवेळां हिशेब मागितला असतां हिशोब देत नाहीं व वहिखाते ही दाखवित नाहीं. करितां ही नोटिस पावले- पासून ८ दिवसाचे आंत हिशोब दाखवून आमचे हिश्याचे रुपये द्यावे. तसें न केल्यास आह्मी आमचे हिशोबाचे रुपयाबद्दल तुमचेवर दिवाणी कोर्टांत दावा करूं. पुढें याजबद्दल तुमची कोणती ही तक्रार ऐकली जाणार नाहीं. करितां आगाऊ या नोटिशीनें सुचविलें आहे ही नोटिस दिली. सही ता. २९-१-१९१८ इ०

सही

ठाकुरदास माणिकलाल द० खु०
ठि. मलालपुरा खामगांव

नो० नं० ६२

---

## नोटीस

.. रा० गोविंदा सिताराम भांडग रा. खामगांव यासी नोटीस देणार भाऊ रावजी कुळकर्णी रा० जनुने ता० खामगांव नोटीस देतो ऐसाजेकीं मौजे जनुने ता० खामगांव येथील शेत सर्वे नंबर २०५ पैकीं २ एकरगुंठे आकार रुपये पांचील अर्धा हिसा दक्षिणे कडील बाजूचा हा हिसा रावजी वा। चहादाजी कुणबी पाटील रा० परखेड यानें शेवंती मर्द मारुती जीरेमाळी रा० जळके प्र० पिंपळगांवराजा इंजपासून रु ७०० सातशें मध्यें विकत घेतलें. होते सदरहु शेतासंबधानें रा० गणपत जानु काळे रा. जनुनें यानें मालकी संबधानें ता. खामगांव येथें वि० मुनसबसाहेब यांचे कोर्टांत दि. मु. नंबर ३९२–१२ चा दावा केला त्याचा फैसला रा० गणपत तर्फे झाला. सदरहु दाव्यांत रावजी वा। चहादाजी हा प्र० नंबर २ चा होता. यानें वि. अॅ. डी. जज्ज कोर्ट आकोला यांचे फैसलावर अपील केले होते ते अपील नागपुरास करून त्याचाही निकाल विरुद्ध गणपत वा। जाणु काळे यांचे तर्फे आकोला कोर्टांत झाला. त्यांत ह्मणजे मलाही अपीलांत विरुद्ध पक्ष- कार केलें होते. सदरहु शेता संबंधीं माल- की गणपत वा। जानुकाळे याची झाल्या- वर मी तें शेत त्याजपासून सन १९१४ त विकत घेतले व तेव्हांपासून मालकीच्या नात्यानें शेत माझ्या ताब्यांत आहे त्यामुळें रावजी वा। चहादाजी पारखेडकर याचा कांहींएक मालकीचा हक सदरहु शेतावर नसतां व शेत त्याचे ताब्यांत नसतां तुह्मी ते शेत प्रथम लक्ष्मण माधव चरडके जनुने याचे पासून गहाणखत ट्रॅन्सफर करून घेत- ले व पुन्हा तेंच शेत तारीख १ माहे आगष्ट सन १९१७ इ. रोजी गहाणखत रु० ४०० चारशे मध्यें शेत सर्वे नंबर २०५ पैकीं २ जनुने व पारखेडचें धावे असे गहाण घेतले. सदरहु व्यवहाराची पूर्ण हकीकत तुह्मास प्रथम पासून माहित असून तुह्मी हा व्यवहार तंटा उपजविण्याकरितां केला आहे. तरी नोटीस पावले पासून अठ दिवसांत सदरहु जनुने येथील शेत सर्वे नंबर २०५ पैकी २ चा गहाणाचा हक सोडला ह्मणून कळवावे. असें न केल्यास मजला सदरहु बद्दल ज्या कोर्टांतुन योग्य- न्याय मिळेल त्या कोर्टांतून तजवीज करावी लागेल व त्याजबद्दलचा होणारा खर्च व नोटीस खर्चास तुह्मास जबाबदार धरले जाईल. सदरहु नोटीस वापस केली तर ती तुह्मास मिळाली असें समजले जाईल. करितां तुह्मास नोटिसीनें कळविले आहे. ही नोटि- स दिली सही तारीख २९ माहे जाने- वारी सन १९१८ इ. सही.

भाऊरावजी पांडे जनुनेकर द. खु.

नो. नं. ६३

---

## नोटीस

नोटीस बेशमी गोविंदा वा। हरजी मुंढे जात वंजारी रा. मौजे सावरगांव प्र. लो- णार ता० मेहेकर जिल्हे बुलडाणें

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं आमचे दुकानची देव घेव करण्यासंबंधानें तुह्मास कुलमुखत्यार पत्र करून देऊन तें लोणार येथील सबरजि स्ट्रारचे कचेरींत ता. ३ माहे एप्रील सन १९१७ इसवी रोजीं बुक नंबर ४ अ. नंबर ७ सन १९१७ इ॥ रोजीं रजिस्ट्रार झाले परंतु तुमची चाल चलणुक चांगली नसले मुळे व तुह्मी आमचेच आसाम्यास उल्टा फंद फितुर देऊन तुह्मी त्यांचे पासून वसूलाही दोन च्यार आसाम्याची केली व तुह्मी रुपयेही घरीच घेऊन बसलांत असे आमचे नजरेस आलवरुन मुदाम या नोटीसीनें तुमचे कुलमुखत्यार पत्र रद्द केले आहे. तरी आज तारखे पासून तुह्मी आमचे तुमचे जवळ आलेला वसूल दिला नाहीं. ह्या करीतां तुमचेवर फौजदारीकरीत आहे आसाम्याचा कांहींच वसूली घेऊन पावती देऊ नये. कारण आज तारखे पासुन तुह्मास दिलेला कुलमुखत्यारपत्र रद्द केले आहे. कळावे ता. २१ माहे जानेवारी सन १९१८ इ. सही

१ हरी वा। कमळुजी नागेर वंजारी
रा. मौजे सोईदेव प्र. मलकापूर
नो. नं. ६४ पांगर नि० आंगठा

---

## पत्रव्यवहार

**माळी-शिक्षण** परिषदेची ८ वी बैठक नांदुरा ( जी. आय. पी. ) जि. बुलढाणा वऱ्हाड येथें तारीख ३०।३१ मार्च रोज शनिवार, रविवार, सन १९१८ रोजीं भरविण्याचे निश्चीत केलें आहे. तरी ज्यांना स्वयंसेवक होऊन सभेची मंगल सेवा करावयाची असेल, त्यांनीं आपली नांवें लवकर सेक्रेटरीचे पत्त्यावर कळविण्याची कृपा करावी. कळावें.

सेक्रेटरी स्वा. मं.

१ नागो कृष्णाजी भोपळे
१ संपत मारुती चोपडे
१ मारुती गणपत सातव

वऱ्हाडसमाचार

पौष वद्य ८ पिंगल संवत्सर १८३९

## इतिहास काय सांगतो?

दुनियेंत सर्वत्र व सर्वकाळीं एक अबाधित तत्त्व आढळून येतें आणि तें हें कीं देशाची भौतिक उन्नति त्या देशांतल्या लोकांची बुद्धि, विद्या, चारित्र्य आणि उद्योग या चार गोष्टींवर सर्वथा अवलंबून असते. परंतु स्वातंत्र्य, चांगली राज्यपद्धति, व राष्ट्रांतल्या लोकांचें ऐक्य नसलें तर चारी गोष्टी पंगु ठरतात.

राष्ट्राचें चारित्र्य ह्मणजे त्यांतल्या लोकांचें शील. यावर राष्ट्राची शक्ति अवलंबून असते, आणि तें उन्नत किंवा अवनत करणें हें राज्यपद्धतीच्या हातीं असतें. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे राष्ट्रांत शील संपन्नता व धनसंपन्नता कां नांदतांना दिसते? तर तेथील लोक स्वतंत्र आहेत, दुसऱ्याचे गुलाम नाहींत, त्यांच्यांतले स्वाभिमानादि उच्च गुण परवशतेच्या भाराखालीं दडपले गेले नाहींत. लाथ मारीन तेथें पाणी काढीन, माझ्या कर्तृत्वाच्या आड कोण येणार आहे? अशी भावना तेथील रहिवाशाच्या रोमीं रोमीं इतकी खिळलेली आहे कीं परवश असणारीं माणसें माणसेंच नव्हेत असें ह्मणण्यास ते भीत नाहींत. स्वातंत्र्यहीन राष्ट्र केव्हां ही नुसत्या चारित्र्याच्या प्रभावानें समृद्ध झालेलें किंवा उन्नतीला पोंचलेलें दिसावयाचें नाहीं. बौद्धकाळापर्यंत हिंदुस्थानच्या लोकांच्याठायीं जें तेज चमकत होतें तें मुसलमान काळांत थोडें बहुत नष्ट झालें, आणि इंग्रजी अमदानींत तर त्याचा पूर्ण लोप झाला, याला परवशतेशिवाय दुसरें कारण काय देतां येईल? दुसरें देईल तें व तितकेंच खाऊन ज्याला राहावें लागतें त्याच्या अंगीं धाडस, स्वावलंबन, आत्मशक्तीचा प्रत्यय इ० गुण राहणेंच शक्य नाहीं, आणि ह्मणूनच हिंदुस्थानावर परक्यांचा अमल सुरू होतांच आमच्यांतले हे गुण सपाट्यानें नाहींसे होत चालले, आणि अर्थातच आमचा व्यापार, नौकानयन, लष्करीपेशा इ० व्यवसाय दुसऱ्याचे हातीं जाऊन हळूं हळूं आह्मी त्या कामांना नालायक होत गेलों. ग्रीक राष्ट्र स्वतंत्र होतें तेव्हां त्यांतलीं छोटीं छोटीं संस्थानेंही त्यांच्या आरमारी शक्तीबद्दल प्रसिद्ध होतीं; पण तें स्वातंत्र्य लुप्त होतांच समुद्रावरचें त्यांचें आधिपत्य ही लोप पावलें. मासिडोनिया, स्पेन हॉलंड, इ० देशांचा इतिहास, कंठरवानें हेंच सांगत आला आहे. अगदीं ताजें उदाहरण ह्मणजे अमेरिकेचें आहे. अमेरिका जोंपर्यंत ब्रिटिश अमलाखालीं होती तोंपर्यंत त्या लोकांच्या अंगचे गुण कोठें प्रकट झालेले दिसले? या सर्वसामान्य नियमाला हिंदुस्थानच तेवढा अपवाद कसा असेल. हिंदुस्थानच्या लोकांच्या अंगीं चारित्र्य नाहीं, कर्तृत्वशक्ति नाहीं, उत्साह नाहीं, धमक नाहीं, इ० नन्नाचा पाढा वाचून आह्मी स्वराज्यास अपात्र आहों असें ठरविणाऱ्या लॉर्ड सिडेनह्याम सारखे इंग्रज व त्यांची पाठ थोपटणारीं पायोनियर सारखीं इंग्रजी पत्रें यांनीं या दृष्टीनें जगाच्या इतिहासाचें शांतपणें पर्यालोचन केलें आणि त्या बरोबर आत्मसंशोधन ही केलें ह्मणजे त्यांना असें दिसून येईल कीं हिंदुस्थानाला अशा रीतीनें निःसत्त्व करून टाकण्याचें पाप हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हरण करणाऱ्या व हिंदी लोकांना तेथें जेथें 'खबरदार पुढें पाऊल टाकलें तर! तुमची हद्द येथपर्यंतच' असें ह्मणणाऱ्या विचित्र राज्य पद्धतीनेंच केलें आहे. राज्यकारभारांतल्या उच्चदर्जाच्या जागा युरोपियनांकरितां राखून ठेवावयाच्या; हिंदी लोकांना लष्करांत कमिशनें द्यावयाचीं नाहींत, त्यांना हत्यारें धारण करूं द्यावयाचीं नाहींत, असे एकामागून एक निर्बंध करून आह्मां लोकांच्या अंगचा जोम नाहींसा करून टाकल्यावर पुनः 'तुह्मी स्वराज्यास अपात्र आहां' असें ह्मणणें ह्मणजे दुःखावर डागण्या देण्यासारखें निष्ठुरपणाचें कृत्य कां वाटूं नये? परमेश्वरेच्छेनें आमचा देश इंग्रज सरकारचे हातीं गेला आहे, त्यापूर्वी त्याच इच्छेनें तो मुसलमानांच्या ही हातांत गेला होता. पण मुसलमान राज्यकर्त्यांनीं इतके कडक निर्बंध कधींच घातले नाहींत. त्यांच्या अमदानींत आमचे लोकांना मुख्य प्रधानाच्या व सेनापतींच्या जागा मिळत गेल्या. मुसलमान बादशहांनीं आमच्या लोकांवर विश्वास टाकला, तसें आमच्या लोकांनीं ही त्या विश्वासाचें चीज करून दाखविलें. मुसलमान बादशहाच्या सिंहासनाचे मुख्य आधारस्तंभ कोण होते? राजा तोडरमल, बिरबल, जयसिंग वगैरे हिंदी लोकचना? त्या बादशाहाच्या अवनत स्थितींत देखील मुसलमानी तक्ताविषयीं हिंदूंच्या ठायीं किती पूज्यभाव होता हें सुरबकट भाटानें भाऊ साहेबास तें तक्त न फोडण्याविषयीं अत्यंत कळकळीनें आग्रह केला यावरून दिसत नाहीं काय? इंग्रज सरकारनें विद्यादानाच्या बाबतींत तेवढी मुसलमानावर सरशी केली, पण इतर सर्व बाबतींत निर्बंध घालून इतकें जखडून टाकिलें कीं आह्मां लोकांना आपलें कर्तृत्व प्रकट करण्यास वावच ठेविला नाहीं. त्यांनीं जर ब्रिटिश नागरिकाना अत्यंत प्रिय असें स्वातंत्र्य व ब्रिटिशनागरिकांचेच हक्क दिले असते तर आज ब्रिटनची जी सर्व तऱ्हेनें भौतिक उन्नति झालेली दिसते तशी आमची झाली नसती काय? त्यांच्यासारखेच बुद्धिमान् शास्त्रीय शोधक, लेखक, मुत्सद्दी, कारागिर, धाडसी नावाडी, निधडे छातीचे सैनिक व करोडपति धनिक व्यापारी आमच्यांत निर्माण होऊन ब्रिटिश साम्राज्याला केवढें बळकटी आली असती? पण ब्रिटिश मुत्सद्यांनी इतिहासाच्या शिकवणीकडे दुर्लक्ष करून आकुंचित दृष्टि ठेविली, दूरच्या परिणामाकडे उदार दृष्टीनें न पाहतां सद्यःफलदायी स्वार्थदृष्टि ठेवली तिचा परिणाम आज हिंदुस्थानांत सर्वत्र दिसत असलेल्या हा आहे. परमेश्वरानें हिंदुस्थान देश ब्रिटिश सरकारापाशीं विश्वासनिधि ह्मणून ठेविलेला आहे ही गोष्ट शहाणे ब्रिटिश मुत्सद्दी कबूल करीत आले आहेत. हिंदुस्थानाला त्याचे जन्मसिद्ध हक्क न देतां त्याची आजपर्यंत होत आली आहे तशीच वंचना पुढें होत राहिली तर ईश्वरदत्त विश्वासनिधीची आह्मी योग्य ती काळजी घेतली व योग्यकाळीं व योग्यप्रकारें त्याची वाढ केली असें ब्रिटिश मुत्सद्यास कोणत्या तोंडानें ह्मणतां येईल? ब्रिटिश लोकांवरची ही जबाबदारी येथील अधिकारीवर्गाच्या अधिकारलालसेनें दृष्टिआड झाली आहे व ती त्यांच्या नजरेस आणून देणाऱ्या ब्रिटिश-साम्राज्याच्या हितचिंतकांना हा अधिकारी वर्ग उपद्रव्यापी चळवळे असें नामाभिधान देऊन ब्रिटिश लोकांच्या दृष्टीला त्यांचे संबंधानें कलुषित करूं पाहत आहे हें ब्रिटिश लोकांच्या ध्यानांत येऊनच कीं काय त्यांनीं खरी स्थिति आपल्या डोळ्यांनीं पाहून येण्यासाठीं मि. मांटेग्यु यांना इकडेस पाठविलें आहे. पण या अधिकारीवर्गानें युक्तीनें त्यांच्या दृष्टीआड पडदा करून तो हेतु बहुतांशीं निष्फळ केला आहे. असें जरीं आहे, तरी प्रमुख हिंदी पुढाऱ्यांशीं त्यांच्या झालेल्या मुलाखतीवरून सद्यःस्थितीचें अंधुक चित्र तरी मि. मांटेग्यु यांच्या दृष्टीस पडलें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तेव्हां इतिहासाची आतांपर्यंतची शिकवण आणि हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें पुढें ठरविण्यांत येणारें धोरण यांच्यांत छत्तीसाचा आंकडा ते पडूं देणार नाहींत अशी अजूनही उमेद आहे.

---

## मितव्यय राखण्याविषयीं उपदेश.

नुकतेंच मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंगडन यांनीं सध्याच्या महागाईचा बंदोबस्त करण्याच्या प्रश्नासंबंधानें विचार करण्यासाठीं मुंबईतल्या ठळक ठळक नागरिकांची सभा बोलाविली होती. या सभेपुढें भाषण करतांना त्यांनीं सांगितलें कीं लोक महागाईच्या नावानें ओरड करतांना आढळतात, पण मितव्ययीपणा ठेवतांना दिसत नाहींत. खरोखर त्यांचा हा उपदेश पहणीय आहे. आपलीं हिंदुशास्त्रें ही तेंच सांगत आलीं आहेत. नवल वाटतें तें येवढेंच कीं पाश्चात्य सुधारणेच्या नांवाखालीं नानाप्रकारच्या फ्याशन्सचें बंड ज्या पाश्चात्य समाजांत अतिशय माजलें आहे त्यांच्यांतल्या एकानें मितव्ययीपणा दारिद्र्यामुळें ह्मणा अगर सामाजिक रूढीमुळें ह्मणा ज्यांच्या रोमारोमांत भिनला आहे अशा हिंदी समाजाला अशा प्रकारचा उपदेश करावा! दक्षिण आफ्रिकेंतल्या हिंदी लोकांना तेथील गोरे लोक तुच्छपणानें कां वागवितात? हिंदी लोक मितव्ययीपणानें राहून युरोपियन व्यापाऱ्यांपेक्षा स्वस्त किंमतींत माल विकतात ह्मणूनना? हिंदुस्थानच्या लोकांना चहा, सिनेमा, व मद्यपान यांचा नाद कोणीं लाविला? मितव्ययीपणाचा उपदेश करणाऱ्या लाट साहेबांच्याच भाऊबंदांनींना? लोकांना काटकसरीनें राहून गरीबींत दिवस कंठण्याचा उपदेश करण्यापेक्षां त्यांच्या उद्योग धंद्यांस उत्तेजन देऊन त्यांची कमाई वाढविण्याच्या कामीं मदत करण्याचें ला[illegible] साहेब मनावर कां घेत नाहींत? हिंदी लोकांनीं दारिद्र्याला कवटाळावें आणि गोऱ्या लोकांनीं मात्र संपत्तींत लोळू[illegible] ऐहिक सुखांचा यथेच्छ उपभोग घ्याव[illegible] अशी वाटणी परमेश्वरानें कांहीं केलेल[illegible] नाहीं. मग असें कां?

---

## खोडसाळपणाचीं विधानें.

हिंदुस्थानांत होमरूलची चळवळ जसजशी पसरत जात आहे, तसतशी हिंदुस्थानच्या हितशत्रूची विलायतेंतल्या लोकांचीं मनें त्या चळवळीविरुद्ध कलुषित करण्याची खटपट[illegible] टिलाही जोर येत आहे. मुंबई हायकोर्टा[illegible] माजी जज्ज सर जॉन जॉर्डिन एम. पी[illegible] हे या खटपटी मंडळींत नुकतेच सामि[illegible] झालेले दिसतात. कुत्र्याला मारायला का[illegible] असली ह्मणजे झालें, मग ती कशी ब[illegible] असेना? अशी इंग्रजींत एक ह्मण आ[illegible] या ह्मणी प्रमाणें होमरूलच्या चळवळी[illegible] व तिच्या पुरस्कर्त्यांना नांवें ठेवतां आ[illegible] ह्मणजे झालें, त्यांच्या सत्यासत्यते[illegible] विचार करण्याचें कारण नाहीं हें कां[illegible] मंडळीचें ब्रीद वाक्य असतें. सर जार्डि[illegible] साहेब विलायतेंतल्या लोकांना सांगतात मद्रा[illegible] सरकारानें मिसेस बिझांट यांना अटके[illegible] ठेविलें होतें तें त्यांच्या राजद्रोही लेखांसाठी[illegible] लॉर्ड पेंटलांड साहेबांनीं ही गोष्ट जार्डि[illegible] साहेबांच्या कानांत सांगितली असली[illegible] ठाऊक नाहीं. पण मिसेस बिझांट बाई[illegible] सरकारनें कोणतेंही कारण सांगितलें ना[illegible] ही गोष्ट मात्र खरी आहे. तसेंच [illegible] विरुद्ध बाईंनीं हायकोर्टाकडे अपील केलें अस[illegible] हायकोर्टानें असा निकाल दिला कीं स[illegible] कारनें केलें तें कायद्याला धरून [illegible] आहे असें ही सर जार्डिन साहेबां[illegible] ह्मटलें आहे! कोण खोडसाळपणा [illegible] मिसेस बिझांटबाईच्या संबंधानें अशीं खो[illegible] साळपणाचीं मनःकल्पित विधानें करण्याचे[illegible] हरिश्चंद्र नाटकांतल्या राणी तारामती[illegible] स्मशानांत हडळ होऊन माणसें खाल्ल्या[illegible] आरोप विश्वामित्राच्या चिथावणीवरून लोक[illegible] केला होता, तसा बिझांटबाई ही राक्षस[illegible] आहे, ती युरोपियन लोकांच्या मुल[illegible] खाते, व अधिकारीवर्गाच्या घरादारांना [illegible] लावून आनंदानें तांडवनृत्य करते [illegible] आरोप केलेला काय वाईट? खोटेंच बो[illegible] लायचें मग संकोच कशाला?

---

पण विलायतेंत जसे लॉर्ड सिडेनह[illegible] किंवा सर जॉन जार्डिन यांच्या सा[illegible] हिंदुस्थानचे कट्टे निंदक आहेत, त्याचप्रम[illegible] सुदैवानें आपल्या विवेकबुद्धीला जागृत [illegible] णारे सत्यनिष्ठ ही लोक आहेत, आणि[illegible] असल्या खोडसाळ विधानांचें योग्य[illegible] आविष्करण करणें हें आपलें कर्तव्य सम[illegible] तात. हिंदुस्थानची मागणी काय अ[illegible] या विषयावर मि. जॉर्ज गफ यानीं [illegible] लेख लिहिला आहे. त्यांत हिंदी विद्यार्थ्यां[illegible] करण्यांत येणाऱ्या आक्षेपांना उत्तर देत[illegible] ते ह्मणतात कीं हिंदी तरुण हे बुद्धि[illegible] हुशार, बहुश्रुत, आणि सभ्यपणानें वाग[illegible] आहेत. त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेवि[illegible] साश्चर्य होणें हा मूर्खपणा व त्यासंबं[illegible] कुरकुर करणें हा पोरकटपणा [illegible]

लहानसान राष्ट्रांच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ कैवार घेऊन युद्धाला हात घातला. न जें अनुमान हिंदुस्थानानें काढावयाचें काढलें आहे. आज शेंकडों वर्षे एकत्र के हिंदु व मुसलमान एक होऊन स्वराज्य मागितलें तर त्यांत गैर झालें? आपल्या हातची सत्ता जाऊं ह्मणून प्रत्येक चळवळीचें ज्यांना भय शंका वाटते असे सुमारें ३००० न सिव्हिल सर्विस मधले लोक हेच र हिंदुस्थानच्या प्रगतीच्या आड येत . मतलबी लोक स्वार्थासाठीं हव्या तशा व बनावट गोष्टी सांगतात; ह्मणून न्या मानावयाच्या नाहींत. अगदीं खरें बोललांत, मि. गफ.

## महायुद्धाची प्रगति

ात वर्षां पूर्वी रशियन ब्यांकर मॉ० ब्लॉच् भविष्य केलें होतें कीं रशियालाच काय, पण ा युरोपाला मोठें भय युद्धांत लोक मारले ल या बदलचें इतकें नाहीं. पण युद्धामुळे सांचा, पैशाचा, धान्याचा, सर्वच गोष्टींचा ाळ प्राप्त होईल हें आहे. रशियाची स्थिति भविष्यवाणीच्या ही पलिकडे गेलेली आहे. ण रशियांत शत्रूंशीं चाललेली लढाई थांबून ब्याच लोकांशीं लढाई सुरू झालेली आहे ाळ अतिशय उग्र स्वरूप धारण करून मुलूख पादाक्रांत करून बसला आहे. णि बोलशेव्हिक लोकांच्या तरवारी रशियन ांच्या मानेवर ठेवलेल्या आहेत, व आह्मी ों तें मुकाट्यानें ऐका, नाहींपेक्षां निष्का- प्राणास मुकाल असें ह्मणत आहेत. तंत्र्यानें देशांतून केव्हांच पःपलायन केलें े. प्रमुख पुढारी हतवीर्य झाले आहेत; ानियन व बोल्शेविक फौजांच्या चकमकी ुरू आहेत. फिनिश लोकांनीं लेनिनला ाणीचा संदेश पाठविला आहे व युक्रे- यनशीं बोलशेव्हिकला झगडावें लागत आहे. ांश, रशियांत सारा गोंधळ माजला आहे. ा स्थितींत जर्मन वर्चस्व सर्वत्र व्हावें असें णाऱ्या जर्मन पक्षाला गुदगुल्या व्हाव्या ाणि ज्या राष्ट्रांचें जर्मनीनें नुकसान केलें हे त्या राष्ट्रांची भरपाई करण्याची न्या ची मागणी जर्मनीनें तिरस्कारानें वाऱ्या- र उडवून द्यावी यांत काय आश्चर्य आहे? र्मनीनें, मि. लॉईड जार्ज व प्रे. विल्सन ्या भाषणाला आपल्या चान्सेलरच्या तोंडून उत्तर देवविलें आहे त्यांतलें गीत दुसरें काय असणार? ही सगळी थाति पाहून वरवर पाहणारास असें वाटेल ो जर्मनीला आतां उच्चीचे ग्रह आले सले पाहिजेत. बाहेरून शरीर लठ्ठ दिसावें, ोंडावर उत्तम तेज ही दिसावें, पण ांतून हृद्रोगानें घर करावें तशी जर्मनीची थिती झालेली आहे. बाहेर शक्ति व आंतून र्बलता या शद्बांत जर्मनीच्या स्थितीचें थार्थ वर्णन करतां येईल. जर्मनीचा मुख्य ोस्त जो आस्ट्रिया त्याला रशियन मॅक्सि मॅलिस्टांची संसर्गबाधा झालेली आहे. या देशांतला मजूरपक्ष अत्यंत असंतुष्ट होऊन ंप करीत आहे, व मॅक्सिमालिस्ट त्या ोष्टीला उत्तेजन देत आहेत. संपांचा वणवा ाऱ्या देशभर पेटलेला पाहून हा कसा विझवितां येईल ही फिकीर तेथील सरकारास घेऊन पडली आहे. लढाई संपवून शांतता स्थापित करण्याची सरकारची इच्छा आहे असें घसा कोरडा करून सरकारी अधिकारी मजूरपक्षाला सांगत आहेत. अन्नाच्या पुरवठ्याचे संबंधांत सवलती देतों, कारखान्यावरचा लष्करी अधिकाऱ्यांचा ताबा काढून घेतों, लोकांना मतदार होण्याची संधी अधिक देतों, फार काय पण बायकांना हीं मतदार करून घेतों, पण येवढे संप मोडून तुह्मी पुनः कामावर या अशी लोकांची प्रार्थना कौंट झर्निन यांस करावी लागली. कौंट झर्निन यांना अशा स्थितींत जर्मनीसारखें सडेतोड उत्तर प्रे. विल्सन यांना देतां येईना; आणि तसें त्यांनीं दिलें नाहीं ह्मणून जर्मनीचा आस्ट्रियावर घुस्सा झाला आहे, आणि अस्ट्रियाचा हल्लींचा प्रधान काढून जर्मनीच्या ओंजळीनें पाणी पिणारा दुसरा प्रधान नेमण्याचा विचार चालला आहे. पण प्रधान बदलल्यानें आस्ट्रियाची खरी स्थिति थोडीच बदलणार आहे? आस्ट्रियन प्रधानाला चूप बसविण्याचें जर्मनीच्या हातांत आहे. पण आस्ट्रियन लोकांना युद्धाचा आलेला तिटकारा घालवून त्याचे जागीं युद्धाविषयींचा उत्साह उत्पन्न करणें त्यांच्या हातांत नाहीं.

---

खुद्द जर्मनीमध्यें असंतोष काय थोडा आहे? पण जर्मन लोकांची राजकीय शिस्त जबर आहे. ती भंग पावणारी नाहीं. जर्मन सोशियालिस्ट भावी अनर्थाबद्दलची सूचना देणारीं भाषणें करतील, पण त्याला अद्याप अवकाश आहे. आस्ट्रियाबद्दलचीच काळजी जर्मनीला उत्पन्न झाली आहे असें नाहीं तुर्कस्थानाविषयीं ही तितकीच काळजी वाटण्यासारखी स्थिति आहे. पालेस्ताईनकडे पाठविलेल्या तुर्की फौजेंतले शिपाई भराभर फौजेंतून पळून चालले आहेत, व त्यामुळें जनरल ॲलेनबी वर चढाई करून जाण्याचा बेत न. फॉल्कन हेन यांना तूर्त सोडून द्यावा लागला आहे. गोबेन आणि ब्रेस्लो या दोन जहाजांच्या संबंधांत हव्या तितक्या गप्पा मारण्यांत येत असतात. पण अंदरकी बात फार थोड्यांना ठाऊक आहे. जर्मनीनें तीं जहाजें कोणत्या कामगिरीवर पाठविलीं आणि त्यांचें झालें काय यांतलें रहस्य अजून ही रहस्याच्याच स्थितींत आहे. तुर्कस्थानांत जर्मनीच्या वर्चस्वाला जो धक्का बसला आहे तो आतां भरून येणारा नाहीं येवढी गोष्ट मात्र खरी आहे.

---

पश्चिम रणक्षेत्राकडची प्रत्यक्ष लढाईची अशी बातमी फार थोडी आहे. ब्रिटिश वैमानिकांच्या चळवळी सर ड. हेग यांना विशेष महत्त्वाच्या वाटत आहेत. ऑर्गान प्रांतांत फ्रेंचांनीं जर्मन लाइनीमध्यें घुसून शत्रूच्या सुरुंगांचा वगैरे नाश केला. इटालियन रणक्षेत्रांत तोफखाना व विमानें यांची चळवळ विशेष उल्लेखनीय आहे यापलीकडे ह्मणण्यासारखीच कांहीं खबर नाहीं. खरी गोष्ट ही आहे कीं लवकरच होणाऱ्या युद्धरूपी नाटकाच्या नव्या अंकाची तयारी करण्यासाठीं मध्यंतरी पडदा पडलेला आहे. या नव्या अंकांतल्या पहिल्या प्रवेशाचें स्थळ कोणतें, व पहिला प्रवेश कशा स्वरूपाचा येणार आहे याची कल्पना ही प्रेक्षकांपैकीं कोणास करतां येण्यासारखी नाहीं व नुसते तर्क करीत बसण्यात कांहीं अर्थ ही नाहीं. लवकरच फार जंगी वादळ सुरू व्हावयाचें आहे. तें कोणीकडून येणार व कोणीकडे जाणार हें माहीत नसलें तरी तें येणार खास असें धरून मित्रराष्ट्रांची तयारी झालेली आहे. अमेरिकन सैन्याची मदत ही यावेळीं फार महत्वाची गोष्ट आहे. या गोष्टीनें मित्रराष्ट्रांना मोठाच धीर वाटत आहे.

---

## देशी भाषेच्या द्वारें उच्च शिक्षण.

दक्षिण हैद्राबाद येथें निजाम सरकाराकडून जी युनिव्हर्सिटी स्थापन व्हावयाची आहे तींत सगळें शिक्षण उर्दू भाषेच्या द्वारें देण्याचें ठरलें आहे, व असें शिक्षण देण्यास लागणारीं अवश्य पुस्तकें इंग्रजींतून भाषांतराच्या रूपानें उर्दूत उतरण्यासाठीं एक कमिटी ही नेमण्यांत आली आहे. या युनिव्हर्सिटींत इंग्रजी भाषा हा एक अवश्य विषय ह्मणून राहीलच. भाषांतरित पुस्तकांच्या ज्ञानावर विद्यार्थ्यांच्या बुद्धीचें पोषण करण्याचा हा प्रयोग अगदीं नवीन आहे, पण तो कितपत यशस्वी होईल याची आह्मांला शंका आहे. आईचें दूध मुलाला जसें मानवतें व अंगीं लागतें तसें वरचें गाईचें दूध अंगीं लागत नाहीं. इंग्रजींतून उसन्या घेतलेल्या कल्पना व विचार त्यांच्याशीं तन्मय झाल्या शिवाय विद्यार्थ्यांच्या जीवनांत त्या प्रवेश करूं शकणार नाहींत असें आमचें मत आहे. प्रत्येक राष्ट्राला राष्ट्रीय शिक्षण हवें तें येवढ्याच साठीं. भाषांतरित पुस्तकांच्या द्वारें मिळालेलें शिक्षण सतेज नसतें. अर्धवट पचविलेल्या अन्नाप्रमाणें तें विकृति मात्र उत्पन्न करील अशी भीती वाटते. अव्वल इंग्रजींत ज्याप्रमाणें इंग्रजी शिक्षणाचा समाजाला विघातक असा परिणाम झाला, तसा या नव्या शिक्षणानें न होवो ह्मणजे झालें. भाषांतरें शाळेंत व कॉलेजांत वाचिलीं जातील, पण त्यांचें मर्म कळून विद्यार्थ्यांच्या जीवनावर त्याचा कितीसा परिणाम घडेल यांची शंका आहे. उर्दू भाषेचाही या भाषांतरांपासून कितीसा फायदा होणार आहे तें कळत नाहीं. भाषांतरानें केलेली वाङ्मयाची वाट ही भाषेच्या वाढील कचितच मदत करूं शकते. खरी वाढ ह्मणजे नैसर्गिक वाढ होय. लोकांनीं पाश्चात्य विचारांचे विचार पूर्वक परीक्षण व ग्रहण करून त्यांना आपल्या जीवनांत रूपांतरित केल्यावर मग स्वयंस्फूर्तीनें त्यांच्या हातून जें वाङ्मय तयार होईल तेंच भाषेच्या अभिवृद्धीला मदत करील असें आह्मांस वाटतें.

---

## निवळ स्वदेशी रेल्वे.

हिंदुस्थानाला स्वराज्य मिळालें तर युरोपियन लोक त्रागा करून येथून चालते होतील, आणि मग तारायंत्रें, आगगाड्या, वगैरे चालविणार कोण? आणि त्यावांचून तुमचे राज्य कसें चालणार? असें कित्येक विचारीत असतात. पुढील हकीकत त्यांच्या प्रश्नाचें उत्तर देईल. ह्मैसूर आर्सिकीर रेल्वे ही सर्वस्वी हिंदी लोकांनीं बांधली आहे. पूल, बोगदे, सर्व कांहीं हिंदी इंजिनियरांनीं तयार केले. त्याचप्रमाणें क्विलान—त्रावणकोर लाइनीवर मोठाले तलाव व दलदलींतून मोठ्या युक्तीनें आगगाडीचा रस्ता नेण्याचें काम ही हिंदी लोकांनींच केलें आहे! अजून हिंदी लोकांच्या स्वराज्याच्या पात्रते विषयीं कोणाला शंका आहे काय?

---

## विलायतेंतली शिक्षणविषयक चळवळ

विलायतेंत सार्वत्रिक शिक्षण आज दहा वर्षे आहे; तेथें टांगेवाले, दुकानदार, फेरीवाले, मजूर सुद्धां वर्तमानपत्रें वाचून देशस्थिति विषयक गोष्टींची चर्चा करू लागले आहेत. तरी मि. हाल्डेन ह्मणतात कीं इंग्लंड आतांशीं कोठें जागा होऊन शहाणपणाचा 'ओनामा' शिकूं लागला आहे! प्रस्तुतच्या युद्धानें इंग्लंडच्या शिक्षणपद्धतींतलीं बरीचशीं व्यंगें बाहेर काढलीं आहेत यांत शंका नाहीं. हीं व्यंग दूर करण्याचें काम मि. फिशर सारख्यांनीं उत्साहानें हातीं घेतलें आहे व सरकार ही अशावेळीं पैशाकडे न पाहतां कार्यसिद्धीकडे नजर देऊन लाखो पौंडाची मंजुरी शिक्षणसुधारणेसाठीं देण्यास तयार झालें आहे. भौतिक शास्त्रांचें ज्ञान व उद्योगधंदे यांची सांगड घालण्याचे यत्न चालूं आहेत. भाषाविषयक शिक्षणाला जें युनिव्हर्सिट्यांतून अग्रस्थान देण्यांत येत असे तें कमी करून भौतिक शास्त्राच्या शिक्षणविषयींचा आदर वाढविण्याची खटपट चालली आहे. लोकांत देशाभिमानाचे बीजारोपण अमेरिकेंतल्याप्रमाणें लहानपणापासून करण्यासाठीं स्वतंत्र पुस्तकें लिहिण्याची व तीं स्वस्त किंमतीस विकण्याची योजना तयार होत आहे. राष्ट्राचा दर्जा वाढविणारे व फायदा करून देणारे संशोधकांचा बडेजाव झाला पाहिजे ह्मणून त्यांना द्रव्य साह्य व मोठाले किताब वगैरे देण्याविषयीं तिकडील सरकार उत्सुकता दर्शवीत आहे. या सर्वांचा परिणाम आज दिसला नाहीं तरी दहा वीस वर्षांनीं झालेला खात्रीनें दिसेल. इंग्लंडच्या कारखान्यांना उत्तेजन येईल, देशाची संपत्ति वाढेल, लोकांत स्वावलंबन दिसूं लागेल, स्वदेशाभिमान जागृती होईल, आणि एकंदरीनें राष्ट्राच्या शक्तींत, वैभवांत, सुखांत आणि लौकिकांत भर पडेल. त्यासाठीं इंग्लंडचे लोक लागेल तो स्वार्थत्याग करण्यास तयार झाले आहेत.

---

## ग्राम पंचायत

### ( पुण्याह वाचन. )

आलिशान सर बेंजामिन राबर्टसन यांचें सद्भाग्य कीं त्यांच्या कारकीर्दीत ही ग्राम पंचायतीची संस्था सुरू होण्याचा सुयोग येत आहे. अशा महाकार्याला लागणारी थोर लोककल्याणाची इच्छा, उदार बुद्धी आणि अडचणीला बाजूस सारणारी यशस्वी कर्तृत्वशक्ती हीं या प्रसंगीं त्यांच्या अंतःकरणांत अधिक जागृत होतील असा आह्मांस भरंवसा वाटतो. ग्राम पंचायतीच्या कमिशनचा वऱ्हाडचा दौरा गेल्या शनिवारीं पुरा झाला आहे आणि प्रत्यक्ष ग्रामस्थ लोकांपाशीं स्थानिक चौकशी करीत करीत कमिशनचे अध्यक्ष रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार हे आकोल्याच्या मुक्कामाला कालपासून आले असून त्यांनीं वऱ्हाडांतील विद्वान, अनुभवी लोकांना मुद्दाम पाचारण करून काल जिल्हाबोर्डाच्या दिवाणखान्यांत ग्राम पंचायतीच्या

मुख्य तत्वासंबंधानें खुल्या दिलानें भवति न भवति केली. कमिशनमधील सरकारी व बिनसरकारी सभासदांच्या कामगिरीचें अभिनंदन करण्याचा काल पुढें येणार आहे. तरी ही मोठी आल्हादाची गोष्ट कीं राजश्री बापूसाहेब जठार यांच्या मंगल हस्तानें या ग्रामसंस्थेचें स्वस्तिवाचन होत आहे. त्यांनीं लोकांपुढें सध्या ग्रामपंचायतीच्या बिलाचा खर्डा विचारजागृती साठीं आणला आहे आणि सरकारीपक्ष व लोकपक्ष यांचे वाद कलह मोठ्या तीव्रतेनें सध्या चालू आहेत. पण त्यापेक्षांही बुलढाणा जिल्हा व अकोला जिल्हा यांमधून जी त्यांनीं सफर केली तिचा दांडगा फायदा म्हणजे या लोकोपयोगी संस्थेसंबंधानें लोकांमध्यें दिसून आलेली विलक्षण स्फूर्ती व विचार जागृती हा होत. भाविष्यकालीं देऊं केलेल्या स्वराज्याच्या देणगीला लोकसमूह किती सत्पात्र आहे हें शेंकडों लोकांच्या झुंडी जेव्हां कमिशनच्या सभोंवतीं गराडा देवून आपलीं मनें त्या उत्कंठित चेहऱ्यानें गांवोंगांव व्यक्त करीत तेव्हां चटकन कळून येई. राजश्री बापूसाहेब जठार यांनीं ग्रामपंचायतीच्या वाङ्मयाचें सिंहावलोकन आपल्या अल्पशा पुस्तकांत मार्ग दर्शकाच्या दृष्टीनें चांगलें केलें आहे आणि त्याचा लोकांना चांगला उपयोग ही झाला आहे. त्यांनीं आपल्या बिलांत जी ग्राम पंचायतीची योजना तयार केली आहे तिच्यापेक्षां तो त्यांनीं हल्लींच्या चौकशीच्या अनुभवानें अधिक श्रीमान, अधिक स्वराज्यदायी व अधिक लोककार्यप्रवर्तक अशी केली पाहिजे असे नवे विचार आमच्या या कमिशनानें आतां संग्रहित केले असले पाहिजेत. आणि आह्मी अशी उमेद बाळगतों कीं, रा. जठार यांच्या हातून हल्लींच्या बिलापेक्षां नवें सुसंस्कृत बिल उदारतर तत्वांवर तयार करतांना त्यांस सरकारी बाजूनें प्रोत्साहन व पाठिंबा देण्याला सर बेंजामिन पुढें सरसावतील आणि रा. बापूसाहेब जठार यांचें नांव आमच्या प्रांतीं ग्राम पंचायतीचे संस्थापक ह्मणून अजरामर होईल; अशी ही कपिलाषष्ठीची महापर्वणी आमच्या डोळ्यापुढें खेळूं लागली आहे. ईश्वर करो आणि जठारद्वारां स्थानिक सरकार यशस्वी व मंगलकारक होवो!

## पुण्यदर्शन

**( सत्कार्याचा महादाक्षिणा. )**

युरोपांत त्रिकाळ महायुद्ध आपल्या संहाराच्या द्वारानें लोकसत्तेचें स्वाराज्य उदयास आणीत आहे; तर तेंच उत्कृष्ट कार्य श्री टिळक आपल्या आत्मदृष्टीच्या संघटणानें व रक्तपाताच्या दोषापासून दूर असलेल्या मार्गानें घडवून आणीत आहेत. ब्रिटिश साम्राज्य व इंडियन राष्ट्र यांच्या मधील प्रस्तुतचा ओढाताण इतकी अधिकाधिक स्पृहणीय व आशाजनक होत चालली आहे याचें कारण तरी श्रीटिळक यांच्या सारख्या राष्ट्रीय महात्म्यांनी सर्व सूत्रें आपल्या हातीं ठेविलीं आहेत हेंच होय. लोकांच्या सर्वोत्कृष्ट ध्येयाची देवमूर्ती ह्मणजे राजश्री टिळक होत आणि ह्मणूनच त्यांच्या पुण्य दर्शनानें लोकांस आपलें अंतःकरणांतील दैवी विचार बाहेर काढूं लागतें, आणि ह्मणूनच राजश्री टिळक वऱ्हाडांत येत्या बुधवारपासून संचार करणार आहेत असें कळल्या बरोबर मलकापूर पासून तों तहत मलकापूर, बुलडाणा, चिखली, खामगांव, शेगाव, तेल्हारा, आकोट, आकोला, वाशीम, मंगरूळ, कारंजा, पुसद मुर्तिजापूर एलिचपूर इ. इ. ठिकाणीं लोकांमध्यें विलक्षण समुत्साह उत्पन्न झालेला आहे, आणि हा समुत्साह इतका अश्रुतपूर्व, तेजस्वी व उद्दीपक आहे कीं त्याच्यामुळें लोकांच्या मानसीक आकाशावरील होणारें कार्य पाहून आकाशाला प्रकाशमान करणारे तारे, नक्षत्रें, आकाशगंगा इत्यादिकांच्या सृष्टिवैभवाची आठवण होईल. बुधवार पासून तारीख १३ पर्यंतचा वऱ्हाडचा प्रोग्राम ठरलेला आहे आणि त्या नंतर राजश्री टिळक यांची स्वारी पुलगांव मार्गानें मध्यप्रांताकडे उतरेल. पण या प्रोग्रॅमाच्या तारखा क्षणोक्षणीं बदलत जाणाऱ्या आहेत. कांकीं स्वराज्याच्या वेडानें लाभावलेला व सर्वस्वदानीं तत्पर होत चाललेला लोक समूह या प्रोग्रामाचें जहाज आपल्या बलवत्तर प्रार्थनाष्टकानें क्षणोक्षणीं वाटेल त्या दिशेनें वल्हवीत आहे. स्वराज्याची शिष्टाई विलायतेस करण्यासाठीं राजश्री टिळक आदिकरून मंडळी विलायतेस जात आहेत ही गोष्ट लक्षांत घेऊन वऱ्हाडचे व मध्य प्रांताचे लोक आपली गंगाजळी राजश्री टिळक यांच्या हातीं प्रेमभरानें अर्पण करीत आहेत ही या भावी मनूचीं प्रसाद चिन्हेंच होत.

## प्रयोग मंदिर.

**( सर बोसची कांचनगंगा. )**

राजकीय क्षेत्रांत राजश्री टिळक जें महाकार्य करीत आहेत तसेंच उत्कृष्ट कार्य शास्त्रीय क्षेत्रांत सर जगदीशचंद्र बोस हे इतकें विलक्षण करीत आहेत कीं त्यांच्या त्या ‘ सर्वं खलु इदं ब्रह्म ’ या शास्त्रीय दर्शनापुढें व नव्या नव्या शोधांच्या सृष्टीपुढें सर्व जग मान डोलवूं लागलें आहे. सर जगदीशचंद्र बोस हे सध्या मुंबई पुण्याकडे आपल्या व्याख्यानानें लोकांना नवीन शास्त्रीय पद्धतीची मधुदृष्टी देत आहेत, हें पाहून आपला हिंदुस्थान देश खरोखर ईश्वरी कृपेनें शास्त्राच्याही कांचनगिरीवर चढत चालला आहे हें पाहून कोणाचें अंतःकरण उज्वल व देदीप्यमान होणार नाहीं बरें! मोठ्या आनंदाची गोष्ट ही कीं, सर बोस यांच्या प्रयोगमंदिराला मदत करण्यासाठीं ह्मणून विद्यार्थी समूह देखील आपापल्या परीनें वर्गण्या गोळा करीत आहे. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं घालून दिलेलें हें उदाहरण सर्वत्र इतकें अनुकरणीय आहे कीं सर बोस यांचा त्या पवित्र प्रयोग मंदिराचा दरवाजा आपापल्या अंतःकरणांत खुला करण्याला ही वर्गणी गुरुकिल्लीच होय. आमच्या वऱ्हाडच्या विद्यार्थ्यांनीं ही सोन्यासारखी संधी अवश्य अनुभवून तिचा आनंद घेण्यास चुकूं नये.

## सर विल्यम वेडरबर्न.

हिंदुस्थानचा एक अत्यंत कळकळीचा कैवारी सर विल्यम वेडरबर्न यांस गेल्या आठवड्यांत सर्व स्वाहा करणाऱ्या मृत्यूनें ओढून नेल्याची दुःखकारक वार्ता ऐकून कोणा हिंदपुत्रास परमावधीचा शोक होणार नाहीं? हे इकडे सरकारी नोकरींत असतां व नंतर पेनशन घेऊन विलायतेस गेल्यावर ही तन मन धन हिंदुस्थानाला अर्पण करीत होते, ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. राष्ट्रीय सभेची नौका यांनीं मोठ्या कुशलतेनें आतांपर्यंत जंगी वादळांतून व मोठाल्या नक्राच्या तडाख्यांतून वाचवून स्वराज्याच्या तीरापर्यंत नेऊन पोचविली. तसें करतांना कोणाची स्तुति वा निंदा यांची पर्वा त्यानीं केली नाहीं. अखंड परिश्रम, भयंकर स्वार्थत्याग, आणि स्वजनांकडून होणारा उपहास व त्यांतच निराशेच प्रसंग याची भर पडली असतां ही इतक्या सगळ्या गोष्टी विनबोभाट करून हिंदुस्थानचा कृतज्ञता त्यांनीं संपादली. याहून महात्मा काय निराळा असतो? मरण समयीं वय ८० वर्षांचें होतें

# वऱ्हाडवृत्त.

आकोल्यास येत्या सोमवारीं आकोटच्या मार्गानें श्री. टिळक हे येथें येतील आणि येथील मंडळींच्या मुलाखती घेतल्यानंतर वाशिमाकडे रवाना होणार आहेत.

**पुसद** येथें भरणाऱ्या जिल्हापरिषदेचें अध्यक्षस्थान नामदार राजश्री तांबे हे स्वीकारणार आहेत आणि राजश्री टिळक यांस तेथें नेण्याचा लोकांचा आग्रह ही मोठ्या कळकळीचा आहे.

काल दुपारीं २ वाजल्यापासून येथील बार असोशिएशन तर्फे ग्राम पंचायत कमिशननें वकील मंडळींचें ह्मणणें ऐकून घेतलें. मि. भाऊसाहेब चिपळुणकर यांनीं लोकांची बाजू उत्कृष्टपणें मांडली. कमिशननेंही ज्या रितीनें हें ह्मणणें ऐकून घेतलें त्या वर्तनाबद्दल अखेरीला अध्यक्षसाहेब राजश्री बापूसाहेब जठार यांचे मनःपूर्वक आभार मानण्यांत आले. उमरावती, खामगांव, वाशीम वगैरे दूरदूरची मंडळी बैठकीचे वेळीं हजर असून सर्वांचा उत्साह विशेष दिसला. कालची बैठक या प्रांतापुरती अखेरचीच होती तरी पण लोकांस आपला कारभार आपण चालवून पाश्चात्य प्रतिनिधीक्षित अधिकारानें आपले गांवगाडे ओढण्याचा नवीन अनुभवाचा ओनामा पंतोजींच्या सौम्यपणानें घालून दिला जाईल असा सर्वांस भरंवसा आला.

पैसा फंडाला १०१ रुपये वर्गणी देऊन तळेगांवच्या काचशाळेला मदत देण्यासाठीं एलिचपूरचे १०–१२ सद्गृहस्थ लाइफ मेंबर झाले व कांहींनीं वर्गण्याही दिल्या हे राजश्री पारखी स्वयंसेवक यांच्या जोमदार परिश्रमाचें सुफळ होय.

होते. त्यांच्या पळखाटांच्या काड्यापासून कागद तयार करण्याच्या महान उद्योगाला मूर्त स्वरूप येईल असा आतां रंग दिसूं लागला आहे हें कळविण्याला आनंद वाटतो.

लोकमान्य टिळक यांस एलिचपुरास येण्याविषयीं लोकांचा अत्याग्रह पडल्या वरून रुकार देणें भाग झालें ही आनंदाची बातमी होय.

रा. रा. हरी शिवराम मुंजे सबजज्ज यांस आसिस्टंट लीगल रिमेंब्रंसर असा नवीन हुद्दा मिळाला आहे.

भंडारा जिल्हा परिषद येत्या २३-२४ तारखेला भरणार असुन तेथें लोकमान्य टिळक हे विराजमान होणार असल्याचे ‘ हितवाद ’ कर्ते लिहितात.

## इतस्ततः

गेल्या अवरडे फंडा प्रीत्यर्थ १८००० रुपये जमावेत असा अंदाज असतां फक्त ९०००० पेक्षां जास्त वर्गणी जमली हें पाहून पुष्कळ कळकळीच्या लोकांना फार हळहळ वाटत आहे. आतां तरी पुढें लोकांनीं अशा फंडास आपखुषीनें सढळ हातानें व उदार मनानें मदत करावी.

गेल्या अमावास्येच्या रात्रीं एक म्युनिसिपल कंदील अकोल्यातील एका मोठ्या हमरस्त्यावर जळत असतांना प्रत्यक्ष पाहिल्याचें एक गृहस्थ कळवितात.

कापशी येथील नवीन केलेल्या कालव्यांत पाणी पाहिल्याचें एक गृहस्थ प्रतीज्ञेवर जाहीर करितात.

सरकारी अधिकारी व स्वतःस लोकपक्षाचे पुढारी ह्मणून ह्मणवून घेणारे कांहीं शिष्ट यांनीं निरपेक्ष बुद्धीनें, बे० जठार साहेबांनीं तयार केलेल्या ग्राम पंचायत बिलसंबंधीं जिल्ह्यांतील खेड्यापाड्यांत जाऊन व्याख्यानें दिलीं तरी त्या खेडवळांचा गैरसमज व दुराग्रह जात नाहीं व ते भलतीच साक्ष पंचायत कमिशन पुढें देतात अशी ओरड आहे

हिंदी लोकांनीं खटपट करून होमरूल मिळविल्यास आमची कांहीं हरकत नाहीं; किंबहुना सहानुभूती ही असूं शकेल, असें आपले प्रामाणिक मत कांहीं उदारमतवादी बड्या सरकारी अधिकाऱ्यांनीं मांटेग्यु साहेबांस कळविल्याची बोलवा आहे.

उंदरांना डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट लागू करून प्लेगच्या दिवसांत त्यांस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्याची बंदी करण्यांत यावी अशी एक तज्ञ सल्ला देतात.

युरोपांतील व रशियांतील सर्व देशांत लोकमतानुरूप राज्यपद्धती असावी असें लॉइड जॉर्ज साहेबांनीं जाहीर केल्यामुळें हिंदुस्थानांत ही तशी राज्यपद्धती तात्बडतोब करण्याचा इंग्लंडचा विचार असलाच पाहिजे असें पुष्कळांचें प्रामाणिक मत आहे.

जर्मन लोकांच्या मर्जी विरुद्ध त्यांच्यावर कोणती ही राज्यपद्धती लादण्यांत येणार नाहीं असें प्रेसिडेंट विल्सन व लॉइड जॉर्ज साहेबांनीं ध्वनित केल्यामुळें जर्मन लोकांना बराच धीर आला आहे. व ते आतां लवकरच दोस्त राष्ट्रांच्या अटीवर तह

## नोटीस

ामान से. सबजज्ज साहेब आकोला कोर्टात

रकोळ अर्ज नंबर २ सन १९१८ चे कोर्टांत दामोदर रामचंद्र रा. डि अज्ञान पालन करणार नारायण रा. यावलखेड ता. अकोला यानें र्थी मयत बाप रामचंद्र अनंत याचे । सक्सेशन सरटिफिकेट मिळण्याचा केला आहे व त्याचे चौकशीची ९–२–१९१८ नेमली आहे. त्या ज्या कोणी इसमास सदरहु सरटि- कां मिळूं नये असें दाखविणें अगर मयताचे इस्टेटीवर हक वारसा । असेल त्यांनी सदहु तारखेस आमचे हजर राहून दाखवावें. तसें न कोणाची हरकत नाहीं असें समजून स सरटिफिकेट दिलें जाईल.

तारीख २१–१–१९१८

S. N. Trivedi.

सेकंड सबजज्ज अकोला

नो० नं० ६५

## नोटीस

रा. दत्ताजी रामचंद्र पाटील रा० ंव जहागीर तालुका आकोला

यांसः—

ली सही करणार यांजकडून कळवि येते कीं मी तुह्माला एक साल- हून देऊन त्या प्रमाणें ६ महिने चाकरी केल्यावर तुमच्याच सांग- ा तुमचा विभक्त झालेला भाऊ याच्याकडे थोड्याच्या महिन्यासुद्धां साल पुरें केलें पण तुह्मी सालखत न परत दिलें नाहीं. तर तें टीस पोचल्यानंतर तो कागद फाडून ावा. असें न केल्यास रितीप्रमाणें ्या खर्चासुद्धां नुकसानी भरून घेण्यांत

ता० २८ जानेवारी १९१८ इ.

सही

शंभु रामजी ढोमणे रा. बाभुळ- गांव जहागीर नि० वखर

नो. न. ६६

## जाहिरात

ई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक. ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी तात.

त्याही वर्षाचे १ ले जानेवारी ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

दोन अथवा अधिक इसमांच्या ठेवतां येतील आणि तो पैसा एकास अथवा जास्त इसमांस अगर मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

१ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध व्याज दरसाल दर शेकडा ४ रुपये दिलें जाईल. व्याजाची आकारणी महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असत मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०१ — Lyon Scott एजंट

नो नं १४

## कागदी बादाम

सर्वोत्तम ४१० गिरी जर्दालू ४९, जर्दालु ४४ कागदी अक्रोड ४३, गरी अक्रोट ४४, अंगुरी हिंग रु. २। आणि शाहजिरें १। रत्तल, सुरेख कस्तुरी रु. ३९, सुर्मा मर्मीरा,२ पवित्र केशर १॥ आणि शुद्धशिलाजित ४९ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९

नो. नं. १७

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशाच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विक ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला नें. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 16 — Dadar Bombay

# सुदर्शन.

बदाम पिस्त्या सारख्या द्रव्यावर वंग प्रवाळ. मौक्तिक, कस्तुरी, सारख्या औषधांची योजना, धातुक्षीणता, व तज्जन्य अगर कोणत्या ही अशक्ततेवर एकच दिव्य, स्वादीष्ट, उपाय. खुलासा सोबत. २० तो- ळ्यास १ रु. ख० शिवाय.

व्ही० आर० मुळे० नांदुरा G. I. P

नो० नं० ४२

# ५०० फोटो १ रु. त!

निरनिराळ्या साधु– संतांचे, नांव गांवासह व पाहतांच ओळख पटण्या इतके हुबेहुब ३०० फोटोंचे; सुंदर **दहा चित्रपट!** किं० रुपये २॥; १।; व ४१० आणि लोकोत्तर चमत्कार, जगांतील आश्चर्ये, चौऱ्यांशीं आसनें, सुंदर-सुंदर स्त्रिया आणि मनोविकार व प्रेम इ. २०० फोटोंचे **सहा चित्रपट!** किं० रु० १॥; ४१२ व ४६ (सोळा चित्रपटांवर ९ हजार वर्षांचें **क्यालेंडर** बक्षीस)

श्री० वा० नगरकर, नाशिक

नो० नं० १८

## रोल्डगोल्ड सोन्याचे

### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३–४; गोट जोडी २–२॥; पाटल्या जोडी २–२॥; वजरटीका २–४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनें बांधलेली ४–६. शिप्याचें मोती व्हान मोठे वाटेल तसें. सराची २–३–४ अंगठी १; सले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २–२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता— **मगनलाल के. आणि कंपनी गिरगांव— मुंबई**

नो० नं० १९

ॐ नमः श्रीगणेशाय.

# आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मुत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांचे खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, कारितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रियां, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत पंक्का रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३९ गो० १ रु० ७९ गो० २ रु० १६९ गो० ४ रु० २७९ गो० ६ रु० ५९० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तीडक, मुत्रांचा लाल, संकोच, पुपस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत त दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० स० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य. मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी

नो० नं० २२

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५२] आकोला--सोमवार तारीख ११ माहे फेब्रुवारी सन १९१८ ई० [अंक ६

सर्व औषधांचा राजा.

## अमृतबहार.

(२०० रोगांवर चालणारें एकच औषध)

सदर्हू औषध घरांत असल्यास कोणत्याही प्रकारें इतर औषधांची जरूर पडत नाहीं. खरूज, गजकर्ण, खोकला, ताप, महामारी, प्लेग, गरमी, परमा, डोकेंदुखणें, पोटदुखणें, दाढदुखणें, दमा, थंडी, हींव वगैरे वर मूल्य १ बाटलीस रुपये २ अर्धाशिशी करून ठणकणें वगैरे सर्व प्रकारचे २०० रोगावर आणि रामबाण आहे. ट. ख. निराळा. जागोजागीं एजंट पाहिजेत.

पत्ता

भाई रामसिंग ॲन्ड सन्स मॅनेजर
अमृत बहार कंपनी सुजाबाद
जिल्हा मुल्तान (पंजाब)

नो. नं. २०

## लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आम्ही येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचे सामान** वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घांडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, ल्यांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचें चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.


डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट
मुंबई नंबर २

नो. नं. २१

शक्तिदायक; रामबाण युनानी इलाज.

### संजीवनी पाक.



यांत खाक. मौक्तिक शिलाजतु, कस्तुरी अंबर इत्यादि अमोल औषधें वापरलीं आहेत. प्रमेह, धातुक्षीणता, अग्निमांद्य इ० रोगांवर वस्ताद २० तोळ्यास १ रु. ट. ख. नि.

असंख्य सर्टिफिकेटें व पदकें प्राप्त!

**संजीवनी दवाखाना नांदुरा-खामगांव (वऱ्हाड)**

नो० नं० ३६

### जाहिर नोटीस

या जहिर नोटिशीनें खालील पट्टेदार लोकांस कळविण्यांत येते कीं:—

१ जानराव कुकाजी देशमुख राहणार चरणगाव ता० बाळापूर
२ भिमराव दवलतराव देशमुख रा० मौजे विवर ता० बाळापूर
३ बळवंतराव रामजी देशमुख रा. मौजे विवर ता० बाळापूर
४ नारायणराव रामराव देशमुख रा० मौजे विवर ता० बाळापूर
५ तुकाराम वा बाबुजी भामटी रा. मौजे विवर ता० बाळापूर
६ आनंदराव मानसींग देशमुख रा० मौजे चरणगांव ता० बाळापूर
७ जानराव लक्ष्मण देशमुख रा० चरणगांव ता० बाळापूर
८ पुंडलीक तुकाराम देशमुख रा० चरणगांव ता० बाळापूर
९ सखाराम रामजी मोतळे रा० चरणगांव ता० बाळापूर
१० हरी वा तुकाराम शिंपी वस्ती चरणगांव ता० बाळापूर
११ पुंजाजी माधोसींग देशमुख रा० चरणगांव ता० बाळापूर
१२ बळीराम तुकाराम देशमुख रा० चरणगांव ता० बाळापूर
१३ मयाराम वा बाघा लभाणी रा० बाबुळगांव ता० बाळापूर
१४ दावडा वा रामसिंग लभाणी रा० शेकापूर ता० बाळापूर

तुह्मास तारीख १८-९-१९०८ व १९-१२-१९०८ इ. रोजीं मीर महिबुब अली वल्लद मीर मुबारक अली जहागिरदार रा. शेकापूर ता. बाळापूर यानें मौजे शेकापूर ता० पातुरशेकबाबू येथील जहागीरी पैकीं १५ शेतें व त्याच जहागीरीपैकीं ४३ पडीत शेतांतील १ बोरीचा व सिताफळाचा आणि आंब्याचा फळबार व जळाऊ लाकडे व अडजात व सागवान इमारती लाकडे गवत वगैरे सन १९०९ सालापासून १९२० सालापावेतों बारा वर्षे पट्ट्यानें त्याचा कांहीं हक्क नसतां त्यांने बेकायदेशीर रितीनें आमचे हिस्यासुद्धा पट्टेखत वरील तारखांस लिहून दिलें आहे व तुह्मी करून घेतलें आहे. त्या पट्टेखताचे आधारें तुह्मी आजपावेतों उपभोग घेत आला आहात. वास्तविक तें पट्टेखत बेकायदेशीर असल्यामुळें रद्द आहे. तर आतां या पुढें तुह्मी त्या पट्टेखताची अमलबारी करूं नये ह्मणून ही तुह्मास सूचनार्थ नोटीस दिली आहे. जर यदाकदाचित तुह्मी आह्मी दिलेल्या नोटिशीला न जुमानाल तर आह्मी तुमचे विरुद्ध योग्य कोर्टांत दाद मागून नुकसानी सुद्धा तुमचेवर डीक्री मिळवूं. शिवाय आणखी तुह्मास असें सुचविण्यांत येते कीं तुह्मी परदोक पडीत व वहित नंबरातील जळाऊ लाकडाचा व इमारती सागवान व अडजात लाकडांचा तोडून विध्वंस करण्याचे बेतांत आहां तर यापुढें तुह्मी वराल शेतांत व पडीत नंबरांत बिलकूल जाऊन कोणत्याच प्रकारची नुकसानी करूं नये. केल्यास तुह्मी सर्व प्रकारें आमचे नुकसानी देण्यास पात्र व्हाल व झालेल्या नुकसानीची सर्व प्रकारें जोखीम तुमचे शीरावर व तुमचे स्थावर जंगम जीनगीवर राहील. कळावे मुकाम आकोला ता. ६।१।१८ इ.

सही

१ सिकंदर अली द. खु.
१ आलम साहेब जहागीरदार शेकापूर
नो. नं. ६७ द. खु.

### जाहिर नोटीस

मे. मिर महेबुब आली वा मीर मुबारकआली जहागीरदार रा. शेकापूर प्रगणे पातूर ता. बाळापूर पोष्ट शेकबाबू साहेब यांचे पातूर

यांसः—

खालीं सह्या करणार यांजकडून या जाहीर नोटिशीनें कळविले जाते कीं:—

मौजे शेकापूर प्रगणे पातूर ता. बाळापूर येथील जहागिरीपैकीं वहीत इनाम जमीन, शेतें १५ आणि परम पोक नंबर पडीत ४६ असे एकंदर इनाम जमीन जहागिरीपैकीं तुह्मी जानराव कुकाजी देशमुख व भिमराव दवलतराव देशमुख वगैरे इसम १४ यांना तारीख १८-९-१९०८ रोजीं रुपये १००० चे व तारीख १९-१२-१९०८ रोजीं रुपये २००० चे अशी दोन पट्टेखतें आह्मास बुडविण्याकरितां कपटानें लिहून दिलीं होतीं. त्याचे आमचे हिशाचे दोन दावे वि० सेकंड सबजज साहेब कोर्ट आकोला यांचेकडे दि० मु० नं० २०२ व २०३ सन १९१६ चे करून आमचे दरसाल चे स्वामित्वाबद्दल हक्काचे हुकुमनामे मिळविले आहेत. अतां आह्मी तुमचेवर आमचे हिशाचा हक्काचा दावा करणार आहोंत. परंतु आमचे ऐकण्यांत आले कीं तुह्मी पुनः जहागिरीची जमीन दुसऱ्यास पट्टेखतानें अगर दुसरे कोणते रुपानें लिहून नोंदून देण्याचे कारवाईत आहां असें आह्मी ऐकतो, ह्मणून ही तुह्मास नोटीस देणें जरूर असल्यामुळें जाहीर करितो कीं, तुह्मी वरील स्वरूपाचा एखादा लेख करून लिहून नोंदून दिल्यास त्याचा बोजा आमचे जहागिरींत असलेले हिशावर शेतावर व त्यांतील आंब्याचे बोरीचे सीताफळाचे झाडावर व त्यास येणारा दरसालचे फळ वगैरे गवत व जळाऊ लांकडावर व इमारती लांकडावर कायद बसणार नाहींत. व आमचे हिशाची जहागिर तुह्मी काढलेले कर्जास जबाबदार राहणार नाहीं. तुह्मी मागें करून दिले व ही नोटीस पावल्यावर लिहून द्याल सर्व लेख अधिकार नसतां केले ह्मणून बेकायदेशिर व रद्द समजले जातील आहेत. ही नोटीस दिली सही मु. अकोला ता. ६-२-१९१८

सह्या

सिकंदरअली द० खुद
आलमसाहेब जहागीरदार शेकापूर
द० खुद

नो० नं० ६८

### नोटीस

नोटीस बेशमी तुळसाई मर्द हरी माळी गणोरकार राहणार शेगांव ता. खामगांव

ईसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं तुझा नवरा हरी हा माझा सखा चुलता असून तो मयत झाला, त्याची तूं मोहतीराची बायको असून तुजला पुत्र संतान नाहीं, मयत हरीची इस्टेट स्थावर शेगांव येथील घर व जंगम जिनगी तुझे ताब्यांत आहे. ती इस्टेट तूं विकणारी अशी बातमी लागली करितां नोटीशीनें कळविण्यांत येत आहे मयत हरीचा योग्य वारस तुझे पश्चात मी आहे. तुजला विकण्याचा अधिकार नाहीं. जर करितां तूं विकल्यास त्या रकमेचा जबाबदार मी राहणार नाहीं. तुझे मरणानंतर त्या इस्टेटीचा मी पूर्ण मालक आहे. आणि खरीदी घेणार हा कायदेशीर जबाबदार होईल. व तो दस्तैवज सरकार मार्फत रद्द होईल हें पक्के समजावें. सबब नोटिशीनें अगोदर ताकीद दिली आहे तरी विक्री करूं नये. ता० १।२।१८

सही

गणपत शंकर माळी गणोरकार द. खु.
नो० नं० ६९

### जाहिरात

आमची खालीं लिहिलेली मिळकत विक्रीस तयार आहे तीः—

१ घर पुजाजवळील महमदी प्रेसच्या बाजूचें

२ ढोमणपुऱ्यांत बाबा घोंगे यांचे घराचे उत्तरेची हवेली

३ शिवचरण बुवा यांचे समाधी जवळील चाळ

गरजूंनीं खालील पत्यावर भेटावें.

सही

पंढरीनाथ रंगो तारे C/o अघोर ब्रदर्स आकोला

नो० नं० ७०

## जाहिर नोटीस

खालीं सही करणार यांजकडून सर्वत्र ...स कळविण्यांत येते कीं, ता० ३०-८ इ० रोजीं पांडुरंग भगवंत ...रे जात देवांगण साळी यांस मुखत्यार नेमून पसंत केले होते. व ...रपत्र ही रजिष्टर करून दिले होते. आतां सदर्हू प्रमाणें पसंत केलेला ...र याचे मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. ... आमचे संबंधानें कोणीही कोणत्याच ...रची देवघेव करूं नये. देवघेव केल्यास ...ल आम्ही मुळींच जबाबदार नाहीं. नोटीस दिली. ता०

सही

हिरालाल राजबा चवरे कारंजा द. खु.

नो० नं० ७१

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस व साहू सावकार लोक जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते माझा मुलगा नामे विठू वा. भगवान फुसे ... माळी रा. मुंडगांव हा अलीकडे दुर्व्यसनी ...ला असून तो लोकांचे वाटेल तसे काढतो व पैसे उधळतो तरी त्यांस नांवावर अगर माझे इस्टेटीचे भरंव...र कोणी कर्ज देऊं नये. दिल्यास कर्जात मी अगर माझी इस्टेट (स्थावर ...) मुंडगांव व दहिगांव ता० आकोट असलेली जबाबदार राहणार नाहीं. त्याचे कर्जा बद्दल कोणत्याही तऱ्हेनें पैसे देणार नाहीं व माझ्या हयाती ... त्याचा माझे इस्टेटीवर कांहीच हक्क नाहीं. तरी सर्वत्रास अगाऊ कळविले ... क. ता. १-२-१९१८ इ.

सही

भगवान वा रावजी जात माळी

नो. नं. ७२ द० खु०

## नोटीस.

खालीं सही करणार यांजकडून पांडुरंग ...ंत बेलसरे जात देवांगण साळी रा० ...जा यांसः—

या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं ...ही आपणास ता० ३०।१।१८ इ. रोजीं मुखत्यार पसंत करून मुखत्यारपत्र रजि... करून दिले होतें तरी आतां या आम्ही आपलें मुखत्यार पत्र रद्द केलें ... करितां आपण आमचे संबंधानें कोण प्रकारचा कोणासही कांहींच व्यवहार ... नये. कांहीं व्यवहार केल्यास आम्ही बद्दल जबाबदार नाहीं. तरी आपलें मुख...रपत्र रद्द केलें असे ही नोटीस दिली.

सही

हीरालाल राजबा चवरे रा. कारंजा

नो. नं. द. खुद

## नोटीस.

चि० रा० जिवनराम श्रीराम दिक्षीत का...ण रा. मुर्तीजापूर ता. मजकूर जिल्हे ...कोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीशीनें ...कळविण्यांत येते कीं, तुम्ही माझा दत्तक मुलगा नामें लालसिंग हरीसिंग हजारी रा. मुर्तिजापूर ता. मजकुर जि. अकोला यांजकडून कांहीं कागदपत्र लबाडीनें व सक्तीनें करून घेतल्याचें समजलें सबब तुम्हास सदर्हू कागदपत्र माझे मला परत देणें बद्दल पुष्कळ वेळां झटलें असतां तुम्ही आजपर्यंत परत केले नाहींत. माझा मुलगा अज्ञान विद्यार्थी अवस्थेंत असून अज्ञान आहे शिवाय माझे हयातीपावेतों त्यास कोणतेंच प्रकारचा गैर कायदा व्यवहार करण्याचा अधिकार पोंचत नाहीं हें तुम्हांस माहीत आहे. तरी अशाप्रकारचें धाडसाचें कृत्य केलें. यापुढें इतःपर असें कृत्य न करणें बद्दल तुम्हांस या नोटीसीनें कळविले आहे. तरी ही नोटीस पावलेपासून आठ दिवसाचें आंत माझे मुलाकडून जे कांहीं कोणतेही प्रकारें कागद पत्र वगैरे करून घेतले असतील तें परत देऊन माझे हातची पावती घ्यावी. असें न केल्यास तुमचें पाशीं असलेले सर्व कागदपत्र रद्द समजावें व त्या कागदपत्रावरून मी किंवा माझी इस्टेट वारस कोणत्याही तऱ्हेनें बांधली जाणार नाहीं व रीतीप्रमाणें तजविज केली जाऊन ते कागदपत्र रद्द ठरविले जातील. ही नोटीस दिली सही ता. माहे फेब्रुवारी सन १९१८ इ.

सही

हरीसींग किसनसींग हजारी रा. मुर्तिजापूर द. खु.

नो. नं ७३

## नोटीस

भाई मीर अबासअली जाहगीरदार साहेब रा. कामरगांव ता. मुर्तिजापूर जि. आकोला यांसः—

खालीं सही करणार कृष्णाबाई नवरा बापुराव देशमुख रा. कुऱ्हा ता. एलिचपूर जि. उमरावती इजकडून नोटीस देण्यांत येते कीं कसबे कामरगांव ता. मुर्तिजापूर जि. आकोला येथें माझे मालकीचे शेत सर्वे नंबर, ४७,६८,९८, पैकी ६२,६४, ६२,७७,७, व ५९ असे एकंदर ९ नऊ शेते आहेत. त्याची खातीं माझे नांवें आहेत. अलीकडेस मी आजारी आहे त्या मुळें मी घरांत पडून आहे व माझी सर्व प्रकारें हीपाजत माझी सासु मीराबाई जवजे जयरामजी दे. रा. कुऱ्हा ता. एलिचपूर ही करीत आहे सदर्हू जीनगी मजला माझे बापाकडून मिळालेली आहे. त्याजवर माझे शिवाय दुसऱ्याचा हक्क नाहीं तरी माझे नवें असलेली शेतांची खातीं माझे समक्ष माझी सासु नामें मीराबाई जवजे जयरामजी दे. रा. कुऱ्हा ता. एलिचपूर हिचे नावें करावीत करितां मुद्दाम तुम्हास नोटीसीनें कळविले आहे. कळावे ता. २८ माहे जानेवारी सन १९१८

दस्तुर बापुराव जयरामजी दे. द. खु.

सही

कृष्णाई जवजे बापुराव निशानी आंगठा असे

नो. नं. ७४

## जाहिरात

या जाहिरातीनें सर्व शेट सावकार व दुसरे ...गार लोकांस खालीं सह्या करणार यांचेकडून कळविण्यांत येते कीं, मौजे शेकापूर प्रगणे पातूर शेकबाबू साहेब ता. बाळापूर येथील जहागीर मीर महिबूबअली वा मीर मुबारक अली जहागीदार यांचे नांवें असून त्या जहागिरींत आम्ही कायदेशीर हिस्सेदार मालक आहोंत. असे असतां ते आम्हास बुडविण्यासाठीं विनाकारण दुसऱ्यास वाटेल त्या प्रकारें त्यास कांहीं हक्क नसतां भलते लेख करून देईल तर त्याचे विश्वासावर करून घेऊं नयेत. असे करून दिलेले लेख बेकायदेशीर रद्द समजले जातील व आहेत. व त्या लेखाचा बोजा आमचा जहागिरींत असलेल्या हिशावर व आमचेवर बसणार नाहीं. या अशा लेखाचा बोजा जहागिरींतील त्याचे मालकीचे हिशावरच राहील. आमचे हिशावर राहणार नाहीं. ही जाहीरात दिली सही मुकाम आकोला ता ६।२।१९१८

सह्या

सिकंदरअली द. खुद

आलमसाहेब वं. हैदरअली द. खुद

नो. नं ७५

वऱ्हाडसमाचार

पौष वद्य ३० पिंगल संवत्सर १८३९

## लेनिन आणि ट्रॉट्स्की.

सध्या रशियाची जी दुर्दशा ... आहे तिचें पुरस्कर्तृत्व ज्या पुरुष... त्यांत हे दोन पुरुष प्रमुख आहे... हा बोलशेव्हिक चळवळीचा पु... बोलशेव्हिक या शब्दाचा अर्थ ... आहे. ट्रॉटस्की हा लेनिन याच... आहे. तरी पण दोघांच्या स्वभाव... अस्मान इतकें अंतर आहे. ... शांत, संकावृत्तीचा आणि व्या... आहे. ट्रॉटस्की त्याच्या उलट ... लेनिन हा म्याक्झिमालिस्ट पक्षाच... होता. हा जर्मन लोकांला मोहि... बंद करण्यास प्रवृत्त झाला अस... पक्षाचा त्याच्यावर आरोप आहे. ... कांहीं दिवस हा स्वीडन, स्वित्झ... देशांत लपून बसला होता. याच... भाऊ हा बादशहा दुसरा आलेक्झ... वेळीं बंडखोर म्हणून फाशी देण्य... होता. लेनिन हा ग्रंथकार ही ... रशियांत भांडवलवाल्यांचें प्रस्थ या ... ग्रंथ लिहिला आहे. दुसऱ्या ड्यूम... वेळीं लोकांनीं याला प्रतिनिधि ... निवडून दिले होतें, पण लवकर... हद्दपार व्हावें लागलें. पुढें स्वित्झर्ल... नजरबंदीखालीं कित्येक दिवस होत... पुढें रशियांत क्रांति झाली तेव्हां त्यांनीं सुटका केली. लवकरच त्याला इतके अनुयायी मिळाले कीं रशियन सरकारला त्याला कैद करून ठेवण्याचें धैर्य होईना. तो जर्मनीचा हेर आहे अशी लोकांची समजूत आहे. ट्रॉटस्की हा त्याचा हस्तक अमेरिकेंतल्या एका वर्तमानपत्राच्या आफिसांत दर आठवड्यास १२ डालर्स पगारावर रिपोर्टर होता. याला रशियन सरकारानें हद्दपार केलें होतें. हा ही ग्रंथकार असून याचीं मतें जहाल सोशियालिस्टपक्षाचीं आहेत. सोशियालिझमचा प्रसार करण्याच्या खटपटीमुळें याला सैबेरियांत हद्दपार करण्यांत आलें होतें. प्रस्तुत युद्धाच्या सुरुवातीचे वेळीं तो जर्मनींत होता. पण तेथें ही त्याच्या सोशियालिस्ट मतामुळें तो जर्मन सरकारास नकोसा झाला होता. मग तो स्वित्झर्लंडमध्यें गेला. तेथें ही तोच प्रकार घडला. तेव्हां पारिसमध्यें येऊन त्यानें एक वर्तमानपत्र काढलें. तेथें ही त्याला तोच अनुभव आला. तेथून तो स्पेनमध्यें गेला. तेथल्या सरकारनें तर हा ब्याद काढून देण्यासाठीं त्याला तो निजला असतां उचलून बोटींत घातलें आणि क्यूबाला पाठवून दिलें. क्यूबा सारख्या लहानशा प्रदेशांत त्याच्या महत्त्वाकांक्षेला व चळवळीला वाव मिळेना, म्हणून तो अमेरिकेंत गेला. तेथें त्याच्या वर्तमानपत्रांना पोस्ट ऑफिसनें मनाई केली. पुढें रशियांत क्रांति झाली तेव्हां तो रशियांत परत गेला. जर्मन लोकांनीं तेथील सरकाराविरुद्ध उठलें पाहिजे, आणि रशियन लोकांशीं बंधुत्वाच्या नात्यानें राहिलें पाहिजे असें जोंपर्यंत होत नाहीं तोंपर्यंत रशियाला क्रांतीचें संरक्षण करणें जरूर आहे असें त्याचें मत आहे.

## हिंदुस्थानच्या मागण्या.

...वर पुण्याचे सुप्रसिद्ध लेखक व ...नरी डॉ० मॅकानिकल यांनीं ... विद्यार्थ्यांच्या संबंधाच्या एका ... लेख लिहिला आहे. त्यांत त्यांनीं ... आहे कीं कांहीं बाबतींत हिंदु... ब्रिटिश राज्यव्यवस्था पूर्णपणें ...ी आहे. विशेषतः सामाजिक ...साराला सरकारी अधिकाऱ्या... ...यद्यानें कांहीं मदत होत नाहीं ... फार वाईट वाटत आहे. ...तों कीं लोकहिताच्या कोणत्या ...ारची मदत पूर्णतेनें होत ...णाला सरकार उत्साहानें मदत ... याचें उत्तर नाहीं असेंच द्यावें ...ा. ना. गोखले यांच्या शिक्ष...काला कोणाकडून विरोध झाला ...ाय? अज्ञानी लोक शिक्ष...वर नवा कर बसवून घेण्यास ...ते, पण शिक्षणाची महती ...श अधिकारीच त्या बिलाला ... उद्योगधंद्यांना तरी सरकार ... झाली आहे काय? औद्योगिक ... साक्षी— विशेषतः मुंबईचे क...म यांची चामड्याच्या कार... साक्ष—या प्रश्नाचें योग्य उत्तर ...ला मदत होत आहे काय? ...फ कॉमर्सचें रडगाणें वाचा ... कंपन्या मालाची वाहतुक

कारण्यांत सुद्धां काळा गोरा असा भेद करून देशी व्यापाऱ्यांचें नुकसान करण्यास व युरोपियन कंपन्यांना मालासाठीं डबे व आगिगाडी पुरविण्यास कशा तत्पर असतात ते समजेल. साहित्याला तरी त्यांचे कडून मदत होते काय? शिक्षणखात्याकडून कोणाचीं पुस्तकें मंजूर होतात व कोणी लिहिलेलीं होत नाहींत याबद्दलची ना. परांजपे यांनीं मुंबईच्या कायदे कौंसिलांत केलेली सणसणीत टीका पहा. सामाजिक सुधारणेला तरी त्यांची मदत आहे काय? मदतीचें नांव कशाला? नुसती सहानुभूति सुद्धां असती तरी मुंबईच्या सोशल रिफॉर्म असोसिएशननें मि. मांटेग्यु यांची मुलाखत घेण्याची इच्छा सरकारास कळविली असतां ती मुलाखत न होऊं देण्याइतका निष्ठुरपणा त्यांनीं दाखविला नसता. मग प्रश्न हा उत्पन्न होतो कीं सरकारची सहानुभूति व मदत आहे तरी कोणाला? कोणाला ह्मणजे? युरोपियन व्यापारी मंडळें, कांग्रेस-लीगच्या सुधारणायोजनेला विरोध करणारे ब्राह्मणेतर, युरोपियन मळेवाले, आळसांत काळ घालवून गरीब शेतकऱ्यांच्या मेहनतीवर चरून पुष्ट होणारे व सरकारी अधिकाऱ्यांपुढें लांगूलचालन करणारे जमीनदार— ही मंडळी सरकारच्या विश्वासाचीं व सहानुभूतीचीं पात्रें होऊन बसलीं आहेत. मुंबईचें इंडियन सोशल रिफॉर्मर पत्र सरकारवर तुटून पडणारें नाहीं, बेझांटबाईचें बगलबच्चें नाहीं, किंवा टिळकांचें उपासक नाहीं. पण हें पत्र काय ह्मणतें पहा— 'देशांतल्या प्रचलित विचारप्रवाहापासून व जीवनप्रवाहापासून सरकारनें मुद्दाम जाणूनबुजून अलिप्तपणा राखला आहे' असें या पत्राचें ह्मणणें आहे. अधिकारी व प्रजा यांच्यांतला असा तुटकपणा हें सुराज्याचें लक्षण समजावयाचें काय?

## आपला कायमचा पाहुणा

सध्या आपले देशांत जिकडे तिकडे स्वराज्याची चळवळ सुरू आहे. या एका विषयाखेरीज लोकांना विचार करण्याला सवड, किंवा चळवळीला दुसरा विषय नाहींसा झालेला आहे. या स्वराज्याविषयक चळवळीच्या उत्साहांत आपण दुसरी तितकींच महत्वाचीं कर्तव्यें दृष्टीआड करीत आहों ही गोष्ट आपले लक्षांत ही येत नाहीं. आपल्या अंगच्या उत्साहाचा थोडासा अंश तरी आपल्या देशांत कायमचा होऊन बसलेल्या पाहुण्याला—प्लेगला घराबाहेर घालविण्यांत खर्च करणें किती अवश्य आहे तें सांगावयास नकोच. आज हिंदुस्थानचा निदान तीन चतुर्थांश भाग तरी हा पाहुणा बळकावून बसला आहे. या पाहुण्याला दरसाल लक्षावधि प्राणांचे बळी द्यावे लागत आहेत. ही उपेक्षा करण्यासारखी गोष्ट आहे असें कोण ह्मणेल? हिंदुस्थानच्या दारिद्र्यामुळें लोकांची जीवनशक्ति नष्टप्राय झाली आहे व त्यामुळें प्लेगसारख्या रोगाशीं झगडण्याचें सामर्थ्य आमच्यांत राहिलें नाहीं असें ह्मणत स्वस्थ बसण्यांत अर्थ नाहीं. आहे ही परिस्थिति जमेस धरूनच शत्रूशीं झगडतां येईल तेवढें झगडलें पाहिजे दारिद्र्याबरोबर आमच्यांतल्या अज्ञानानें ही आह्मांस कमकुवत केलें आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. दारिद्र्य घालविणें आमच्या हातांतली गोष्ट नसली तरी लोकांतलें अज्ञान कमी करणें हें आमच्या हातचें आहे. ज्या प्रमाणें हल्लीं स्वराज्य विषयक व्याख्यानांची व पुस्तकांची गिरणी सुरू आहे अशी आरोग्यासंबंधाच्या माहितीच्या भाषणांची व पुस्तकांची गिरणी सुरू व्हावयास पाहिजे. सचित्र पुस्तकांच्या, म्याजिकल्यांटर्नच्या, व सिनेमाच्या द्वारें स्वच्छता न ठेवण्यापासून होणारी भयंकर हानि व स्वच्छता ठेवण्याचे उपाय याविषयीं लोकांस माहिती करून दिली पाहिजे. प्लेगवर मोहीम सुरू केल्याशिवाय आतां गत्यंतर नाहीं. सरकारी अधिकारी व म्युनिसिपालिट्या वगैरे आपापलीं कामें करोत किंवा न करोत, प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीनें या बाबतींत आपल्या स्वतःचें कर्तव्य करून त्यांना लाजविलें पाहिजे. प्रत्येकानें आपापल्या घरांतली अडगळ व घाण काढून टाकून घर आरशासारखें स्वच्छ केलें पाहिजे. उंदरांचीं बिळें बुजवून त्या प्राण्यांना खाण्यास न मिळेल असा बंदोबस्त शक्य तेवढ्या रीतीनें केला पाहिजे. अशा मोहिम करण्याचा राज्यकर्त्यांच्या मनावर इष्टच परिणाम होईल. आणि हिंदुस्थानचे लोक स्वराज्य उपभोगण्यास पात्र आहेत कीं नाहींत या बद्दल निराळें सर्टीफिकेट दाखविण्याचें कारणही पडणार नाहीं.

## यासाठीं होमरूल पाहिजे
### ( गुलामगिरीचा परिणाम )

अनेक वर्षे दुसऱ्याच्या जेरांखाली अंमल खालीं राहिल्यानें मनुष्याच्या अंगांतलें स्वाभिमानाचें, कर्तृत्वशक्तीचें आणि बाणेदारपणाचें पाणी शोषिलें जाऊन तो कसा निःसत्व होतो याचीं उदाहरणें वारंवार दृष्टीस पडतातच. पण अगदीं ताजें उदाहरण पहावयाचें असेल तर इंदुरास होळकर कॉलेजांत घडलेल्या प्रकाराचें देण्यासारखें आहे. तारीख १ फेब्रुआरी रोजीं होळकर कॉलेजाच्या माजी व विद्यमान विद्यार्थ्यांचें संमेलन व्हावयाचें ठरलें होतें. त्याप्रमाणें विद्यार्थ्यांनीं मोठ्या उत्साहानें सर्व तयारी केली. हायस्कुलांत व इतर सरकारी संस्थांतल्या नोकरांपैकीं ज्यांना संमेलनास यावयाचें असेल त्यांना त्या दिवशीं सुटी देण्याविषयींचें ही सरक्युलर निघालें. सगळी तयारी झाली. पण इतक्यांत आदले दिवशीं त्या कॉलेजावर नवीनच नेमणूक होऊन आलेले प्रिंसिपाल मि. ऑस्टन स्मिथ यांनीं कॉलेजच्या नोटीस बोर्डावर अशा अर्थाची नोटीस लाविली कीं 'इंदूर शहरच्या लोकांची प्रवृत्ति स्वतंत्रपणा, लोकसत्तेची वाढ, बेहुकमीपणा अथवा त्याला दुसरें काय हवें तें नांवद्या इ. गोष्टीकडे आहे. व असली प्रवृत्ति) निदान या कॉलेजापासून तरी दूर ठेविली पाहिजे, वगैरे नोटिशींतल्या या वाक्यांवरून प्रिन्सिपाल साहेबांच्या स्वतःच्याच मनाची प्रवृत्ति लोकांना 'येन केन प्रकारेण' शिव्या देण्याकडे व शिरजोरपणानें अधिकार गाजवून लोकांचा अपमान करण्याकडे कशी आहे तें चांगलें दिसून येतें. त्यांच्या दृष्टीनें मनुष्यानें स्वतंत्रपणाचा बाणा राखणें ह्मणजे महत्पाप आहे व लोकसत्तेच्या वाढीकडे त्याच्या मनाचा कल असणें हें तर महत्तर पाप होय; आणि इंदूरचे लोक हीं दोन्ही पापें करीत आलें आहेत त्या अर्थी त्या पातकाचा संसर्ग होळकर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना लागूं नये याबद्दल प्रिन्सिपाल साहेबांना काळजी लागून राहिली आहे!

## महायुद्धाची प्रगति

गेल्या आठवड्यांतल्या युद्धसंबंधाच्या ठळक गोष्टी ह्मणजे जर्मनींतले संप, इटालियन लोकांनीं फ्रेन्झेला व पेलाग्रो दरींत मिळविलेले जय, जर्मन शत्रूचे लंडन व पारिसवरचे वैमानिक हल्ले आणि जर्मनीला अमेरिकेचें वाटणारें भय अशा चार आहेत. पैकीं इटलीनें मिळविलेले जय मोठे नसले तरी एका दृष्टीनें त्यांचें महत्त्व फार आहे. मध्यंतरीं शत्रूनें इटालियन लोकांना घेरून अगदीं चीत केलें होतें. आणि इटली पुनः वर मान काढील कीं नाहीं याची सुद्धां शंका वाटत होती. पण परवाच्या जयांनीं ती शंका दूर झाली आहे. अलीकड बरेच दिवसांत आस्ट्रिया व जर्मनी यांच्या संयुक्त सैन्याचें पाऊल पियाव्हेच्या बाजूला मुळींच पुढें पडलें नाहीं, आणि आतां इटालियनांची सरशी झाल्याच्या या बातमीनें शत्रूंच्या शक्तीला त्या बाजूला उतरती कळा लागली असल्याचें स्पष्ट दिसत आहे.

इंग्लंड व फ्रान्सवर शत्रूंनीं केलेल्या वैमानिक हल्ल्यांपासून झालेली प्राणहानि मोठी आहे यांत शंका नाहीं. लंडनमध्यें ६३ लोक मेले व १८३ जखमी झाले, व पारिस मध्यें ४९ मेले व २०७ जखमी झाले. पण शत्रू कांहीं डाग न लागतां हातून निसटला असें झालें नाहीं त्यांचीं दोन विमानें नाश पावलींच. तथापि अजून इंग्लंडांतला विमानांचा बंदोबस्त समाधानकारक नाहीं असें ह्मणणें भाग आहे व कॉमन्स सभेंत याविषयीं प्रश्न निघाला असतां मि० बॉनर लॉ यांना कसें तरी गुळमुळीत उत्तर देऊन वेळ मारून न्यावी लागली ही गोष्ट खोटी नाहीं. उलट ब्रिटिश व फ्रेंच वैमानिक ही स्वस्थ बसलेले नाहींत. शत्रूचीं पलटणें, ट्रान्सपोर्ट, रस्ते, व कारखाने यांच्यावर बांब टाकण्याचा त्यांचा उद्योग सुरूच आहे.

जर्मनींत मात्र मजुरांच्या संपांनीं गोंधळ उडवून दिला आहे असें दिसतें. बर्लिन व हामबर्ग येथेंच लाखो मजूर संप करून दारूगोळा तयार करण्याच्या कारखान्याचें काम बंद पाडून बसले होते. कील येथील आरमारावरच्या लोकांत ही संपाचें वारें संचरलें होतें ह्मणतात. संपाचें कारण लोक लढाईला कंटाळले आहेत हें होय. तह करा आणि पोटाला अन्न द्या या संपवाल्यांच्या दोन मागण्या आहेत. संपवाल्यांनीं बर्लिन येथें ट्राम गाड्या पालथ्या केल्या व पोलिसांशीं ही मारामारी केली. लोक राजसत्तेला कंटाळले आहेत. तिच्याच पायीं आतांपर्यंत लक्षावधि प्राणांचे बळी रणयज्ञांत पडले आहेत व राजसत्ता जाऊन लोकसत्ता स्थापित झाल्याशिवाय हें सत्र बंद व्हावयाचें नाहीं असें मजुरांच्या मनानें घेतलें आहे. तथापि लोकसत्तेची मागणी करणारा पक्ष अद्याप फारच दुर्बळ आहे असें ह्मटलें पाहिजे. एरवीं संपाचा येवढा वणवा इतक्या लवकर शांत झाला नसता. संपवाले कामावर आले नाहींत तर लष्करी सत्तेचा उपयोग करून त्यांची लष्करी कोर्टापुढें चौकशी होईल व फाशीची शिक्षा अपराध्यांस देण्यांत येईल अशी धमकी देतांच बहुतेक संपवाले वठणीवर आले. आज हा पक्ष दुर्बल आहे खरा, पण यावरून जर्मनींत वारा कोणत्या दिशेनें वाहूं पाहत आहे येवढें कळण्यास या गोष्टीचा पुष्कळ उपयोग होईल. जर्मनीच्या राज्यक्रांतीचा दिवस आतां फार दूर नाहीं याचें हें निदर्शक ह्मणण्यापुरतें बळ या संपांत खास आहे. या संपांचा एक परिणाम हा होईल कीं जर्मनीला चढाई करण्याचें काम लवकर हातीं घ्यावें लागेल पांच चार दिवसांतच साऱ्या जगाला चकित करून सोडणारें असें कांहीं तरी साहसाचें कृत्य जर्मनी खास करील अशी लोकांची अपेक्षा आहे.

जर्मनीला चढाईचें काम दिनावधीवर न टाकतां येण्याला आणखी एक कारण आहे. अमेरिकन फौज फ्रान्समध्यें सपाट्यानें उतरत आहे. थोड्या दिवसांपूर्वी अमेरिकन वॉर सेक्रेटरी यांनीं सेनेटपुढें सांगितलें कीं लवकरच १० सैन्य लक्ष थोडेच दिवसांत फ्रान्स मध्यें उतरेल व चालू सालीं आणखी १० लक्ष पाठविण्याची अमेरिकेची तयारी आहे. इतकी कुमक मिळाल्यावर मित्रराष्ट्रांना पुष्कळच जोर येऊन ते जवळ जवळ अजिंक्य होऊन बसतील. त्याच्या पूर्वीच कांहीं तरी तरी अचाट कृत्य करून आपली गेलेली छाप बसविल्याशिवाय जर्मनीला आतां गत्यंतर नाहीं. हें अमेरिकन सैन्य फ्रान्सच्या किनाऱ्यावर उतरण्यापूर्वीच त्यांचीं जहाजें समुद्रांस्तृप्यन्तु करण्यासाठीं सबमरीन, टॉर्पेडो वगैरेंचा उपयोग करण्याचा घाक जर्मनीनें घातला आहे. प्रत्यक्ष तसे प्रयत्न सुद्धां शत्रूनें केले आहेत, पण ते निष्फळ झाले. कदाचित्‌ झटली ह्मणजे असे प्रकार थोडे बहुत घडावयाचेच हें अमेरिकन लोक सुद्धां जाणून आहेत. पण हें नुकसान कमी व्हावें, निदान आपल्या बरोबर त्या हानींत शत्रूला ही पातीदार घेतां यावें ह्मणून अमेरिकन लोकांनीं एक युक्ति केली आहे. युद्ध जाहिर करण्याचे वेळीं ज्या जर्मन बोटी अमेरिकन किनाऱ्यावर पकडल्या गेल्या त्यांतूनच हें सैन्य नेण्यांत येतें. त्यामुळें आपल्याच बोटी बुडवितांना जर्मनी थोडा तरी कचरेल कारण, बोटी कांहीं सहानसान नाहींत अमेरिकन लोकांच्या तत्परतेची कमाल ह्मटली पाहिजे. त्यांचा स्वदेशाभिमान इतका जाज्वल्य आहे व व्यवस्था इतकी सुयंत्रित आहे कीं त्यांनीं एका महिन्यांत जेवढी तयारी केली तेवढी करण्यास जर्मनीला एक वर्ष पुरलें नसतें. शाळेच्या विद्यार्थ्यांत सुद्धां लढाईवर जाण्यासाठीं येवढी अहमहमिका लागली आहे कीं शेवटीं मे. विल्सन यांना विद्यार्थ्यांस उद्देशून एक पत्र लिहावें लागलें. त्यांत त्यांनीं ह्मटलें आहे कीं अमेरिकेंत जर्मनीला पुरून उरतील इतके तरुण युद्धावर जाण्यास तयार असल्यावर विद्यार्थ्यांनीं आपल्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करण्याचें

…च नाहीं. विद्यार्थ्यांनीं आपला उत्साह …यासांत खर्च करून लढाईवर गेलेल्या …या कारखान्यांतल्या व कचेरीतल्या लवकर भरून काढाव्या, म्हणजे त्यांच्या हातून मोठी देशसेवा झाली आम्ही समजूं.

---

अमेरिकेची ही विलक्षण तयारी पाहून …ला मोठी चिंता उत्पन्न झाली असली …नि यांत नवल नाहीं. असें ही म्हणतात …र्मनीनें अमेरिकेला तिऱ्हाइतामार्फत ही सुचविलें आहे कीं तुम्हीं मित्र-…ना पैसे, दारूगोळा, अन्नसामुग्री, व …घपाणी यांची हवी तेवढी मदत करा, लढाऊ फौज पाठवूं नका. येवढी …ानी केल्यास आमच्या सत्प्रदेश बोटी …या वाटेस बिलकुल जाणार नाहींत. ही बातमी खोटी आहे असें कळतें. …नीच्या शब्दावर किती भरंवसा ठेवायाचा अमेरिकन लोक पूर्णपणें जाणून आहेत. …ाप त्यांना आपली पत कशी ठेवून …वी हें ही चांगलें कळत आहे. स्वाभि-…ाला कलंक लावणारा असा करार ते …ीं ऐकावयाचे नाहींत. प्रस्तुतच्या युद्धांत …िरची मात आपण करूं आणि डाव …कूं व १९१८ सालाच्या प्रारंभींच युद्धाची …ाप्ति करून विजयश्रीनें माळ घातलेले …पण परत स्वदेशाला जाऊं अशी अमेरि-…न लोकांची खात्री असल्याबद्दल एका …मेरिकन सेनापतीचे उद्गार प्रसिद्ध झाले …हेत. या सेनापतीच्या म्हणण्याप्रमाणें अ-…खी एका वर्षानें तह झाला पाहिजे …सें आहे. हा तह कशा प्रकारचा असेल …ाचें स्थूलमान वरील उद्गारांवरून कळ-…ायासारखें आहे.

## आशा किरण.

गेल्या बुधवारी व्हॉइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड …नीं आपल्या वरिष्ठ कायदे कौंसिलांत जें …ास्ताविक भाषण केलें तें नव्या वस्तुस्थितीला विशेष अनुकूल असून त्यांतील उत्तरार्ध तर प्रोत्साहनपर असा होता. लॉर्ड चेम्सफोर्ड मांटेग शिष्टाईला अनुलक्षून असा आनंदोद्गार काढतात कीं 'या शिष्टाईनें राज्यकर्त्यांस उदार मतांचें शिक्षणच मिळालें आहे. आणि २० आगस्टचा बादशाही जाहीरनामा कृतींत उतरविण्याचा त्यांनीं आपल्या कौंसिलदारांसमक्ष संकल्प ही सोडला. कांग्रेस लीगची योजना श्रीमंत चक्रवर्ती बादशहास अर्पण करण्यासाठीं जी शिष्ट मंडळी विलायतेस जाणार आहेत त्यांच्या त्या शिष्टाईबद्दल ही लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं आनंद प्रदर्शित करून राजश्री मांटेग्यु यांच्या मुत्सद्देगिरीची त्यांनीं विशेष तारीफ केली. वरिष्ठ कायदे कौंसिलांत ही राष्ट्रीय सभेची पहिली संभावना होय.

## सुस्वागतं.

( अंतःकरणांतली विद्युत )

अंतःकरणाचें स्वागत कसें रमणीय असतें, हृदयें परस्पर विजेसारखी कशी खेळू लागतात आणि आबालवृद्ध लोकसमूह ज्या तन्मयतेनें आपल्या ध्येयाच्या श्रीमान् मूर्तीपुढें कसा आनंदानें बागडूं लागतो याचें मनोहर चित्र पाहणें असल्यास, किंबहुना प्रत्यक्ष अनुभव घ्यावयाचा असल्यास हल्लीं श्री टिळक यांचा जो आमच्या प्रांतीं दौरा चालू आहे त्यापैकीं एखाद्या मुक्कामाला हजर राहण्याविषयीं आम्ही मुद्दाम आग्रहाची सूचना करितों. स्वराज्याचें नवें वातावरण किती तरी आनंदमय आहे आणि मग तेथें संकटें, अडचणी व विघ्नें कशीं दूर पळून जातात आणि सध्याच्या विपत्तीच्या खडकाळ दशेंत ही लोक हजारो रुपये कोठून व कसे श्री टिळक यांच्यापुढें सत्कार्याचा नजराणा म्हणून अर्पण करितात हे इंडियन सृष्टी मधील दहावें अगम्य गूढच होय. गांवोगांवच्या इतिहासांत अश्रुतपूर्व अशा प्रचंड लोकसमूहांच्या सभा खंडवा, बऱ्हाणपूर, मलकापूर, बुलढाणा, चिखली, खामगाव, नांदुरा, जळगांव, शेगांव, तेल्हारा, आकोट, इत्यादि ठिकठिकाणीं भरतात, आणि श्रीमान् टिळक साहेब आपला स्वराज्याचा दासबोध लोकांस शिकवितात, तेव्हां पांच पांच हजार दहा दहा हजार लोक अत्यंत आतुरतेनें, श्रवण भक्तानें व प्रसन्न चित्तानें सर्व तो बुद्धिवाद ग्रहण करितात; इतकेंच नाहीं तर ते आपल्या मुग्ध वक्तृत्वानें, टिळकांच्या मुखानें श्रीमान चक्रवर्ती जार्ज बादशहास आपलें हृद्गत विद्युत संदेश पाठवीत आहेत कीं काय असा क्षणभर भास होतो. ही निराळीच राजकीय दैवी शक्ती लोकांच्या मनःसृष्टींत प्रदीप्त झालेली आहे आणि तिचें स्वागत आमच्या राज्यकर्त्यांस तितक्याच दैवी उच्चशीलाच्या शिखरावरून करावें लागेल. इंडियन प्रजेच्या दैवी शक्तीचें ब्रिटिश सरकारच्या दैवी शक्तीला हें आमंत्रणच आहे. आणि आम्हास उमेद आहे कीं ब्रिटन लोकांची उच्चतम पूर्वपरंपरा, उदार श्रेष्ठबुद्धी आणि या लढाईनें सुसंस्कृत झालेली श्रेष्ठ लोककल्याणेच्छा हीं जागृत होऊन श्री टिळक यांची विलायतची शिष्टाई श्रीमान जॉर्ज बादशहा यशस्वी, आनंदमय व संवर्धनकारक करोत.

# वऱ्हाडवृत्त.

काल रविवारीं दोनप्रहरीं ४-५ वाजण्याच्या सुमाराला श्री टिळक यांची स्वारी तेल्हाऱ्याची सभा आटपून आकोटास मोटार-मार्गानें दाखल होणार होती. आज सकाळीं आकोल्यास हे येणार असून शिवणीवरील रावबहादुर अण्णासाहेब महाजनी यांच्या बंगल्यावर उतरतील आणि तिसऱ्या प्रहरा नंतर येथून वाशिमाकडे रवाना होणार आहेत. येथील जाहीर व्याख्यानाचा खटाटोप कमी केला असून फक्त लोक आपापला स्वराज्याचा नजराणा त्यांच्यापुढें ठेवणार आहेत.

बुलढाण्याच्या स्त्रीवर्गाकडून श्रीमती सौ. जानकीबाई कानिटकर यांच्या हस्तें श्री थैली अर्पण करण्यांत आली ती खामगांवास मोजून पाहिली तर १७० रुपये भरले. स्त्रियांच्या या पुढाकाराचें आम्ही मनःपुरस्सर अभिनंदन करितों.

**लष्करच्या भाकरी**—रा. रा. गंगाधर गणेश जोशी आणि शेठ श्रीराम हनुमानबक्ष दहिगांव यांस तेल्हाऱ्याच्या बेंच कोर्टावर ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमण्यांत आले आणि रावसाहेब विष्णु गणेश कुळकर्णी गायगांव आणि शेट श्रीराम सूरजमल अकोला यांस आकोला बेंच मॅजिस्ट्रेट नेमण्यांत आलें. या चारी गृहस्थांचें आम्ही अभिनंदन करितों आणि पुढील ९ वर्षांच्या कामगिरीनें त्यांच्या अंगीं सार्वजनिक कार्याची अधिक उत्सुकता येईल तर आम्ही तो या लष्करच्या भाकरीचा सद्गुण समजूं.

रा. रा. महमद जैनुल आबेदीन नायब तहशिलदार यवतमाळ यांस आफिशिएटिंग तहशिलदार नेमण्यांत आलें.

**शेतकी प्रदर्शन**—काल व आज ऋणमोचन येथें उमरावती व आकोला या दोन्ही जिल्ह्यांचें संयुक्त प्रदर्शन भरविण्यांत येत आहे ही मोठी संतोषाची गोष्ट होय.

**वणी जत्रा**—वणी येथें १८ मार्च पासून १ महिनाभर जत्रा भरत असते, तिचा फायदा घेऊन ता. २३ ते २६ मार्च पर्यंत मुलांचे खेळ, जनावरांचें प्रदर्शन, धान्याचें प्रदर्शन, शर्यती, कुस्त्या इत्यादि पुष्कळशा करमणुकीच्या गोष्टी तेथें होणार आहेत.

**ऊंस**—वऱ्हाडांत ऊंसाची लागवड नुकतीच अलीकडे थोडी थोडी वाढत आहे; पण यंदा हे ऊंसाचें क्षेत्र १६७९ एकर म्हणजे मागल्या वर्षीपेक्षां २९० एकरांनीं कमी आहे. तरी उत्पन्नाच्या मानानें ऊंस सुधरत असून यंदा ३३०९ टन पीक येईल असा अंदाज आहे. मध्यप्रांतांत ऊंसाचें उत्पन्न २८ ते २९ हजार टनापर्यंत होण्याचा रंग आहे.

**मुंबई पद्धतीनें** दारूचीं दुकानें देण्याची अबकारी कचेरीची पद्धति पश्चिम वऱ्हाडांत यंदाच्या १९१८–१९ साला पुरतीच कायम राहून पुढें ती बदलण्यांत येणार आहे. तेव्हां अबकारीच्या मक्तेदारांनीं यंदाच्या महागाईकडे पूर्ण लक्ष पोंचवून नंतर मक्ते घ्यावे आणि तसें करतांना १९१९–१९२० सालाची आशा ठेवूं नये.

सर हेनरी ड्रेक ब्रॉकमन ज्युडिशियल कमिशनर हे येत्या शनिवारपासून ३ महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जाऊन उन्हाळ्याच्या सुटी नंतर परत रुजू होतील.

रा. रा. जे. के. बॅटन हे या रजेंत ज्युडिशिअल कमिशनर होऊन नामदार रा. रा फिन्डले यांस आडिशनल ज्युडिशिअल कमिशनर नेमण्यांत आलें.

यंदाची प्रांतिक परिषद तारीख ३०।३१ मार्च रोजीं रायपूर येथें भरणार असून रावबहादुर चौबरी हे तिच्या पूर्व तयारीला मोठ्या नेटानें लागले असून लोकांचा उत्साह वर्णनीय आहे.

**तुलसीपत्र**—गेल्या मंगळवारीं सर जगदीशचंद्र बोस यांची स्वारी परत कलकत्त्याला गेली. तेव्हां नागपुरास रेल्वे स्टेशनावरच कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं १७९ रुपयांची थैली त्यांस अर्पण केली. विद्यार्थ्यांचें हें तुलसीपत्र त्यांनीं मोठ्या प्रेमभावानें स्वीकारून मोठा कळकळीचा उपदेश करून राष्ट्राचें खरें वैभव शास्त्रीय शोधांच्या प्रगतीवर कसें अवलंबून आहे तें थोडक्यांत सांगितलें.

**हिरा भंगला**—आकोल्याच्या विद्यार्थ्यांनीं आपल्या हड मास्तरास सर जगदीश बोस यांचें अर्चन वर्गणीद्वारा करण्याविषयीं परवानगी मागितली होती, पण त्यांत त्यांचा हिरमोड झाला. ही बालअंतःकरणाची स्फूर्ती म्हणजे राष्ट्रीय हिरे होत. पण ते जेव्हां असे भंगतात तेव्हां शिक्षक शिष्य यांच्या मधील सौजन्य मात्र व्यक्त होतें.

**वर्गणीचे आंकडे**—जो कोणी श्री टिळक यांच्या कार्यांत अंशतः तरी सामील होतो तो आपणास धन्य समजतो. जो नुस्ता सभेला हजर असतो तो स्वतःच्या नेत्रांचें साफल्य झालें असें समजतो. जो कोणी त्यापेक्षांही अधिक कार्यभाग उचलतो, तो तर स्वतःला पावन झाला असें मानतो आणि वर्गणीच्या द्वारां किती तरी लोकांनीं आपले हस्त पुण्यमय करून घेतले आहेत. त्या पुण्यवानांचीं नांवें आम्ही देऊं शकत नाहीं. तथापि त्यांच्या त्यांच्या ग्रामांचें नाम संकीर्तन त्यांच्या द्रव्याच्या आंकड्यासह खालील प्रमाणें करतों.

| स्थळ | रुपये |
|---|---|
| खांडवा | ३५०० |
| बऱ्हाणपूर | २००० |
| मलकापूर | ४५०० |
| बुलढाणा | २५०० |
| चिखली | २००० |
| खामगांव | ७००० |
| नांदुरा | १००० |
| जळगांव | ५००० |

या शिवाय तेल्हारा, आकोट या ठिकाणीं एवढीच रकम जमा होईल असा कच्चा तर्क आहे.

**भाषणबंदी**—डॉक्टर नरहर शिवराम परांजपे यांच्या कडून १ हजारांचा जामीन मागण्यांत आला असून त्यांचीं व्याख्यानें बंद करण्यांत आलीं आहेत. हा चौकशी यवतमाळास येत्या २९ च्या तारखेस चालणार आहे.

**पुसद** येथें उद्या व परवा नामदार श्रीपाद बळवंत तांबे यांच्या अध्यक्षतेखालीं जी जिल्हा परिषद भरणार आहे तेथें पहिले दिवशीं राजश्री टिळक हे वाशिमची सभा आटपून हजर राहणार आहेत आणि त्यामुळें कांहीं अलौकिक समुत्साह पुसद येथें दिसून येत आहे.

बुधवार तारीख १३ रोजीं राजश्री टिळक कारंजाची सभा आटपून मुर्तिजापूरला येऊन पुढील मुक्काम येणें प्रमाणें ठरले आहेत. ता० १३ पुल्गांव, १४ आर्वी, १५।१६ चांदा, १७ वणी, व पांढरकवडा; १८ वरोडा, वर्धा, सिंदी, १९ उमरेड, २० कळमेश्वर, कोहोळी, काटोल, २१ भंडारा.

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआत्माराम छापून प्रसिद्ध केलें.

Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

## Berar-Samachar.

वर्ष ८२] आकोला---सोमवार तारीख १८ माहे फेब्रुवारि सन १९१८ ई० [अंक ७

सर्व औषधांचा राजा.

# अमृतबहार.

(२०० रोगांवर चालणारें एकच औषध)

सदर्हू औषध घरांत असल्यास कोणत्याही प्रकारें इतर औषधाची जरुर पडत नाहीं. खरूज, गजकर्ण, खोकला ताप, महामारी, प्लेग, गरमी, परमा, डोकेंदुखणें, पोटदुखणें, दाढदुखणें, दमा, थंडी, हॉव वगैरे वर मूल्य १ बाटलीस रुपये २ अर्धशिशी करन ठणकणें वगैरे सर्व प्रकारचे २०० रोगावर आणि रामबाण आहे. ट. ख. निराळा. जागोजागीं एजंट पाहिजेत.

पत्ता

भाई रामसिंग ॲन्ड सन्स मॅनेजर
अमृत बहार कंपनी सुजाबाद
जिल्हा मुलतान (पंजाब)

नो. नं. २०

# लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आम्ही येथें मिळणारा कापड, किराणा. स्टेशनरी, कांचसामान दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचे सामान** वैगरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारें सर्व सामान मोटारचे व घाडे गार्डांचे गाद्यांचे कापड, व दुसरें लागणारें सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजचे सामान, ल्यांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपण बद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट
मुंबई नंबर २

नो. नं २१

शक्तिदायक; रामबाण पुनानी इलाज.

**संजीवनी पाक**



यांत प्रवाळ, मौक्तिक शीलाजतु, कस्तुरी अंबर इत्यादि अमोल औषधें वापरलीं आहेत. प्रमेह, धातुक्षीणता, अग्निमांद्य इ० रोगांवर वस्ताद २० तोळ्यास १ रु. ट. ख. नि.

असंख्य सार्टिफिकिटें व पदकें प्राप्त!

संजीवनी दवाखाना -खामगांव
(वऱ्हाड)

नो० नं० ३६

### एका रुपयांत २५ फोटो.

(सिल्हर प्रिंटस्)

वऱ्हाडांतील नामांकित साधू संतांचे फोटोचा अमूल्य संग्रह. सर्व लोकांस वरील साधू संतांचे फोटोचा लाभ अल्प किंमतींत व्हावा एवढ्या करितांच किंमत फार अल्प ठेविली आहे. प्रती थोड्याच शिल्लक आहेत तरी त्वरा करावी.

आमचेकडे सर्वतऱ्हेच्यीं फोटोचीं कामें (एनलार्जमेन्टस) वगैरे माफक दरानें केली जातात.

जी. डब्ल्यू. शिदोरे.
फोटो आर्टिस्ट, अकोला

नो० नं० ७६

### जाहिर नोटीस

रा. रा. नथु रावजी पाटील राहणार माळेगांव बाजार ता. आकोट

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, तुम्हास आम्ही कोर्टाचे कामास मुखत्यार या नात्यानें नौकर ठेवून पांच रुपयांचे स्टांपावर तारीख २०-९-१६ इसवी रोजीं मुखत्यारपत्र रजिष्टर करून दिले होते. करितां तुम्हास आम्ही नौकरीवरून सोडून तुमचा हिशोब चकता करून देऊन कोणतेच प्रकारें देव घेव राहिली नाहीं आमचे वतीनें कोणाशीं व्यवहार कोणतेच प्रकारचा करूं नये. केल्यास रद्द असे. करितां तुमचे मुखत्यारपत्र तारीख १४।१२।१७ इसवी पासून रद्द केलें आहे. कळावें तारीख ५-२-१८ इ०

सही

मोतीलाल गेंदुलाल रा. माळेगांव
बाजार द. खुद

नो. नं. ७७

### नोटीस

नोटीस बेशमी जोहरमल शंकरदास रा. अंदूरा ता. बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिशीनें कळविण्यात येते कीं, आमच्या दुकानीं तुमचे देणें घेणें आहे. आपण आपलें खातें रुजू करून घेऊन वहीवर तिकीट लाऊन सही करून दिली आहे त्यास आज बरेच दिवस झाले. आपणास व्याजा वगैरेचा हिशोब करून पैसे मागितले असतां आपण हो हो म्हणतां पण हिशोबास ही येत नाहीं व पैशाची ही आदा करीत नाहीत. यावरून आपल्या मनांत कांहीं तरी काळें असावें असें वाटतें. सबब या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत व्याजासह सर्व रकम आदा करावी. व या नोटिशीचा ही खर्च द्यावा. असें मुदतींत न झाल्यास योग्य कोर्टांत दाद मागणें भाग पडेल. व मग आपणास कोर्ट खर्च व या नोटिशीच्या खर्चासह सर्व रकम भरून द्यावी लागेल. कळावें ता. ८।२।१९१८

सही

खुशालराव चाहादूजी आणि कंपनी
वहिवाटदार मालक गोविंद विठ्ठल
कुळकर्णी तर्फे मुखत्यार गणपत
उर्फ गायकवाड रा. अंदुर
द. खुद

नो. नं. ७८

### नोटीस

नोटिस बेशमी नामू वा माहादाजी कुंभार व जबूल्या वा बापूजी साळी उभयता रा. कारंजा ता. मुर्तिजापूर जि. आकोला

यास:—

खालीं सही करणार यांजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते आहे कीं, तुम्ही मला तारीख १७ माहे दिसेंबर सन १९१७ इ. रोजीं एक लाख १००००० विटा दर हजारीं चार रुपये देण्याचा करार करून सवदा चिठ्ठी लिहून दिली आहे. सदर्हू विटा नऊ इंच लांब साडेचार इंच रुंद अडीच इंच जाड या प्रमाणें देण्याचे कबूल करून पांच रुपये इसाराब द्दल तुम्ही मजजवळून घेतले आहेत. व उदईक करारनामा लिहून देतो असें लिहून दिलें आहे. त्याप्रमाणें करारनाम्याचे कागद-पत्र ही मजजवळ आणून दिले व थोडा बहुत करारनामा ही लिहिला गेला आहे. करितां या नोटिशीनें कळवितो कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून तीन दिवसाचे आंत करारनामा मजजवळ आहे तो पुरा करून द्यावा. व रुपये अडव्हान्स लागत असल्यास जामीन देऊन रुपये न्यावेत तसें न केल्यास चार दिवसपर्यंत तुमची वाट पाहून बाजार भावाप्रमाणें तुमचेवर दिवाणींत दावा आणणें मला भाग पडेल. व माझें नुकसान होत आहे त्याबद्दल ही दावा आणावा लागेल करितां या नोटिशीनें तुम्हास जाहीर केलें आहे. या नोटिशीचा खर्च सर्व तुमचेवर आहे व पुढें लागणारा सर्व खर्च तुमचेवर आहे. कळावें ता. ९ माहे फेब्रुवारी सन १९१८

सही

हसनअली वा अबदुलअली बोहरी
रा. कारंजा द. खुद

नो. नं. ७९

### नोटीस.

माशुम मर्दे सुभानखां किंवा माशुम वा॥ हयादखां रा. मंगरुळपीर दिवाणपुरा ता॥ मंगरुळपीर जि० अकोला

इसमास.

खालीं सही करणार यांजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तूं माझे लग्नाची बायको असून तुझे माझे लग्नास १० दहा वर्षे सरासरी झाले आहेत व तुझे पोटचा एक मनसफ नांवाचा २॥ अडीच वर्षांचा १ मुलगा आहे. मुलगा १॥ दिड-वर्षाचा झाल्यापासून तूं मुलाची पर्वा न करितां तू आपले आईचे व भावांच फंद फितुरानें औषध घेण्याचा बहाणा करून येथून माझे विनपरवानगीनें चोरून भावा सोबत निघून गेलीस यास सरासरी दिड वर्षही झाले. १॥ वर्षाचे आंत मी तुजला नेण्याकरितां ७।८ वेळां तुझे माहेरी आलो व तऱ्हाळ्याचे व तुझ्या गावचे पंचलोक ही होते परंतु त्वां आपले आई भावाचे फितुरानें येण्याचें साफ नाकारलेस त्याज-वरून तुझा व तुझ्या आई भावाचा मला त्रास देण्याचा विचार दिसतो व मग विनाकारण दुसरे लग्न करण्याचे खर्चांत बुडविण्याचा तुझा व तुझे आई भावाचा विचार दिसतो. व विनाकारण तूं व तुझे आई व भाऊ खोट्या व बेइज्जत होण्या-सारख्या गप्पा कंड्या उडवित आहां तरी हें असें करणें चांगलें नाहीं. तरी आतां मी तुला तुझे आई भावासह त्रीवर्गास ह्या नोटिशीनें कळवितो कीं त्वां १५ दिवसाचें आंत माझे घरीं येऊन सुखानें नांदावें. नाहींपेक्षां मी दुसरें लग्न अगर मोहतीर केल्यास त्याचा तो खर्च तुझा तिवाजवळून मी घेईन व माझी दुसरा नवरा करण्याची परवानगीही नाहीं. मी तुजला तुझे मर्जी प्रमाणें वागविण्यास तयार आहे व तूं मजवर तुझे आई भावाचे फितुरानें खावटी कपड्याचा खर्च दावा आणणार आहेस तोही मजला कबूल नसून सर्व चुकी तुझीच आहे. या नोटिशीचा खर्च तुझा तिवावर आहे. असें तुजला या नोटिशीनें कळविलें आहे तर नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत कांहीं तरी व्यवस्था करावी न केल्यास जे आम्हास रितीप्रमाणें करणें तें आम्ही करूं व या नोटि-शीच्या खर्चासह सर्व खर्च भरून घेऊं. कळावे ता० १२।२।१८ इ.

सही

सुभानखां वा अबदुलखां रा०
तऱ्हाळा द. खु.

नो. नं. ८०

वऱ्हाडसमाचार

माघ शुद्ध ८ पिंगल संवत्सर १८३९

## नेमस्तांतले नेमस्त कीं धूर्तांतले धूर्त?

राजकीय चळवळींच्या संबंधांत वस्तुतः नेमस्त आणि जहाल असा पक्षभेद आतां उरलाच नाहीं. सुरत कांग्रेसच्या वेळीं व यानंतर ही किंत्येक वर्षे असे पक्ष होते, पण प्रस्तुत युद्धानें जी एकंदर परिस्थिति बदलून टाकली तिच्यामुळें दोन्ही पक्ष शहाणे झाले आणि त्यांनीं 'देवाण घेवाण' करून तो पक्षभेद मोडून टाकून एकच राष्ट्रीय पक्ष अस्तित्वांत आणिला. तसें करतांना दोन्ही पक्षांनीं आपापला दुराग्रह सोडला. सरकारशीं फटकून वागावयाचें, सरकारी नोकऱ्यांवर बहिष्कार घालण्याचा उपदेश करावयाचा, किंवा स्थानिक स्वराज्यासारख्या संस्थांना केरसुणीचें स्वराज्य असें निंदाव्यंजक विशेषण देऊन लोकांमध्यें त्याविषयींचा तिरस्कार उत्पन्न करावयाचा हा क्रम जसा जहालपक्षानें टाकून दिला, त्याचप्रमाणें आंग्लो—इंडियनांच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा, राष्ट्रीय संस्थांकडे व चळवळींकडे साशंक दृष्टीनें पाहण्याचा आणि लोकमान्य पुढाऱ्यांचा पदोपदीं उपमर्द करावयाचा; हा आपला क्रम नेमस्त पक्षानें ही सोडून दिला आहे आणि आतां दोन्ही पक्षांचे पुढारी हातांत हात घालून राष्ट्रहिताच्या प्रश्नांचा विचार पक्षाभिमानाच्या नव्हे तर राष्ट्रहिताच्या दृष्टीनें करूं लागले आहेत. असें आहे तरी अजून एखादा धर्मशचंद्र राय शेंडे नक्षत्रासारखा राजकीय चळवळीच्या वातावरणांत केव्हां केव्हां दिसूं लागतो व आपल्या दर्शनानें राष्ट्रीय कार्य करणारांस अपशकुन करूं पाहतो. हें शेंडें नक्षत्र गेल्या नोव्हेंबरांत दिसलें होतें व त्यानंतर आतां पुनः दिसूं लागलें आहे. गेल्या आठवड्यांत कलकत्त्याच्या 'बंगाली' पत्रांत मि. राय यांनीं 'आपल्या देश बांधवांस विनंति' म्हणून एक पत्र प्रसिद्ध केलें आहे. या विनंतिपत्रांत नवीन असा एक ही मुद्दा नाहीं. आपल्याहून भिन्न मताच्या लोकांच्या चळवळी सरकाराला संकटांत घालणाऱ्या आहेत, ते लोक लेखांनीं व भाषणांनीं सरकारी अधिकाऱ्यांविषयीं लोकांत तिरस्कार व द्वेश उत्पन्न करीत आहेत, जाती जातींत द्वेषाग्नि वाढविण्याकडे त्यांची प्रवृत्ति आहे, ज्या त्या बाबतींत सरकारला विरोध करावयाचा हें त्यांचें व्रत आहे, जबाबदारीची राज्य पद्धति सध्याच्या काळीं मागणें म्हणजे अंधारांत अविचारानें उडी घेण्यासारखें मूर्खपणाचें आहे, लोकांत शिक्षणप्रसार झाल्याशिवाय अशी सुधारणा एकदम मागणें म्हणजे फ्रान्सच्या राज्यक्रांतीसारखें भयंकर संकट देशावर ओढून आणण्यासारखें आहे, पतित जातींचा उद्धार करण्यासारख्या सामाजिक सुधारणेकडे आपण लक्ष देत नाहीं व नुसत्या राजकीय सुधारणेचाच निदिध्यास घेतों हा आत्मघातकीपणा आहे, वगैरे हल्लींच्या चळवळीसंबंधांत, सरकारी अधिकाऱ्यांचें मन दूषित करणाऱ्या जेवढ्या गोष्टी या नेमस्तांतल्या नेमस्ताला एका पत्रांत कोंबतां आल्या त्या त्यानें कोंबल्या आहेत. त्या लिहितांना सत्यासत्यतेचा, युक्तायुक्ततेचा, देशाच्या हिताहिताचा कशाचाच विचार लेखकानें केलेला दिसत नाहीं. त्यानें केलेलीं विधानें मोघम आहेत म्हणूनच तीं पीनल कोडाच्या कलमांखालीं येऊं शकत नाहींत. तथापि तीं राष्ट्रीय पुढाऱ्यांसंबंधानें भलताच ग्रह उत्पन्न करून देणारीं, खोडसाळ, आणि दुष्टबुद्धीचीं आहेत. हल्लींची राजकीय चळवळ व तिची दिशा मि. राय यास कदाचित् मान्य नसतील, पण त्यावरून त्यांना सरकारी अधिकाऱ्यांविषयीं द्वेश उत्पन्न करणाऱ्या किंवा जाती जातींत द्वेषाग्नि भडकावणाऱ्या आहेत असें म्हणणें हें नेमस्तपणाचें लक्षण आहे काय? मि. राय यांनीं आपल्या लेखांत मधून मधून एक दोन वेळां ना. गोखले, आनंदमोहन बोस, सर फेरोजशहा मेथा व मि. डब्ल्यु सी. बॉनर्जी यांच्या सारख्या थोर नेमस्त पुढाऱ्यांच्या नांवांचा आदरपूर्वक उल्लेख करून आपलीं मतें त्यांच्या सारखींच आहेत असें भासविण्याचा यत्न केला आहे. पण वरील चारी पुढाऱ्यांचे लेख किंवा भाषणें वाचून पाहतां त्यांत मि. राय यांच्या विधानांस पुष्टि देणारा एक ही शब्द आम्हांस आढळला नाहीं. मि. राय यांच्या सारखीं खोडसाळ व निराधार विधानें करण्याइतके मूर्ख ते खास नव्हते. मोठ्याच्या नांवाच्या ढालीखालीं लपण्याचा मि. राय यांचा प्रयत्न त्यांचा नामर्दपणा मात्र चांगला व्यक्त करीत आहे. ब्रिटिश सरकारपुढें सध्या युद्धाचा मोठा प्रश्न आहे, अशा वेळीं हिंदुस्थानच्या राजकीय सुधारणेचा प्रश्न उपस्थित करून आपण त्यांना अधिक संकटांत घालूं नये असें मि. राय म्हणतात. मि. माँटेग्यु व ब्रिटिश प्रधानमंडळ यांना मि. राय यांच्यापेक्षां प्रस्तुत संकटाची अधिक चांगली माहिती असतां त्यानीं याच वेळीं हिंदुस्थानच्या राजकीय सुधारणेविषयींचें आपलें धोरण ता. २० आगस्ट रोजीं कां जाहिर केलें व मि. मांटेग्यु यांनीं याच वेळीं इकडे त्यासाठीं मुद्दाम येण्याची तसदी कां घेतली, येवढें सुद्धां ज्याला कळत नाहीं त्यानें राजकीय विषयावर लिहिण्यासाठीं हातांत लेखणी धरून हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांस शहाणपणा शिकविण्यास पुढें यावें ही कोण धृष्टता! ब्रिटिश राज्याची सररहा निंदा करून त्याविषयीं लोकांत कोणी तिरस्कार उत्पन्न करीत असेल व त्याचप्रमाणें जातीजातींत द्वेषाग्नि भडकावीत असेल तर त्याचा समाचार घेण्यास पीनल कोडासारख्या शस्त्रास्त्रांनीं सदैव सज्ज असलेले सरकारी अधिकारी काय निजले आहेत? त्यांना चिथावण्याचा चोमडेपणा मि० राय यांस कोणी सांगितला आहे? पतित जातींचा उद्धार व शिक्षणाचा प्रसार याविषयीं आमचे पुढारी उपेक्षा करीत आहेत असें म्हणणें म्हणजे केवढी धडधडीत लबाडी आहे! पतितोद्धाराचा प्रश्न समाजसुधारणेचा व राष्ट्रीय सभेच्या कक्षेंत न येणारा असतां ही कलकत्त्याच्या राष्ट्रसभेनें आजपर्यंतची आपली वहिवाट मोडून तो हातीं घेतला ही गोष्ट आमच्या पुढाऱ्यांच्या उपेक्षेचीच निदर्शक म्हणावयाची काय? शिक्षण सार्वत्रिक व मोफत करण्यासंबंधानें प्रत्येक प्रांतिक कायदे कौंसिलांतून खाजगी सभासद बिलें आणित आहेत व कित्येक म्युनिसिपालिट्या शिक्षणासाठीं स्वतंत्र पट्टी लोकांवर बसविण्यास तयार झाल्या आहेत वगैरे गोष्टी मि० राय यांच्या कर्णपथावर अद्याप हीं गेल्या नाहींत काय? मि० राय यांनीं केलेलें एक तरी विधान वस्तुस्थितीला धरून व सत्याला स्मरून केलेलें आहे काय? असेल तर त्यांनीं तें सप्रमाण दाखवावें. नसेल तर त्यांनीं आपल्या 'प्रिय देशबांधवां' विरुद्ध असलीं खोडसाळ विधानें जाणून बुजून कांहीं तरी दुष्ट किंवा नीचपणाच्या हेतूनें केलीं असावींत असा लोकांनीं तर्क केल्यास त्यांना कोणी दोष देणार नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांपुढें लांगूल चालन करणाऱ्या व स्वजनाची निष्कारण निंदा करून सरकारी अधिकाऱ्यांची कृपा संपादन करूं पाहणाऱ्या धूर्त व देशघातकी लोकांचा अशा प्रकारचा मार्ग असतो. तो मार्ग स्वीकारण्याइतका नीचपणा मि. रायसारखे लेखक करतील अशी आतांपर्यंत आमची समजून नव्हती. पण मि. राय यांचा प्रस्तुत लेख अशा प्रकारचा आहे कीं स्वार्थाच्या मोहानें अंध झालेल्या माणसाशिवाय दुसऱ्याच्या हातून तो लिहिला जाणें आम्हांस शक्य वाटत नाहीं. अद्याप ही कांहीं पराकाष्टेचे व प्रामाणिक नेमस्त आहेत हें आम्ही जाणतों व त्यांचा आमच्याशीं कितीही मतभेद असला तरी त्यांचे विषयींचा आमचे ठायीं असलेला आदरभाव तिळमात्र कमी होणार नाहीं. पण मि. राय यांच्या खोडसाळ लेखामुळें त्यांचे विषयीं असा आदरभाव मनांत राहणें केव्हांही व कोणालाही शक्य वाटणार नाहीं.

---

## अगदीं अक्कल शून्य !

हिंदुस्थानांत स्वराज्याची ऊर्फ होमरूलची चळवळ मिसेस बिझांट यांच्या नेतृत्वाखालीं जोरानें सुरू झाल्यापासून हिंदुस्थानचें निमक खाऊन त्याच्यावरच उलटणाऱ्या लॉर्ड सिडनहाम सारखे पेनशनर आंग्लो—इंडियनांनीं होमरूलची चळवळ हाणून पाडण्यासाठीं, निदान तिच्या संबंधानें विलायतेंतल्या लोकांचीं मनें दूषित करून ठेवण्यासाठीं हव्यातशा खऱ्या खोट्या गोष्टींचा प्रसार करण्याचा पद्धतशीर यत्न चालविला आहे. या उद्देशानें त्यांनीं विलायतेंत इंडो—ब्रिटिश असोसिएशन नांवाची संस्था स्थापून तिच्या द्वारें हें पुण्य (?) कार्य चालविलें आहे व या कामीं रूटरची एजन्सी व ख्रिस्ती मिशनरी वगैरे मंडळी ही त्यांना हातभार लावीत आहेत. बहुसंख्यक हिंदी लोकांच्याच आग्रहावरून ही संस्था आपण स्थापन केली आहे असें धडधडीत खोटें विधान या संस्थेच्या चालकांनीं केलें आहे. हे आग्रह करणारे हिंदी लोक कोण आहेत त्यांचीं नांवें मात्र या संस्थेनें प्रसिद्ध केलीं नाहींत. पुढें होमरूलची हिंदुस्थानची मागणी कबूल करावी अशा शिफारसीचा ठराव मजूर पक्षाच्या कॉन्फरन्सपुढें येऊन या असोसिएशनच्या सांगण्यावरून मागें घेण्यांत आला असें रूटरनें मुद्दाम तारेनें इकडे खोटेंच कळविलें. पण ज्ञातारीनें कोंबडें झाकलें तरी उजाडण्याचें थोडेंच थांबणार? सदर ठराव मागें घेण्यांत आला नसून कान्फरन्सनें मंजूर केला आहे अशी विश्वसनीय बातमी दुसरे दिवशीं येऊन रूटरच्या पदरांत खोटेपणाचें माप खासें पडलें. ख्रिस्ती मिशनरींना मिसेस बिझांटबाई विषयीं कपाळ शूळ वाटणें स्वाभाविक आहे. कारण, हे मिशनरी हिंदु धर्माची जी निष्कारण नालस्ती करतात व भोळ्या भाबड्या तरुणांना आपल्या जाळ्यांत अडकवितात त्या विरुद्ध सणसणीत टीका बाई इतकी आजपर्यंत कोणी केलेली नाहीं. तेव्हां त्यांच्या होमरूल चळवळीविषयीं गैरसमज पसरविणें हा कित्येक मिशनरींना ख्रिस्ताची अकरावी आज्ञाच वाटत असली पाहिजे, X एरवीं राजकारण हा आपला विषय नसतां जनरल बूथटकर सारखे लोक समाजसुधारणेसारखें पवित्र व महत्वाचें कार्य सोडून होमरूलाविषयीं बोलण्यास कां जाते? आणि त्यांना तरी पुढच्या सारखीं असत्य विधानें करून होमरूल विरोधाविषयींची आपली हौस पुरवून घेण्यास असत्याच्या पायावर उभा केलेल्या इंडो-ब्रिटिश असोसिएशनसारखी योग्य संस्था दुसरी कोणती मिळणार होती? या संस्थेपुढें जनरल बूथटकर यानीं सांगितलें कीं हिंदुस्थानांत देशी संस्थानें आहेत, म्युनिसिपालिट्या आहेत, डिस्ट्रिक्ट व लोकल बोर्डें आहेत, पंचायती आहेत, याच्या द्वारें शेंकडा ९० लोकांना स्वराज्यसुख जितकें अनुभवण्यास मिळत आहे तितकें साऱ्या जगांत दुसऱ्या कोणास मिळत नसेल! त्याच्या एक चतुर्थांश होमरूल ग्रेटब्रिटनच्या लोकांना देण्याचा जर कोणी प्रयत्न पार्लमेंटांत करतील तर ते सारे सोशियालिस्ट किंवा माथेफिरू र्‍याडिकल गणिले जातील ! ज. बूथटकर यांनीं हिंदुस्थानांत विशेषतः पंजाबांत गुन्हेगार जातींच्या सुधारणेबद्दल प्रशंसनीय चळवळ केल्यापासून त्यांचे विषयीं आम्हांला जो आदर वाटत होता तो या भाषणानें पार मावळला. कारण कीं सत्याची चाड ही माणसाच्या थोरपणाची खरी कसोटी आहे. देशी संस्थानांचा किंवा म्युनिसिपालिट्या व बोर्डें यांचा कारभार यांत लोकसत्तेचा कितीसा अंश असतो याची जनरल साहेबांना माहिती असून त्यांनीं जर वरील विधान केलें असेल तर तें निर्भेळ धडधडीत असत्य म्हटलें पाहिजे. नसेल तर त्यांच्यासारखे अक्कल शून्य तेच असें म्हणणें भाग आहे.

---

## देशी संस्थानें व संस्थानिक.

हिंदुस्थानच्या ब्रिटिश अमदानी खालच्या इतिहासांत एक काळ असा होता कीं तेव्हां आमच्या सारख्या ब्रिटिश रियासतींतल्या प्रजेमध्यें लोकसत्तेच्या उदयापासून होणाऱ्या उत्कर्षाची अंधुक सुद्धां कल्पना नसल्यामुळें

कोणातरी सत्तेच्या खालीं राहावयाचें, तर मग परकीयांच्या सत्तेखालीं राहण्यापेक्षां आपल्या देशी राज्यांतून राहणें चांगलें असें वाटत असे. पण आज तो मनु पालटला आहे. त्या वेळच्या राजेलोकांच्या बाणेदार वर्तनांत फरक पडला आहे आणि ब्रिटिश रियासतींतल्या प्रजेच्या आकांक्षा ही शिक्षणप्रसारामुळें वढून परवशतेचा तिटकारा वाटून ते आतां स्वराज्याचे अधिकार मागूं लागले आहेत. पण हें हिंदुस्थानच्या एकंदर ३१ कोट प्रजेपैकीं तीन चतुर्थांश भागाविषयीं झालें. बाकीच्या एक चतुर्थांशाची स्थिति काय आहे तें पहूं गेलों तर ती अत्यंत शोचनीय झालेली दिसेल. देशी संस्थानिक रयतेचा पैसा लाडी (बायका), वाडा (राजवाडे) व गाडी (मोटारगाड्या) यांच्या पायीं किती उधळतात, व किती रयतेच्या खऱ्या कल्याणाच्या गोष्टी करण्यांत खर्च करतात हें पहिलें ह्मणजे राजा प्रजेकरितां आहे कीं प्रजा राजाकरितां आहे असा प्रश्न मनाला घोटाळ्यांत घातल्यावांचून राहत नाहीं. कांहीं अपवादरूप असलेले फारच थोडे राजे वगळले तर बाकीचे कोणी शिकारीच्या नादांत, कोणी मल्लांच्या कुस्त्या पाहण्याच्या छंदांत, कोणी नाटक कंपन्यांचे आश्रयदाते बनलों या समाधानांत, कोणी वाडे बांधण्याच्या शोकांत, कोणी सट्ट्यांत; कोणी विलायतच्या प्रवासांत आणि कोणी पोलिटिकल एजंट व दुसरे युरोपियन (मग ते अधिकारी असोत कीं व्यापारी कंपन्यांचे एजंट असोत) यांच्यापुढें पुढें करून स्वतःचा मानमरातब वाढवून घेण्यात दंग असलेले आढळतील. ब्रिटिश सरकारचें उदाहरण पाहून दुष्काळासारख्या प्रसंगीं दुष्काळग्रस्ताच्या दुःख निवारणार्थ कांहीं रकम लाजेकाजेस्तव ते काढून ठेवतात, पण ती रकम सत्कार्यालाच लागली आहे हें कोण पाहतो? कोणी आपल्या राज्यांत अमुक वर्षांत सक्तीचें व मोफत शिक्षण सुरू करण्याबद्दलचा जाहिरनामा प्रसिद्ध करून वर्तमानपत्राकडून फुकटची स्तुति गाऊन घेतात, पण वर्षानुवर्षे तो शिक्षणाचा प्रश्न तसाच पडून राहतो व तयार केलेली योजना तरी कसा प्रकारची आहे त्याचा गंधसुद्धां आपल्या प्रजेला मिळूं देत नाहींत! अमुक संस्थेला दहा हजारांची किंवा पंचवीस हजारांची देणगी दिली असें मोठ्या आढ्यतेनें सांगून वर्तमानपत्रकर्त्यांकडून पाठ थोपटून घ्यावी, पण वर्षानुवर्षे ती देण्यांत येऊं नये असे प्रकार प्रत्यक्ष घडलेले आह्मांस माहित आहेत. लोकमताला मान देतों असें दाखविण्यासाठीं वचनांची रेलचेल करावी, पण प्रत्यक्ष कांहीं एक देऊं नये या बाबतींत इंग्रज सरकारला सुद्धां ते धडा देऊं शकतील. कित्येक संस्थानांतून वर्तमानपत्रे आहेत, पण त्यांचे संपादक तरवारीच्या धारेखालीं निर्भीडपणें राज्यकारभारावर टीका करतील अशी अपेक्षा तरी कशी करतां येईल! अशा संस्थानांविषयीं अभिमान तो कसा व कां वाटावा? आणि हीं संस्थानें खालसा होऊन एकंदर हिंदुस्थानच्या प्रगतीच्या मार्गांतला हा कांटा दूर झाला तर किती चांगलें होईल, असें संस्थानी प्रजेस व त्यांच्या ब्रिटिश अमलाखालच्या भाऊबंदास वाटल्यास त्यांत त्यांचा काय दोष आहे?

---

## विद्याप्रसार

राष्ट्रोन्नतीचें मूळ शिक्षण प्रसार हें आहे ही गोष्ट हिंदी राष्ट्राच्या पुढाऱ्यांना पूर्णपणें कळून चुकली आहे, पण ती आपणास कळली नाहीं असें सरकारी अधिकारी आपल्या कृत्यांनीं दाखवीत आहे. सक्तीचें शिक्षण सुरू करण्यास म्युनिसिपालिट्यांना परवानगी देणारें बिल मुंबईच्या कायदेकौंसिलांत पास करवून घेण्याला ना. मि. पटेल यांना कोण प्रयास पडले! या शिक्षणाच्या वाढत्या खर्चाचा अंश आपले माथीं घेण्यास सरकारी अधिकारी विशेषसे उत्सुक नाहींत. कलकत्यास तर लढाईच्यां खर्चाच्या सबबीवर तेथील सरकारनें खासगी कॉलेजांना देण्यांत येणारी सवा लक्ष रुपयाची वार्षिक ग्रांट काढून घेतली! विलायतेंत खासगी शिक्षणसंस्थांच्या खर्चाचा अर्धाभाग सरकारकडून इतके दिवस मिळत असे; आतां तो सगळाच—निदान शें. ७६ भाग तरी—सरकारनें द्यावा अशी शिफारस करण्यांत आली आहे. इकडे एक तृतीयांश भाग सरकार देतें, पण तो ही काढून घेण्याची तजवीज कोठें कोठें चालली आहे. तिकडे शास्त्रीय शिक्षणासाठीं शाळांना जोडून प्रयोगशाला उघडण्याप्रीत्यर्थ पाण्यासारखा पैसा ओतला जात आहे इकडे त्याचें नांव ही नाहीं. तिकडे देशाभिमानाची ज्योत पेटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत; इकडे मिसेस अनी बिझांटबाई राजकारणांत पडतात या सबबीवर त्यांनीं चालविलेल्या राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळांवर सरकारी अधिकारी वक्रदृष्टि ठेवीत आहेत. तिकडे मि. फिशर सारखे सरकारी अधिकारी शिक्षणशकट त्वरीत गतीनें चालावा ह्मणून सारखे झटत आहेत, व लोकांत जागृति उत्पन्न करीत आहेत; इकडे सुशिक्षित लोक जागृत झाले आहेत व सरकारी अधिकाऱ्यांना जागृत होण्यासाठीं जोरानें हलवीत आहेत, पण ते आपल्या निद्रेचा त्याग करूं इच्छित नाहींत. इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या मधील शिक्षण विषयक जागृती संबंधाचा हा विरोध परमावधीचा आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हा विरोध देशहितास व साम्राज्याच्या हितास ही अत्यंत अशुभसूचक आहे असें कोणास वाटणार नाहीं?

---

## महाराष्ट्रीय ज्ञानकोष

महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचें काम झपाट्यानें वाढत असून त्यास अनेक लेखकांचें साह्य चांगल्या प्रकारें मिळत आहे. ज्ञानकोशाच्या कामापैकीं कांहीं काम कार्यालयांतील लेखकांकडून करवून घ्यावयाचें आणि कांहीं काम बाहेरच्या विशेषज्ञ लेखकांकडून लिहवून घ्यावयाचें अशी सामान्य योजना आहे. जें काम आफिसच्या बाहेरच्या लेखकांस दिलें आहे त्यांत पुणें व मुंबई येथील लेखकांकडे बरेंचसें आहे. हें काम त्या लेखकांकडून करवून घेण्यासाठीं व त्यांस कांहीं अडचणी झाल्यातर त्या निवारण्यासाठीं, ह्मणून ज्ञानकोश मंडळाची एक शाखा पुणें अगर मुंबई येथें स्थापन करावी अशी योजना चालकांच्या मनांत बरेच दिवस घाटत होती. तथापि त्यास मूर्त स्वरूप येण्यास कांहीं अडचणी होत्या. त्यापैकीं मुख्य अडचण ह्मटली ह्मणजे तेथील काम ज्यांवर सोपवितां येईल अशा योग्य विद्वानाची निवड करणें ही होती. ती अडचण आतां दूर झाली आहे. ज्ञानकोशमंडळामध्यें पुण्यास शाखा स्थापन करून तिचें पौरोहित्य प्रोफेसर वैजनाथ काशीनाथ राजवाडे एम्. ए. याच्यावर सोंपविण्याचा विचार चालू आहे. प्रो. राजवाडे याचा निश्चयी स्वभाव, अंगीकृत जबाबदारी पुरी करण्याचा त्यांचा हट्ट, व जें पुरें करता येणार नाहीं तें अंगावरच घ्यावयाचें नाहीं असा त्यांचा बाणा या सर्वांना महाराष्ट्रांतील हजारों सुशिक्षितांस ते आहेत. प्रस्तुत निवड पुण्यातील सर्व सुशिक्षित वर्गास आवडेल याच्या विषयीं आह्मास शंका नाहीं.

पुण्याच्या कार्यालयांत कांहीं पदवीधर नोकरांस ठेवून ते प्रोफेसर साहेबांच्या मदतीस द्यावयाचे आहेत. ज्ञानकोशाचें काम केवळ वऱ्हाड व मध्यप्रांताच आहे असें नाहीं तर तें सर्व महाराष्ट्राचें आहे. या कार्यास मदत करण्याची जबाबदारी ज्याप्रमाणें वऱ्हाडकर व मध्यप्रांतवासी यांजवर आहे, त्याप्रमाणेंच ती मुंबई इलाख्यावर ही आहे. एवढेंच नव्हेतर, बडोदें, इंदूर, ग्वाल्हेर, देवास, धार, तंजावर, इत्यादि ठिकाणीं जेथें जेथें ह्मणून महाराष्ट्रीय वसाहती आहेत त्या सर्वांवरच आहे.

---

## ना. व्हाइसराय साहेबांचें भाषण.

मागच्या आठवड्यांत झालेल्या वरिष्ठ कायदेकौंसिलाच्या बैठकीला मि मांटेग्यु व त्यांच्या बरोबरीची मंडळी प्रेक्षक ह्मणून हजर होती ही एक विशेष महत्त्वाची गोष्ट ह्मटली पाहिजे. या बैठकीला हजर राहण्यासाठीं त्यांनीं फुरसत काढली तशीच कांग्रेसच्या बैठकीला हजर राहण्याचे संबंधांत काढली असती तर हिंदुस्थानच्या लोकांना केवढा संतोष वाटला असता! यावेळीं ना. व्हाइसराय साहेबांचें जें प्रास्ताविक भाषण झालें त्यांत अग्रस्थान बहार प्रांतांतल्या हिंदु मुसलमानांमधल्या दंग्याच्या प्रश्नास दिलें होतें हें योग्यच झालें. सदर दंग्यासंबंधानें समजदार हिंदु व मुसलमान यांना सारखेंच वाईट वाटत आहे. या दंग्याच्या कारणांची चौकशी करण्यासाठीं सरकारी व बिनसरकारी (हिंदु व मुसलमान) गृहस्थांची मिश्र कमिटी नेमण्यासंबंधानें बहार प्रांताच्या कायदे कौंसिलपुढें ना. रा. ब. पूर्णेंदु नारायण सिंह यांनीं सूचना आणिली होती, परंतु सरकारी अधिकाऱ्यांनीं तिला विरोध केला ही खेदाची गोष्ट ह्मटली पाहिजे. कारण, यामुळें सत्यान्वेषण करून घेण्यास सरकारी अधिकारी स्वतःच तयार नाहींत असा आक्षेप घेण्यास जागा झाली आहे. ना० व्हाइसराय साहेबांच्या भाषणांतली दुसरी गोष्ट ह्मणजे बजेट वरील वादाविवादाच्यासंबंधांत हल्लींच्या नियमांत केलेली दुरुस्ती ही होय. हल्लीं बजेट अखेरच्या स्वरूपांत तयार होऊन मग चर्चेसाठीं येतें, पण त्या चर्चेमुळें बजेटाच्या स्वरूपांत कांहीं बदल होत नसल्यामुळें ती चर्चा फुकट जाते. यासाठीं अगोदर चर्चा झाल्यानंतर मग बजेटाला अखेरचें स्वरूप देण्याचें ठरविण्यांत आलें आहे. ही सुधारणा बरी आहे. जमाखर्चा वर लोकांचा ताबा असावा अशी जी लोकांची मागणी आहे ती देण्यास सरकारची तयारी आहे याचें हें निदर्शक समजावयाचें काय? कांहीं ही असो; पण इष्ट दिशेनेंच सुधारणा आहे. तिसरी गोष्ट महर्घतेचा बंदोबस्त करण्यासाठीं सरकारने हातीं घेतलेले विशेष अधिकार व योजिलेले उपाय ही ना० व्हाइसराय साहेबांनी सांगितले. या संबंधांत मीठ व कापड यांचा उल्लेख लाट साहेबांनीं केला. सर्पण, घरभाडें वगैरे आणखी ही अनेक अवश्य बाबतींत सरकारनें बंदोबस्त केला पाहिजे. मिठाची आयात कमी झाल्यामुळें महर्घता झाली असें लॉर्ड चेम्सफोर्ड यांनीं सांगितलें. पण हिंदुस्थानांत मीठ तयार करण्याचें क्षेत्र इतकें विस्तृत असतां दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याचा त्याला सरकारानें कां लावावें? मीठ तयार करण्याची परवानगीच सढळ हातानें कां देऊं नये तें कळत नाहीं. यांत सरकारचें उत्पन्न बुडत असल्यास तें अन्य तऱ्हेनें भरून काढावें, पण प्रजेचें मीठ तोडणें कदापि श्रेयस्कर ह्मणतां येणार नाहीं.

---

## भाषावार प्रांतांची रचना.

हिंदुस्थानांतल्या प्रांतांची भाषावार रचना केल्यानें लोकांत एक प्रकारचा आपलेपणाचा अभिमान उत्पन्न होऊन एकी सुलभ होईल ही गोष्ट खरी; पण केवळ या एकाच गोष्टीकडे पाहून हल्लींच्या व्यवस्थेंत क्रांति घडविणें आमच्या मतें इष्ट नाहीं. हिंदुस्थानांत कांहीं भाषा बोलणारांची संख्या ७ कोटी पक्षां ज्यास्त आहे व कांहींची संख्या ५०।६० लक्षांपेक्षा ही कमी आहे. अर्थात प्रांतांची रचना भाषावार करण्यानें कांहीं प्रांत फारच मोठले व सुव्यवस्थित राज्यपद्धतीस अवजड असे होतील व कांहीं अगदींच लहान ह्मणजे एखाद्या जिल्ह्या येवढे होतील. लहान प्रांतांचा खर्च अर्थात् त्यांना झेपणार नाहीं व सगळा गोंधळ उडेल. या व अशाच दुसऱ्या कारणांमुळें ना. मि. शर्मा यांनीं आणिलेला ठराव बहुतेक लोकनियुक्त सभासदांनाही नापसंत होऊन अखेर बहुमतानें तो नामंजूर झाला. तत्त्व पसंत असले तरी व्यावहारिक दृष्ट्या विचार करण्याची केवढी अवश्यकता आहे ही गोष्ट नामदार सभासद ओळखूनच आपलें मत देत असतात हें यावरून सिद्ध झालें. राजकीय दूरदृष्टि व व्यावहारिक कर्तृत्व हिंदी लोकांच्या ठायीं खरोखर आहे अशी आतां मि. मांटेग्यु यांची खात्री झाली असेल.

---

## कृषिविषयक उत्पन्न.

याच बैठकीपुढें प्राप्तीवरील कराच्या कायद्यांत सुधारणा करण्यासंबंधाचें बिल फायनान्स मेंबरकडून सादर करण्यांत आलें होतें. शतकरींच कराचे दर वाढविण्यां

ाळे असल्यामुळें या बिलांत दर वाढविले सून कराच्या वसुलाच्या पद्धतींत कांहीं धारणा करण्याचा उद्देश आहे असें ांगण्यांत आलें. आतांपर्यंतच्या कायद्यानें ।विविषयक उत्पन्नावर कर बसविलेला नव्हता. ण प्रस्तुत बिलानें तो बसविण्यांत येणार ाहे. गरीब शेतकऱ्यांचें उत्पन्न हजार पयांच्या वर क्वचितच असतें. यामुळें या लानें त्यांच्यावर कष्टाचा बोजा पडणार ाहीं, पण शेतकऱ्यांच्या जिवावर गबर ोणाऱ्या जमीनदारांचें विशेषतः कायम ाऱ्याच्या पद्धतीमुळें आजपर्यंत श्रीमंतीत ोळणाऱ्या जमीनदारांचे—उत्पन्न प्राप्तीच्या कराच्या कायद्याखालीं आणण्याचा या बिलाचा प्रयत्न आहे. कायम धाऱ्याच्या द्धतीनें जमीनीवरचा सारा न वाढवि-ण्याविषयीं सरकार वचनबद्ध आहे, पण मिनदारांवर प्राप्तीविषयक कर ही बस-विण्यांत येणार नाहीं असा त्या वचनाचा र्थ होत नाहीं. कृषिविषयक उत्पन्न कशाला म्हणावयाचें हा प्रश्न या बिलाच्या संबंधात महत्त्वाचा आहे. सामान्य अर्थज्ञान व व्यव हारज्ञान ज्याला आहे तो सहज सांगेल कीं प्राप्तीच्या करांतून गरीब शेतकऱ्यांना मुक्त करणें हा कायदा करणारचा मूळ उद्देश होता. पण त्याचा फायदा ज्यांचे दाराशी हत्ती झुलत आहेत अशा श्रीमंत जमीन दारांनीं आजपर्यंत घेतला. कचेऱ्यांतून काम करणाऱ्या गरीब कारकुनांना, किरकोळ दुकानदारांना, व इतर गरीब लोकांना प्राप्तीवरचा कर देणें भाग पडावें, आणि श्रीमंत व दुसऱ्याच्या कष्टावर पुष्ट होणारे जमीनदार त्याच्या तडाख्यांतून सुटावे हा ढळढळीत अन्याय झटला पाहिजे. आजपर्यंत ा गोष्टींकडे सरकारचें लक्ष गेलें नाहीं च आश्चर्य आहे. सध्या सरकारला पैशाची फार जरूरी आहे. अशा वेळीं गरीब प्रजेवर एखादा नवा कर बसण्यापेक्षां श्रीमंतांना कराचा योग्य वाटा देणें भाग पाडणें हा अन्याय होणार नाहीं.

---

## महायुद्धाची प्रगति

गेल्या आठवड्यांत महत्त्वाच्या अशा तीन गोष्टी घडल्या. एक अमेरिकन फौजी जहाज ( टस्कानिया ) आयर्लंडच्या किनाऱ्या-वरून जात असतां जर्मनीनें टार्पेडोनें बुडविलें. या जहाजावर एकंदर २३८७ माणसें होतीं. पैकीं २०११ सैनिक व बाकीचे खलाशी वगैरे होते. यांतल्या २१० माणसांचा पत्ता लागला नाहीं. या जहा-जावरील लोकांचे प्राण वाचविण्यांत ब्रिटिश विनाशक बोटींनीं फार उत्तम प्रकारचें साह्य केल्यामुळें प्राणहानि थोडी झाली. टस्कानिया जहाजावर फक्त दोनच स्त्रिया होत्या व त्या दोन्ही वाचल्या. जर्मनीच्या या कृत्यानें अमेरिकन लोकांचा युद्धाविष-यींचा कृतनिश्चय आधिक दृढ झाला आहे त्यांच्या अंगांत वीरश्रीचा संचार अधिक होते आहे. विजयप्राप्तीशिवाय तरणें व्यर्थ आहे ही भावना प्रत्येक अमेरिकनाच्या अंतर्यामीं बद्धमूल झालेली आहे व हिचा परिणाम जर्मनीला लवकरच दिसून आल्या-वाचून राहणार नाहीं.

दुसरी महत्त्वाची गोष्ट ह्मणजे युक्रेनियन राष्ट्रानें जर्मनीशीं केलेला तह ही होय. या तहाचे परिणाम काय होतात, हें आजच नक्की सांगतां येत नाहीं. पण जर्मनीनें ज्या लाभावर दृष्टि ठेवून हा तह घडवून आणिला तो पूर्णपणें त्याच्या पदरांत पडण्याचा संभव कमी दिसतो. जर्मनीमध्यें खाद्य पदार्थांचा दुष्काळ पडला आहे, अशावेळीं युक्रोनियासारखें धान्याचें कोठार त्याच्या हातीं आलें हा लाभ तर खराच पण रशियाच्या अंतःस्थ अशांततेमुळें गेल्या एक दोन वर्षांत शेतकीकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं व पीक अर्धांत आलें नाहीं. दुसरी गोष्ट धान्य नेण्याचें साधन ह्मणजे रेल्वे यांचा युक्रेनियामध्यें अभाव आहे. तथापि जर्मनी युक्तिबाज असल्यामुळें तो युक्रेनियामधलें धान्य नेऊन रशियांत दुष्काळ पाडण्यास कमी करणार नाहीं. युक्रेनियानें वेगळा तह जर्मनीशीं केल्यामुळें त्याला आतां बोलशेव्हिका विरुद्ध आपलें स्वातंत्र्य रक्षण करावें लागेल. या तहामुळें जर्मन फौज रशियांतून हालविली जाईल अशी युक्रेनियन लोकांची समजूत असेल तर तो मात्र त्यांचा भ्रम आहे हें लवकरच निद-र्शनास येईल. या तहाचा तात्कालिक परि-णाम रुमानियावर मात्र फार वाईट झाला आहे. या दुर्दैवी लोकांना चोवीस तासांची नोटीस देऊन तह करतां कीं नाहीं असा निर्वाणीचा संदेश जनरल मॅकेन्सन यांनीं पाठविला आहे. ही चोवीस तासांची मुदत होऊन गेली. पण अद्याप तिकडील पुढची कांहीं खबर आली नाहीं. मग काय प्रकार घडला असेल तो परमेश्वरास माहित! आतां रुमानियाला मदतीसाठीं बोलशेव्हिकांच्या तोंडाकडे पाहावें लागणार आहे. रुमानि-याच्या नशिबाची अखेरची परीक्षा पाश्चात्य रणक्षेत्रावरच व्हावयाची असा ईश्वरी संकेत दिसतो.

---

## अंतःस्वराज्य.

### ( नोकरशाही बरोबर महायुद्ध )

अमेरिकेचे प्रेसिडेंट विल्सन यांनीं या जर्मन महायुद्धाकडे नजर फेकून नुकताच अशी भीष्मप्रतिज्ञा केली कीं राष्ट्राराष्ट्राचें स्वराज्य ज्याचें त्यास पुनः लाभणार नाहीं तर प्रस्तुतचें महायुद्ध कधीं हीं आह्मी थांबविणार नाहीं आणि या अंतिम ध्येया-साठीं श्रीवितसर्वस्व खर्ची घालण्याला कोणी ही माघार घेणार नाहीं. स्वराज्याची प्रस्थापना हा या महायुद्धांतला ईश्वरी संकेत दिसतो आणि ही गोष्ट घडवून आणणारी मानव संस्कृती या महायुद्धानें प्रचंड प्रमाणावर चाळविली आहे. पाश्चात्य राष्ट्रराष्ट्रामध्यें हीं स्वराज्याचीं महायुद्धें चालू आहेत; पण त्या युद्धांचें शांत स्वरूप किंबहुना अत्यंत तीव्र व नाजूक स्वरूप आमच्या इंडियाच्या महाराष्ट्रांत सध्या दिसून येत आहे. इंडियांतील स्वराज्याचें युद्ध ब्रिटिश साम्राज्याशीं नसून साम्राज्याच्या नोकरशाही बरोबर चालू आहे, आणि गेल्या शंभर दीडशें वर्षांच्या ब्रिटिश साम्रा-ज्यांतील उदार तत्वें, लोक कल्याणाची दृष्टी व लोकसत्तेची खरी वाढ हीं या नोकरशाहीनें इतकी अस्तास नेलीं आहेत कीं त्या स्वराज्यशाली ब्रिटिश साम्राज्यापुढें या इंडियाच्या अंतर्गत महाराष्ट्राचा स्वराज्याबद्दलचा प्रश्न मोठ्या नेटानें काढावा लागत आहे. ही स्वराज्याची मोहिम आतां विलायतेस नेण्याचा राष्ट्रीय सभेनें जो संकेत केला आहे तो सिद्धीस नेण्यासाठीं आज सर्व राष्ट्रभर एकच गडबड उसळली आहे आणि ही चळवळ यशस्वी होईपर्यंत आमच्या राष्ट्रानेंही हें अंतर्महायुद्ध लढण्याची भीष्म-प्रतिज्ञा केली आहे. आमच्या भावी स्वरा-ज्यांत काळा गोरा हा अमंगळ भेदाभेद रहाणार नाहीं, सर्व राज्यकारभार खरोखर इंडियनशाहीच होईल आणि लोकसत्तेचें खरें प्राबल्य राहील. या तिन्ही गोष्टी स्वराज्याचा मूळ पाया आहेत आणि या संबंधानें कोणतीही न्यूनत्वाची बाब स्वीका-रण्यात येणार नाहीं.

---

## लोकश्री

### ( टिळकांची कामधेनु. )

ईश्वरी खेळ कांहीं अद्भुत असतो, आणि शतकानुशतकें लागणारी संस्कृती ही या महायुद्धांत अत्यल्प कालांत घडून येत आहे त्याच प्रमाणें आमच्या इंडियांत ही कांहीं लोकोत्तर गोष्टी एका पलार्धांत घडून येत आहेत कीं काय असा भास होतो. श्री टिळक हे गेल्या ९ तारखेपासून १३ तारखेपर्यंत वऱ्हाडांतील कांहीं कांहीं स्थळीं गेले आणि लोकांमध्यें कांहीं अपूर्व, विलक्षण व ईश्वरी सामर्थ्याचें चैतन्य उद्भुत झालें आहे वऱ्हाडचें वातावरण स्वराज्याच्या कल्पनांनीं इतकें तेजोमय व ओजस्वी झालें आहे कीं लोक-समूहांत नवी जागृती, नवें स्फुरण व नवा स्वार्थयज्ञ हीं चमकूं लागलीं आहेत. आकोला, वाशीम, पुसद, कारंजा व मुर्ति-जापूर येथें श्रीमान् टिळक यांचीं स्वरा-ज्यावर व्याख्यानें झालीं तेव्हां त्यांच्या शब्दां-मधून जो विद्युत्प्रवाह सर्वत्र प्रसृत होत असे व त्यावरोबर जी दैवी शक्ती लोकां मध्यें जागृत दिसे त्यांचा अमृतमय परिणाम सर्व सार्वजानिक लोकव्यवहारामध्यें दिसून येईल; इतकेंच नाहीं तर या नव्या स्वरा-ज्याच्या शाळागृहांत लोकांचें नैतिक शिक्षण मोठ्या दांडग्या प्रमाणावर चाललें आहे. वऱ्हाडांतील श्रीटिळक यांचें स्वराज्याचें वाङ्मय त्यांच्या तोंडून ऐकण्याला जेव्हां पांच पांच, दहा दहा, वीस वीस हजार लोक खामगांव, बाळगांव, आकोट वाशीम, पुसद कारंजा सारख्या सामान्य ठिकाणीं अंतःकर-णाच्या तल्लीनतेनें ऐकण्यास उभे राहात तेव्हां स्वराज्याची आवड किती स्वभावसिद्ध आहे, आणि लोकश्री या ध्येयाच्या पवित्र उच्च शिखराकडे जाण्याला आनंदानें किती तत्पर आहे हे आमचे राज्यकर्ते पहातील तर ते श्रीटिळक यांच्या या महाकार्याबद्दल धन्यवाद गातील आणि आपण इतके दिवस विरुद्ध बाजूला राहिलों ह्मणून ओशाळून इंडियाचें स्वराज्य स्थापण्याला प्रसन्नतेनें सामील होतील. जर या ईश्वरी योगांत ते बाजूला पडतील तर त्यांच्या सारखे पामर तेच होत.

---

## दुग्धामृत.

या स्वराज्याच्या कामीं स्त्रीवर्ग फार अनुकूल आहे. स्त्रियां श्रीटिळक यांच्या व्याख्यानाला मोठमोठ्या झुंडीनें जमत, वर्गणी देण्यांत त्या मनोभावानें पुढाकार घेत आणि वाशिम सारख्या ठिकाणीं रा. नारायणराव भट यांच्या वृद्ध मातोश्री रुखमीबाई यांनीं अर्धोदय पर्वाच्या दाक्षिणेच्या १०१ चवल्या स्वराज्यास अर्पण केल्या, ह्या गोष्टी कोणी कर ह्मणून ह्मटल्यानें होणाऱ्या नाहींत. स्त्रियांचें कागदी शिक्षण किती ही मागें असो; पण त्या पुरुषवर्गाबरोबर राष्ट्रध्येया-साठीं कंबरा बांधून युद्ध करण्याला तयार आहेत ही मोठी आल्हादाची गोष्ट होय. आणि रा. टिळक यांच्या या वऱ्हाडच्या दौऱ्यांत ही स्त्रीवर्गाची महत्वाकांक्षा चांगली लोकनिदर्शनास आली. जेथें स्त्रीवर्ग असा कार्यकुशल व अग्रस्थानीं चालण्यासारखा बनत चालला आहे तेथील त्यांच्या हातानें हलणाऱ्या पाळण्यांतील नवा बालवर्ग तेजस्वी व राष्ट्राला शोभायमान असा होईल यांत शंकाच नको. हें स्वराज्याचें दुग्धामृत नव्या नव्या पिढ्यांना पाजलें जात आहे हीं भावी मनूचीं प्रसादचिन्हेंच होत.

---

## देशीय शिक्षणम्.

### ( तारीख ८ ते १९ एप्रिल पर्यंतचा सप्ताह. )

हल्लीं स्वराज्याची नौबत जशी वाजत आहे तशी स्वराज्याला देणारी **देशीय शिक्षणाची** संस्था सर रासबिहारी घोष यांच्या अध्यक्षतेखालीं निघाली आहे. राजश्री जॉर्ज आरंडेल यांनीं ही कार्यप्रणाली मोठ्या नेटानें चालविली आहे आणि या संस्थेचें कार्य इतकें जोरानें चालू आहे कीं थोडक्याच वर्षांत सरकारी विद्याखातें यांच्या ताब्यांत जाईल तर कोणास नवल वाटणार नाहीं. ही शिक्षणाची मोहीम गांवो-गांव शहरों शहरीं व प्रांतोप्रांतीं प्रसृत करण्यासाठीं तारीख ८ ते १९ एप्रील पर्यंत देशीय शिक्षणाचे सप्ताह स्थळोस्थळीं भरविण्यांत येणार आहेत. या सप्ताची यो-जना अशी केली आहे कीं सर्वांनीं त्यांत आपापला हविर्भाग अर्पण करावा. या स-प्तांत एक बाजारही भरविण्यांत येणार आहे. ज्या गांवीं व शहरीं हा बाजार भरविण्यांत येईल तेव्हां त्याच्या आगोदर घरोघर भिक्षा मागून मिळविलेल्या वस्तु तेथें विक्रीसाठीं मांडण्यांत येतील. असा कोणी ही राहणार नाहीं कीं ज्याचा कांहीं तरी द्रव्यांश या महाकार्याला पोंचणार नाहीं अशी 'अवरडे'च्या योजनेपेक्षांही मोठ्या प्रमा-णावर व राष्ट्रवीर्याला साजेल अशा रितीनें योजना करण्याची पूर्वतयारी चालू आहे.

---

## लक्षावधि

### ( नवी सहकारित्वाची तालीम )

स्वराज्य हें इष्टदैवत आहे आणि त्या इष्ट देवतेपुढें आमच्या वऱ्हाडप्रांतानें रुपयांची लाखोंची वहाण्याचा संकल्प केलेला त्यांच्या चारित्र्यांत दिसून येतो. मुर्तिजापुराहून दौरा पुढें पुलगांवाकडे जाईपर्यंतच ९९ हजारा-पर्यंत वर्गणीची रकम भरली होती. राजश्री पुरवणी पहा.

पृष्ट ४ वरून पुढें चालू

टिळक यांनीं या वर्गणीचा स्वीकार ठिकठिकाणीं करतांना अंतःकरणें एकत्र करण्याची निराळीच तालीम दिलेली आहे. ते ह्मणतात कीं 'स्वराज्य' देवीला लक्षावधि रुपये तर पाहिजेतच पण त्यापेक्षांही मोठमोठ्या श्रीमान व्यक्तींनीं मोठमोठ्या वर्गण्या देण्यापेक्षां प्रत्येक स्त्रीपुरुषाकडून चार चार आणे वर्गणी मिळाली आणि अशा चार चार आण्यांनीं की एक लक्षाची गंगाजळी होईल ती आह्मास पाहिजे आहे. स्वराज्याचें रहस्य या वर्गणीद्वारां प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या हृदयांत खेळूं लागलें पाहिजे आणि या स्वराज्याच्या दरबारी कार्यांत प्रत्येक स्त्रीपुरुषाला मी अंशभूत सामील आहे असा अभिमान व प्रौढी वाटली पाहिजे. सहकारित्वाचें खरें बीज ह्मणजे कोणतीही चळवळ सर्वात्मक, सर्व साधारण अशी करून प्रत्येकाला त्यांत विश्वबंधुत्व व आत्मभाव यांचा अनुभव आपल्या स्वकीय कृतीमध्यें दिसून आला पाहिजे.

## शुक्राचार्य
### (नोकरशाहीचा हिरा)

आकोलें येथील जाहिर सभेंत गेल्या सोमवारीं बोलतांना राजश्री टिळक यांस लोकाच्या स्वराज्याची प्रवृत्ती पाहून श्री वामनाच्या अवताराची आठवण झाली. बळीराजा जसा सर्वस्व दान देण्याला सिद्ध झाला, त्याप्रमाणें श्रीमान चक्रवर्ती जॉर्ज बादशहा हेही इंडियाला स्वराज्य दान देण्यासाठीं तारीख २० आगष्ट रोजीं संकल्प सोडून यज्ञ मंडपांत उभे राहिले आहेत. त्या पुराणकाळीं जसं बळीराजाचे उदार चारित्र्य सहन सहन होईना आणि ह्मणून त्यांचे गुरु शुक्राचार्य हे दानांचें उदक झारीतून पडूं नये ह्मणून झारीच्या तोंडीं जाऊन बसले, तसाच प्रकार इंडियांतली ब्युरोक्रसी ह्मणजे नोकरशाही या स्वराज्याच्या दानाच्या समयीं जोरानें प्रतिरोध करीत आहे. पण त्यांची ही एकपक्षीय स्वहिताची दृष्टी हल्लींच्या लोकांमध्यें जागृत झालेल्या श्रीवामन पुढें टिकणार नाहीं. लॉर्ड सिडन हॅम किंवा पूर्वीची इंडियांतला उंट वरून किंवा हत्तीवरून नेतां येईल इतका पगार खाणारी अधिकाराची भुतें किंवा त्यांच्या विचाराप्रमाणें वागणारी प्रस्तुतची नोकरशाही ही या वेळेला रसातळास गेल्याशिवाय राहणार नाहीं. लोकसत्तेच्या दर्भानें डोळा फुटूं नये अशी इच्छा असल्यास या नोकरशाहीनें लोकांमध्यें सामील होऊन, त्यांच्या अंतःकरणांत शिरून. प्रेमानें त्यांच्या लघु दर्जाला उतरून ब्रिटिश साम्राज्याचें वैभव नव्या संस्कृतीला अनुरूप असें वर्धमान व चिरायु करण्यास शिकावें. हिरा जसा पैलूदार व शोभायमान होण्यास यंत्रांतून फिरवावा लागतो त्याप्रमाणें आमची ही हिऱ्यासारखी नोकरशाही लोकहिताच्या यंत्रणांतून संस्कृत होऊन निघाली तरच तिची पुढें शोभा राहील.

# वऱ्हाडवृत्त.

**कापूस**— ता. ९ फेब्रूवारी पर्यंतच्या आठवड्यांत १०४७२ कापसाची गाडी व १६९२ रुईचे बोजे बाजारांत आले व १ ल्या सप्टेंबर पासूनच्या संबंध हंगामाची एकूणता घेतली तर गुदस्ता जेथें २३६९४४ कापसाच्या गाड्यां आल्या तेथें यंदा २६०१६९ गाड्या होत्या आणि रुईच्या बोजांच्या गाड्या १५॥ हजारा जवळ गुदस्ता प्रमाणेंच भरल्या. कपाशीच्या गाड्या संख्येच्या मानानें जरी पाऊण हिस्सा आहेत तरी त्यांत भरलेल्या मालाच्या मानानें पहाता फारच थोडा कापूस बाजारांत येऊं शकला.

**काव्यस्फूर्ति**:— लोकमान्य टिळक यांस अर्पण केलेल्या आकोटच्या मानपत्रांत काव्यस्फूर्ती असून भाषा सौंदर्य ही रमणीय आहे. तें मानपत्र ह्मणजे इंडियन आकाशावर रेखाटलेलीं भावी गोष्टींचीं चित्रेंच होत. अशी आकोटकराचा अशा स्फूर्तीनें केलेल्या स्वराज्याच्या पुढाकाराबद्दल व दिलेल्या वर्गणीबद्दल अभिनंदन करितों.

**शाबास**:— मौजे उंद्री ता. चिखली येथील स्वराज्यवादी मंडळींनीं रस्त्यांत मोटार थांबवून २११ रुपये वर्गणी श्रीटिळक याना अर्पण केली याबद्दल आली या खेड्याच्या पुण्यशील लोकांचा गौरव करूं तेवढा थोडाच होय.

गेल्या मंगळवारीं रात्रीं कारंजा नगरी फार नटली होती, आणि तिची ती शोभा व विजेची रोषनाई हीं पाहून व त्या बरोबर लोकाचे ते प्रसन्न, आनंदमय चेहरे पाहताच पुन्हा दहून थकून भागून आलेले श्रीमान टिळक हे बोलणार नव्हते तरी ५०।६० मिनिटें बोले; आणि त्या वेळचा त्याचा वाणीचा प्रवाह असा विलक्षण चालला होता कीं लोकांस त्या दिवशीं आपल्या जन्माचें साफल्य वाटलें. राजश्री लक्ष्मणराव दाहिहंडेकर यांच्या त्या लक्ष्मीविलास वाड्यामध्यें त्यांची उतरण्याची सोय केली होती. वर्गणीची रकम ३५०० रुपये भरली.

**स्वराज्यवादी**:— श्री टिळक यांच्या या दौऱ्यात सगळेच हाडाचे स्वराज्यवादी आहेत, पण योग्य अवसर न मिळाल्यामुळें पिंजऱ्यात कोंडलेल्या व्याघ्रसिंहाप्रमाणें झाले होते किंवा पिंजऱ्याच्या दांडावर नाचणाऱ्या पोपटाप्रमाणे गोडबोले झाले होते असें कळून आलें. नोकरशाहींतल्या मुत्सद्यांनीं मनांत चांगली गाठ बांधून घ्यावी.

**लोकांची दैना**:— महागांव व वेणीकोठा या परगण्याच्या परिषदा भरऊन यवतमाळच्या सार्वजनिक मंडळींनीं मोठें लोककार्य केलें आहे. यंदाच्या नापिकीच्या कारणामुळें लोकांची दैना सरकारच्या कानावर घालण्याची त्यांनीं केलेली कामगिरी अत्यंत मोठी होय आणि त्यांच्या प्रयत्नाचें अनुकरण इतरही परगण्यांतून यावेळीं झालें पाहिजे. येथील पोष्ट ऑफिसावर वार लोकांचे पैसे परत घेण्याकरितां शेतकरी लोक कां धाव मारतात व सरकारी सारा किती संकटानें दिला जात आहे याची बारीक चौकशी रा. स्टँडन कमिशनर साहेब हे स्वतः करितील अशी आह्मास उमेद आहे. वस्तुस्थितीवर पडदा नको.

आलिशान नामदार सर बेंजामिन रॉबर्टसन यांची स्वारी उद्या येथून वाशिमाला जाईल आणि बुधवारीं मंगरूळ मार्गानें येथें मोटारनें आल्यावर त्यांच्या सन्मानार्थ येथील जिल्हाबोर्डांत फलाहाराची मेजवानी देण्यांत येणार आहे. सहकारी पतपेढीचें नवें मंदीरही त्यांच्या हातानें उघडण्यांत येणार आहे आणि मंगरूळच्या नव्या सडकेला 'स्टँडनरोड' हें नांव देण्यांत येणार आहे.

**दुवा**— जवारीच्या कडक भावानें लोकांची होणारी दैना कमी करण्यासाठीं ह्मणून ६ आणे पायली प्रमाणें जवारी विकणारी दुकानें सरकारानें व्यापाऱ्यांच्या वर्गणीवर चालू केलीं आहेत आणि त्याबद्दल गरीब लोक त्यांस दुवा देतात. पण हीं दुकानें अधिक व्यवस्थेशीर लौकरच व्हावयाला पाहिजेत.

**जिल्हा परिषद्**—आकोला जिल्ह्याची किंबहुना आकोला व बुलढाणा या दोन्ही जिल्ह्यांची मिळून एक संयुक्त परिषद पुढील महिन्यांत भरवावी असा कित्येकांचा विचार चालला असून त्या प्रसंगाला महात्मा गांधी यांचा लाभ व्हावा ह्मणूनही मनाची योजना चालू आहे.

रा. रा. नामदार कर्नल रॉबिन्सन इलाख्याचे इन्स्पेक्टर जनरल व सॅनिटरी कमिशनर याची स्वारी एलिचपुरास असून खामगांव, नांदूरा, मलकापूर करून पुढील सोमवारीं बुलढाण्यास जाणार आहे.

रा. रा. रामचंद्र डुबे यांस येथें सर्कल इन्स्पेक्टरची बढती देण्यांत आली आहे.

सर जगदीशचंद्र बोस यांचे प्रयोग मंदिर ह्मणजे राष्ट्रीय पवित्र देवालय होय. त्या संस्थेला श्रीमान सयाजीराव गायकवाड यांनीं १। लक्ष रुपयाची देणगी दिली. आपापल्यापरीनें कोण हिंदी पुत्र श्रीमान सयाजीराव होणार नाहीं बरें!

## इतस्ततः

हिंदुस्थानांतून खंडोगणती धान्य जरी परदेशीं जात आहे, व यंदा जरी हिंदुस्थानांत बहुतेक ठिकाणीं पिकें बुडालेलीं आहेत तरी डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट प्रमाणें एकदां कां धान्याचे भाव सर्वत्र सरकारनें सवंग केले ह्मणजे जिकडे तिकडे हिंदुस्थानांत आबादानी होऊन अन्नान्न झालेले गोरगरीब कदाचित पोटें फुगून ही मरतील.

ज्या ग्राम पंचायत बिलासंबंधीं सध्या चर्चा सुरू आहे तें आहे तसेंच जर पास झालें तर मे० डेप्युटी कमिशनर साहेब यांच्या नेतृत्वाखालीं पाटलाच्या हातानें प्रत्येक खेडगांवीं स्वराज्याची मुहूर्त मेढ उभारण्यांत येईल.

सर जगदीशचंद्र बोस यांच्या शोधांनीं वनस्पतींना व इतर निर्जीव दिसणाऱ्या परकिचित वस्तूंना सुद्धां मनोविकार व मनोभावना असतात हें सिद्ध झाल्यामुळें हिंदी लोकांना सुद्धां तसे विकार व तशा भावना असाव्यात अशी कांहीं आंग्लो इंडियन लोकांची खात्री होत चालली आहे.

ईश्वराकडे स्थिर दृष्टी ठेविल
जो आनंद प्राप्त होतो त्यांच्या
इहलोकीचें आपलें अस्थित्व कि
मप आहे हें आपल्या अनुभव
लागतें. ही गोष्ट श्रोत्यावर ठ
उद्देशानें एक मिशनरी ह्मणाले " अ
बापाकडे एकाग्र दृष्टी ठेविली अ
नरकांत पचत आहों हें अनुभव
लागतें. "

माँटेग्यु साहेब मुंबईस एक
मनुष्याच्या दृष्टीस पडले अशी अ
पोलीस तपास सुरू आहे ह्मणतात.

## नोटीस

आकोला जेल करितां खाली
खरेदी करणें आहे. ज्या व्यापाऱ्यां
शेतकऱ्यांची माल पुरविण्याची इ
त्यांनीं आपल्या मालाचा नमुना
यांचीं टेंडरें जेल सुपरींटेंडेन्ट साहे
आकोला यांचेकडे तारीख १०
चे आंत पाठवावीत. ज्याचा मा
पसंत पडेल तो घेतला जाईल.

| | |
|---|---|
| जवारी. | ९०० म |
| तुरीची डाळ. | १०० म |
| अथवा तूर | २०० म |

सही
जॉर्ज डा
जेल सुपरिंटेंडेन्ट
नो. नं. ८१

## नोटीस.

या नोटिशीनें सर्वत्रांस जाहिर क
कीं जे कोणी लढाईवर गेले आ
ज्यांचीं नांवें लढाईचे यादींत श
आहेत त्यांजवर असलेले म्युनिसि
टीचे करांच्या आकारण्या माफ
त्यांजकडून कमेटीकडे अर्ज आ
अर्जाचा योग्य विचार केला जा
तारीख १-२-१८ इ.

(सही) सेक्रे
म्यु. कमीटी अ
नो. नं. ८२

## NOTICE.

It is notified for general
tion that all applications fro
vate individuals for permis
proceed to Basra should be s
to the Deputy Commissioner
district in which the applic
sides at least two months b
desired date of departure. O
congestion at Basra applica
be required to produce evid
accommodation is available
on arrival in Basra, and wit
evidence no application
considered,

(sd.) F. S. A. Sloc
Chief Secretary to the C
Commissioner
Central Provin

Nagpur,
The 15 th February 1918.
N. N. 83

हें पत्र आकोला येथें कैलासवासी
बाळाजी फडके यांच्या वऱ्हा
छापखान्यांत नारायण खंडेराव फ
सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध के

Regd-N. No. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५२] आकोला——सोमवार तारीख २५ माहे फेब्रुवारी सन १९१८ ई० [अंक ८

सर्व औषधांचा राजा.

## अमृतबहार.

(२०० रोगांवर चालणारें एकच औषध)

सदर्हू औषध घरांत असल्यास कोणत्याही प्रकारें इतर औषधाची जरूर पडत नाही. खरूज, गजकर्ण, खोकला, ताप, महामारी, प्लेग, गरमी, परमा, डोकेंदुखणें, पोटदुखणें, दाढदुखणें, दमा, थंडी, हींव वगैरे वर मूल्य १ बाटलीस रुपये २ अर्धशिशी कान ठणकणें वगैरे सर्व प्रकारचे २०० रोगावर आणी रामबाण आहे. ट. ख. निराळा. जागोजागीं एजंट पाहिजेत.

पत्ता

भाई रामसिंग ॲन्ड सन्स मॅनेजर

अमृत बहार कंपनी सुजाबाद

जिल्हा मुलतान (पंजाब)

नो. नं. २०

## लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आह्मी येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचे सामान** वैगरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घांडे गाडींचे गाद्यांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, ल्यांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट

मुंबई नंबर २

नो. नं. २१

शक्तिदायक; रामबाण युनानी इलाज.

### संजीवनी पाक.



पांत प्रवाळ. मौक्तिक शीलाजतु, कस्तुरी अंबर इत्यादि अमोल औषधें वापरलीं आहेत. प्रमेह, धातुक्षीणता, अग्निमांद्य इ० रोगांवर वस्ताद २० तोळ्यास १ रु. ट. ख. नि.

असंख्य सर्टीफिकेटें व पदकें प्राप्त!

संजीवनी दवाखाना खामगांव

(वऱ्हाड)

नो० नं० ३६

### नोटीस

नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

कि. दि. मुकद्दमा नंबर ८ सन १९१८ इ. विद्यमान डिस्ट्रीक्ट जज्ज साहेब यांचें कोर्ट

मुक्काम आकोला पश्चिम वऱ्हाड

नांव महमदअजम

बापाचें नाव शेख छगन

जात मुसलमान राहणार बोरगांवमंजु

तहसील आकोला जिल्हा आकोला

च्या अल्पवयी अबदूलमुनाफ वा। शमसुद्दीन

उमर वर्ष १७

राहणार बोरगांव ता. आकोला तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं

यांस:—

सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें (२) शरीर व इस्टेट रक्षण करण्यासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारिख १६ माहे ३ सन १९१८ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यात येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यांस जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यांस असें ही नोटीस देण्यात येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख १४ माहे २ सन १९१८ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

सही

W. R. Dhobley

डि. जज्ज

पश्चिम वऱ्हाड

नो. नं. ८४ आकोला

### जाहिर नोटीस

या नोटिशीनें सर्वत्र साहू सावकार सोयरे धायरे इष्ट मित्र आप्त वगैरे यांस:—

कळविण्यात येते कीं, आमचा मोठा मुलगा नामे लक्ष्मण वा। मारुती पाटील रा. कारंजा रमजानपूर ता. बाळापूर जि. आकोला हा वाईट वर्तणुकीचा निघाल्यामुळें आमचे परीवर वाटेल तसें कर्ज वगैरे काढून उधळेपणानें राहतो आहे. तेव्हां त्यास कोणी ही या पूर्वी कर्ज वगैरे दिले असल्यास त्याबद्दलची जबाबदारी आमचे जातीवर किंवा आमचे इस्टेटीवर मुळींच नाहीं. तसेच यापुढें त्यांस कोणी ही कर्ज वगैरे हातावर अगर गहाणावर देऊं नये. दिल्यास त्याबद्दलची जबाबदारी आमचेवर केव्हांही राहणार नाहीं. कळावें मुक्काम अकोला ता. १९।२।१८

सही

मारुती वा। मानसिंग पाटील रा०

कारंजा रमजानपूर दस्तुर खुद

नो. नं. ८९

### नोटीस

नोटीस बेशमी रा. रा. रामा वा। नारायण पुंड जिरेमाळी रा. कोलंद मजरे पाळे पो. व ता. खामगांव जि. बुलढाणा

यांस:—

मी खालीं सही करणार ईनकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमचे व माझे लग्न होण्यास आज सुमारें अदाजा २०-२९ वर्षें झालीं आहेत. लग्न झाल्यावर तुह्मी मला १०-१५ वर्षेंपर्यंत चांगले तऱ्हेनें वागाविलें. नंतर मी वयांत आल्यावर आपण मला विनाकारण मारहाण करून त्रास देण्याचा क्रम सुरु केला. मी आज दहा वर्षांपासून माझे आई बापाचे येथें आहे. आपणास चार पांच वेळां निरोप दिले व स्वतः मी एक दोन वेळेस आपणहून तुमचे येथें आली. तरी आपण मला वागाविले नाहीं. मला लोकांचे देणें दहा वर्षांचे रुपये ५०० झाले आहे. तरी ते कर्ज एक महिन्याचे आंत देऊन मला घेऊन जावें. मी येण्यास तयार आहे. याची मुदत एक महिन्याची तुह्मास दिली आहे. असे मुदतींत न केल्यास ही फारकतीच समजून दुसरा घरठाव करीन. खर्चाबद्दल तुमचेवर कोर्टांत दावा घालून तुमचेपासून रुपये या नोटिशीचे खर्चासुद्धां भरून घेतले जातील. कळावें. ता. १७-२-१८

सहीची निशानी आंगठा

बापजी मर्द रामा पुंड जिरेमाळी रा.

व पोष्ट पळशीबु॥ ता. खामगांव

नो. नं ८६ इचा खुद.

### नोटीस

बेशर्मी मीनराम वा। चिमनीराम मारवाडी रा. मुबारकपूर ता. मुर्तिजापूर

यांस:—

मी खालीं सही करणार नोटीस देतो कीं, मी माझे मालकीचे शेत मौजे गोरेगाव ता. आकोला येथील तुह्मास १२०० बाराशे रुपयांत गहाण दिले आहे. सदर्हू गहाणापैकीं मी माझे मालकीचे घर विकून ३५० रुपये तुह्मी परभारें घेतले. आणि १७५ एकशे पंचाहत्तर रुपये गणपा यर डोकर रा. मुबारकपूर यांजपासून माझे करितां परभारे घेतले. व तीन कुडव कमी ८ खंडी जवारी तुह्मी शेतांतून घेऊन गेले तिची किंमत आज अंदजा ३१४ तीनशे चवदा रुपये एकुण तुह्मास ८३९ आठशे एकूण चाळीस रुपये तुह्मास पावले असून त्याची पावती मागितली असतां देत नाहीं. तरी ही नोटीस पावतांच वरील रुपयाची पावती देण्याची तजवीज करावी नाहींपेक्षा सरकार मार्फत ती मिळविण्याची तजवीज करावी लागेल. व मग त्याचा खर्च तुमचेवर बसेल. कळावें ता. १८-२-१८

सहीची निशानी आंगठा

यशवंता वा। यादव नसलेयनपर रा

मुबारकपूर हल्लीं मु. गोरेगांव पोष्ट

कुरणखेड याचा खुद

नो० नं० ८७

### नोटीस

संपत वा। गोविंदा जात कुणबी सरोदे वा। पारवी पेठा एदलाबाद ता. भुसावळ जि. खानदेश जळगांवमेरू

यांस:—

खालीं सही करणार मी नोटीस देते कीं, मी तुह्मी लग्नाची बायको आहे. लग्न होण्यास अजमासे १९ वर्षें झालीं असतील तेव्हां पासून तुं व मी असे दाणू वा। भगवान ठोमरे जळगांवकर तुमचा मामा यानीं तुमचे सुद्धां माझे पालन पोषण केले अजमासे ४ वर्षे झाले मी शहाणी झाले तेव्हां पासून तुह्मी व मी सदर्हू ठोमरे याचे घरीं असतां तुमचे व माझे कोणत्याच रीतीनें बनत नाहीं याजबद्दल वेटाळचे सर्व लोक सांगतील, तुह्मी मामाचे घर सोडून याच कारणानें आपले बापाजवळ गेले तेथे ही मी गेली असतां तुह्मी मला हाकून लावले. वागवित नाहीं फारकती देण्याकरितां माझे बापास व इतर लोकांस दोन चार वेळां बोलावले फारकती ही देत नाहीं. वागवित ही नाहीं तुह्मास मी नोटीस देते कीं, तुमचा माझा आतां संसार होणें बनत नाहीं व तुमच्यानें मजला वागाविले ही जात नाहीं, सबब तुह्मी ही नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत मजला फारकती देऊन मोकळे करावे मी दुसरा घरठाव करीन अथवा तुह्मास फारकती देणें नसल्यास तुह्मी मी आजपावेतों जळगांवीं राहून अजमासे दोन वर्षे काढले त्या दोन वर्षांचे अन्नवस्त्राचा खर्च देऊन पुढें हमेशा उपजीवीकेसुद्धां अन्नवस्त्राची सोय करून खात्री लायक व्यवस्था करावी. मी तुमचे जवळ राहूं शकत नाहीं. व तुह्मी वागवू शकत ही, नाहीं ही पूर्ण खात्री झा

ाहे सबब एक महिन्यांत ह्या प्रमाणें मच्याकडून व्यवस्था न झाल्यास मुदतीनंतर ी तुह्मास ही नोटीस दिल्याचे आधारें मचा मजवर लग्न झाल्याबद्दल नवरेपणाचा ोणताही हक्क राहिला नाहीं. असे समजून ी दुसऱ्याशीं माझ्या मनाप्रमाणें वागून तीप्रमाणें संसार होण्याकरितां व्यवस्था करीन. मग तुह्मास मजला कांहीं ह्मणतां णार नाहीं ह्मणून ही नोटीस बजाऊन दिली आहे. कळावें तारीख ३१ दिसेंबर न १९१७ मु॥ जळगांव दस्तुर वंकटप्रसाद ामप्रसाद दलाल जळगांव

सही

झुमकी मर्द संपत सरोदे कुणबी
अलपुरा वा॥ व ता. जळगांव जि.
बुलढाणा इच्या हातची निशानी
बांगडी

नो० नं० ८८

---

## नोटीस

नोटिस बेशमी झिंगऱ्या मग्या चांभार रा. वरुडा पो. यवदा ता. दर्यापूर

यांस:—

मी खालीं सही करणार नोटिस देते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून मला अन्यायानें गेल्या ६ वर्षांपासून टाकून दिलेस. या मुदतींत मी लोकांचे कर्ज काढून बापाच्या आश्रयानें राहात आहे. मला नेण्याविषयीं माझ्या बापानें तुमची पुष्कळ विनवणी केली परंतु उपयोग झाला नाहीं. गेल्या महिन्यांत शेवटीं मी माझी लावटी भरून मला घेऊन जाण्याविषयीं वकिलानें नोटिस केली ती ही तूं स्वीकारली नाहींस. पण त्या नोटिशीचा बदनामी टाळण्या करितां तूं एकदां नुसताच माझे गांवीं येऊन गेलास. पण लोकांच्या देण्याची कांहींच व्यवस्था केली नाहींस तरी आतां शेवटीं या नोटिशीनें कळविते कीं ही नोटिस पावतांच ८ दिवसांत मला देणें झालेले अंदाजे ३०० तिनशे रुपये माझ्या बापास कर्ज फेडण्याकरितां देऊन मला घेऊन जावे. याप्रमाणें वरील मुदतींत न केल्यास तुझा माझी जरूरी नाही असें समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुझा मजवर कोणतेच प्रकारचा हक्क चालणार नाहीं. ही नोटीस स्वीकारण्याविषयीं तुं चुकवाचुकवी केल्यास तुला ही नोटीस पावली असें समजले जाईल. कळावें. ता. १४-२-१८

सहीची निशानी आंगठा
जनी मर्द झिंगऱ्या चांभार रा.
वडद ता. अकोला पो. दहिहांडा
नो. नं. ८२ हिचा खुद

---

## एका रुपयांत २५ फोटो.

### ( सिल्हर प्रिंटस् )

वऱ्हाडांतील नामांकित साधू संतांचे फोटोचा अमूल्य संग्रह. सर्व लोकांस वरील साधू संतांचे फोटोचा लाभ अल्प किंमतींत व्हावा एवढ्या करितांच किंमत फार अल्प ठेविली आहे. प्रती थोड्याच शिल्लक आहेत. तरी त्वरा करावी.

आमचेकडे सर्वतऱ्हेचीं फोटोचीं कामें ( एनलार्जमेन्टस ) वगैरे माफक दरानें केली जातात.

जी. डब्ल्यू. शिदोरे.
फोटो आर्टिस्ट. अकोला
नो० नं० ७६

---

# वऱ्हाडसमाचार

माघ शुद्ध १५ पिंगल संवत्सर १८३९

## विलायतेंतला व्याजबट्ट्याचा धंदा.

हिंदुस्थानातले सावकार अत्यंत लोभी, ते गरीब बिचाऱ्यांना पिळून त्यांचें रक्त शोषतात, असा त्यांचा दुर्लौकिकाचा डंका वाजवून सरकारी अधिकाऱ्यांनीं या सावकारांचें प्रस्थ कमी करण्यासाठीं वरिष्ठ कायदे कौंसिलांत एक बिल आणिलें आहे. या बिलांतल्या गुण दोषाचें विवेचन आह्मी मागें एका अंकांत केलें आहे. आज आह्मांस हेंच दाखवावयाचें आहे कीं हिंदुस्थानांतला सावकार हा कांहीं अजब प्राणी नसून असे प्राणी खुद्द हें बिल आणणाऱ्या अधिकारपदाधिष्ठित साहेबांच्या विलायतेंत सुद्धां आहेत. विलायतेंत सावकारी कशी चालते व तेथें ही या धंद्यापासून गरीब लोक कसे नाडले जातात याचा उत्कृष्ट माहिती सर रतन टाटा यांच्या उदार देणगीनें लंडन युनिव्हर्सिटींत गरीबांच्या प्रश्नाची मीमांसा करण्यासाठीं नेमिलेल्या प्रोफेसरांनीं लिहून ती 'सोशिआलॉजिकल रिव्ह्यू' मध्यें प्रसिद्ध केली आहे. तिचा सारांश आह्मी येथें देतों.

तिकडे कर्ज काढण्याच्या दोन पद्धति आहेत. एकींत कर्जाऊ रकम देतांनाच ती अमुक मुदतींत हप्त्या हप्त्यांनीं फेडण्याचा करार करून घेऊन व तितक्या मुदतीचें व्याज अगोदर कापून घेऊन सावकार बाकीची रकम ऋणकोच्या हातावर ठेवतात. व्याजाचा दर एक पौंडाला १॥ शिलिंगापासून ५ शिलिंगापर्यंत असतो. हप्ता बहुधा दर आठवड्यास एक पौंडास १ शि. या मानानें असतो. यांत ऋणकोला ठराविक मुदतीपर्यंत सगळ्या रकमेचा फायदा मिळत नाहीं. या शिवाय हप्ता वेळेवर न दिल्यास दंड, व तगादा करण्यासाठी पाठवाव्या लागणाऱ्या पत्रांचा खर्च द्यावा लागतो. दंडाचें प्रमाण दर आठवड्यास १ शि. स अर्ध्या पेनीपासून तीन पेन्सपर्यंत सुद्धां असतें. त्याचप्रमाणें तगाद्याच्या प्रत्येक पत्राचा खर्च दर पत्रास १ पनी पासून ३ पेन्सां पर्यंत धरतात. एका पत्रानें काम झालें नाहीं, आणि जामिनकी देणारांना पत्रें लिहिण्याचा प्रसंग आला तर त्याचा खर्च ६ पेन्स धरतात. ह्मणजे या पद्धतीनें व्याजाचा दर शे. ३३ व इतर खर्चाचें प्रमाण मिळून ऋणकोला शें. ४० पासून ८० पर्यंत रकम भरावी लागते! तरी ही पद्धति दुसऱ्या पद्धतीहून पुष्कळ बरी.

दुसऱ्या पद्धतीचा प्रकार असा आहे. सोमवारीं सावकाराकडून रकम काढावी व शनिवारीं ती व्याजासह परत द्यावी. व्याजाचा दर दर शि. स १ पेनी. ही व्याजाची रकम दिसावयाला इतकी लहान दिसते, पण हिशेबी दृष्टीनें ती दर साल दर शें. ६०८॥ इतकी होते! या पद्धतीनें कर्ज काढणारे लोक ह्मणजे नवऱ्याच्या न कळत कारभार करणाऱ्या बाया, किंवा पूर्वीच्या सावकाराच्या तगाद्याला त्रासून गेल्यामुळें त्याचें तोंड मिटविण्यासाठीं नव्या सावकाराचें तोंड पहावें लागलेले सुखवस्तु दिसणारे लोक किंवा मद्यपी, जुवेबाज वगैरे लोक असतात. या पद्धतीप्रमाणें आठवड्याच्या कोणत्य ही दिवशीं रकम कर्जाऊ काढली तरी तिची फड त्याच आठवड्याच्या शनिवारीं दर शि. १ पेनी प्रमाणें व्याजासह करावयाची हें ठरलेलें असतें. समजा, शुक्रवारीं १ शि. कर्ज काढलें. तरी तें दुसरे दिवशीं १ पेनी व्याजासह दिले पाहिजे. त्या मुदतींत फेड झाली नाहीं तर पुढच्या सोमवारपासून व्याजाचा दर दुप्पट होतो.

हा व्याजबट्ट्याचा धंदा करणाऱ्या लहान सान कंपन्या, लहान लहान दुकानदार, दारूच्या गुत्त्याच्या मालकाचे इष्टमित्र, अथवा अल्पस्वल्प रकमा ज्यांचे हातांत खेळत असतात अशा बाया बापड्या असतात. या बाया कधीं कधीं सावकारी धंदा करणाऱ्या कंपन्यांच्या एजंटांचें ही काम करतात. अलीकडे युद्ध सुरू झाल्यापासून लढाईवर गेलेल्या शिपायांच्या बायकांना 'वियोगा' बद्दल भत्ता मिळतो. त्या पैशांतून त्या हा धंदा करतात. सावकारी धंदा करणारानें आपलें नांव सरकारांत नोंदविलें पाहिजे असा कायदा सन १९०० सालीं झाला आहे. पण हे लोक या कायद्याला धाब्यावर बसवितात.

आतां अशा किरकोळ रकमा कर्जाऊ काढण्याचा उद्देश काय असतो तो पाहूं. पहिल्याच व्यवहाराचा उद्देश बहुधा चांगला असतो. ह्मणजे मुलांची शाळेची फी भरणें, त्याला नवा बूट विकत घेऊन देणें, मुलीला नवें पोलकें शिवणें, किंवा औषधपाणी करणें, नवीन चहाचें वगैरे दुकान काढणें, किंवा सामानाची दुरुस्ती करणें इ. गृहकृत्यांसाठीं किंवा धंद्याला प्रारंभ करण्यासाठी प्रथम कर्ज काढण्यांत येते. पण व्याजाचा दर जबर असल्यामुळें एकदां कर्जाच्या जाळ्यांत पाय अडकले कीं त्यांतून सुटका होणें मुष्किल होते. एक शिलिंग मुद्दलाची रास दहापांच वर्षांत ३० पौंड सुद्धां झाल्याचीं उदाहरणें आहेत! पुढें पुढें व्याजाची रकमच भरतां भरतां नाकी दम येतो. शेवटीं लोकांत दुर्लौकिक व फटफजीती होईल ह्मणून कित्येक आत्महत्यासुद्धां करतात! व्याजाचा दर कायद्यानें मर्यादित करण्याचा यत्न विलायतेंत केलेला नाहीं. सन १९०० सालच्या कायद्यानें येवढेंच केलें आहे कीं जर जजाला असें दिसून आलें कीं ऋणको कडून धनकोला मूळ मुद्दलाच्याहून अनेक पटीनें अधिक रकम निवळ व्याजाच्या रूपानें धनकोला मिळालेली आहे व दंड, तगाद्याच्या पत्रांचा खर्च वगैरे इतर बाबीही निष्ठुरपणाच्या आहेत, तर जजानें योग्य दिसेल त्या रकमेहून अधिक रकम ऋणकोकडून देवूं नये. विलायतेंतले व्याजबट्टा करणारे लोक ही कायद्याच्या तडाख्यांतून सुटण्याच्या बाबतींत वस्ताद असतात. ते ऋणकोला दिलेल्या रकमेबद्दल त्याच्या कडून पावती घेतात, पण ऋणकोनें भरणा केलेल्या रकमेबद्दल मात्र त्याला पावती देत नाहींत. ऋणको गरजू माणूस! पावती वांचूनच सगळा व्यवहार मुकाट्यानें करतो!

हे व्याजबट्टा करणारे आपल्या कुळाला कसें छळतात त्याचें वर्णन वाचलें कीं अंगावर कांटा उभा राहतो. ते आपली रकम वसूल करण्यासाठीं कायद्याचें साह्य क्वचितच घेतात. दंडुक्याचें साह्यच त्यांना फायदेशीर होते. ते मारहाण करण्याचा धाक घालतात; भर रस्त्यावर शिव्यागाळी करून इज्जत घेतात; शेवटीं धनको ओळखीच्या पोलीस कान्स्टेबलाला बोलावून आणून त्याचे कडून सावकारास उलट धमकी देववितात तेव्हां त्यांची सुटका होते. नाहींतर रस्त्यावरच मारहाण व्हावयाची. पण पोलीसाशीं खाजगी वळण सर्वांचेंच नसतें. ज्यांचें नसतें अशांना आपली इज्जत घालवून व मार खाऊन गप बसावें लागतें.

हें वर्णन वाचलें ह्मणजे आमच्याइकडे व्याजबट्टा करणाऱ्या काबुली, बलुची वगैरे लोकांचें स्मरण होतें. या रानटी लोकांच्या व्याजबट्टा करण्याच्या पद्धतींत व विलायतेंतल्या सुधारलेल्या ह्मणविणाऱ्या लोकांच्या पद्धतींत आह्माला तरी कांहीं फरक दिसत नाहीं. आमच्या इकडचे धंदेवाईक सावकार तर यापेक्षां शतपटीनें चांगले असें ह्मणावें लागतें.

---

## सरकार आणि स्वदेशी.

सरकारला लागणाऱ्या जिनसांपैकीं जेवढ्या 'स्वदेशी' मिळतील तेवढ्या सरकारी अधिकाऱ्यांनीं घ्याव्या असा सरकारी हुकुम असला तरी तो कागदांतला कागदांतच कसा राहतो व सरकारी अधिकारी आपल्या मर्जीप्रमाणें कसे वागतात याबद्दल मुंबईचे कातडी जिनसांचे कारखानदार करीमभाई यांनीं औद्योगिक कमिशनपुढें दिलेली साक्ष सर्वांच्या लक्षांत आहेच. सरकारी अधिकाऱ्यांचा असा उणेपणा दिसूं नये ह्मणून माल खरीदी संबंधाच्या सरकारी हुकुमांच्या पुस्तकांतच कांहीं शब्दांची फिरवाफिरव व दुरुस्ती करण्याविषयींची सूचना संयुक्त प्रांताच्या कायदेकौंसिलपुढें नुकतीच आली होती, व सरकारी अधिकाऱ्यांनीं सहानुभूतिपूर्वक तिचा स्वीकार केला असेल अशी कोणाची समजूत होईल. पण ही समजूत चुकीची आहे. सरकारी अधिकाऱ्यांची या गोष्टीला तत्त्वतः ह्मणजे शुष्क सहानुभूति आहे, पण प्रत्यक्ष क्रियेच्या प्रसंगीं ती लुप्त होत असते. वरील सूचना फेटाळून लावतांना सरकारी अधिकाऱ्यांनीं सांगितलें कीं युद्धानंतर सगळ्याच नियमांत महत्त्वाचे फेरफार व्हावयाचे आहेत तेव्हां विचार पाहतां येईल! यावरून युद्धानंतरचा काळ ह्मणजे रामराज्याचा काळ येणारा आहे व

त्यासाठीं आज सहन करतां येण्या सारख्या गोष्टी सुद्धां सरकार पुढच्यावर मुद्दाम ढकलूं पहात आहे असाच अर्थ घ्यावयाचा काय? पण लोकांना अप्रिय व दुसऱ्या एखाद्या वर्गाला अत्यंत प्रिय अशा गोष्टी सरकारी अधिकारी युद्ध संपण्याची वाट न पाहतां किंवा पुढें येणाऱ्या रामराज्यावर न सोंपवितां आज करून मोकळे होत आहेत याचा अर्थ काय?

## नागरिक-हक्क-संरक्षक कमिटी.

हिंदुस्थानच्या लोकांच्या महत्त्वाकांक्षा न्यायाच्या असून त्यांना योग्य हक्क दिले पाहिजेत अशी उदार भावना ब्रिटिश लोकांत जागृत होऊन त्यासाठीं मि. मांटेग्यु सारख्या बड्या अधिकाऱ्यांना इकडे पाठविण्यांत येत आहे, अशा वेळीं हिंदुस्थानच्या नागरिकांच्या हक्कावर सरकारी अधिकाऱ्यांकडून येणाऱ्या आक्रमणाचा प्रतिकार व त्या हक्काचें संरक्षण करण्यासाठीं एका कमिटीची योजना करण्याचा अवश्यकता लोकांना दिसून यावी ही अत्यंत खेदाची गोष्ट ह्मटली पाहिजे. हिंदुस्थानांतली जनता ह्मटली ह्मणजे सामान्यतः अज्ञान, आणि तींत जे सज्ञान व सुशिक्षित आहेत त्यांच्यावर सरकारी अधिकाऱ्याचा तीव्र कटाक्ष! ह्मणजे अज्ञानांना आपल्या हक्काचें ज्ञान नाहीं ह्मणून आणि सुशिक्षितांना तें असून ही प्रेस ॲक्ट व इंडिया डिफेन्स ॲक्ट सारख्या कायद्यानीं त्यांचें स्वातंत्र्य हरण केलें आहे ह्मणून एवंच हिंदुस्थानांत नागरिकत्वाचे हक्क उपभोगण्यांत असलेले क्वचींच दिसत नाहींत; उलट अधिकाऱ्यांना मात्र हवा तसा धुमाकूळ घालतां येतो असें बहुधा दृष्टीस पडतें. अटकबंदीच्या कायद्याखालीं देशांतलीं कित्येक नररत्नें, कित्येक उत्साही, व देशसेवेच्या स्फूर्तीनें प्रेरित झालेले तरुण, यांना त्यांची ही मातृभूमि अंतरत आहे, शेंकडो निरपराधी माणसें केवळ सरकारी अधिकाऱ्याच्या शंकाग्रहाच्या छायेंत सांपडल्यामुळें चौकशी वाचून कैद्याप्रमाणें वागविलीं जात आहेत! ही स्थिति सुधारण्यासाठीं व लोकांच्या हक्कांचें संरक्षण करण्यासाठीं विलायतेंतल्या नमुन्यावर मद्रास येथें एक कमिटी स्थापण्याचा विचार चालला आहे. या कमिटींत नामांकित कायदेपंडित प्रतिष्ठित व वजनदार पत्राचे संपादक, धनिक व्यापारी, व इतर कित्येक अब्रूदार गृहस्थ आहेत. कमिटी स्थापण्याचें काम सोपें आहे तें सहज करतां अलें. पण कमिटी हिंदी प्रजेला अत्यंत जाचक झालेले वरील कायदे बंद करण्याची खटपट कशी काय करणार तें पाहणें आहे.

## खरें स्थानिक स्वराज्य.

अखेर स्थानिक संस्थांना स्थानिक गोष्टींत कळकळीनें मन घालण्यास शिकवून, त्यांना स्वराज्याच्या कामीं तयार करण्याची युक्ति संयुक्त प्रांताच्या सरकारानेंच शोधून काढली ह्मणावयाची! युक्ति कांहीं नवी नाहीं; पण तिच्या खात्रीबंदपणा विषयीं सरकारी अधिकारी साशंक होते ते आतां निःशंक झाले असें पाहिजे तर ह्मणा. अननुभविक पण हुशार बुद्धिमान आणि कळकळीच्या माणसाचर तुला अनुभव नाहीं ह्मणून जबाबदारीचें काम सोंपवितां येत नाहीं असेंच नेहमीं ह्मणत गेलें तर त्याला अनुभव मिळविण्याची संधी प्राप्त व्हावी कशी? जबाबदारी टाकली पाहिजे, त्याला ठेंचा लागल्या पाहिजेत व त्या पासून तो शहाणपणा शिकतो कीं नाहीं तें पाहिलें पाहिजे. संयुक्त प्रांताच्या सरकारच्या ध्यानांत ही गोष्ट आली आहे हें सुदैव ह्मटलें पाहिजे. जिल्हा बोर्डासंबंधानें हें सरकार आपल्या रिपोर्टांत ह्मणतें कीं ज्या 'कित्येक बोर्डाविषयीं अधिकाऱ्यांकडून प्रतिकूल रिपोर्ट आले आहेत, त्या बोर्डाच्या कमिट्यावर कांहीं निश्चित कामें सोंपवून त्याबद्दलची जबाबदारी त्यांचेवर टाकण्याचा खराखरा यत्न कधीं करून पाहण्यांत आला होता काय तें अगोदर कळलें पाहिजे. कारण जेथें हा प्रयत्न करून यश आलें, तेथें त्यांच्या शेजारी पाजरीं हा तशा तऱ्हेचे यत्न केले असते तर यश आलें असतें. उदाहरणार्थ, झांशीच्या लोकप्रतिनिधीचे अधिकार वाढविण्यांत आले व त्यांचेवर भरंवसा टाकला, त्याबरोबर त्यांची कर्तृत्वशक्ति ही अधिक दिसून आली; इतकेंच नाहीं, तर खर्चांत ही काटकसर झालेली आढळली. पण हिंदी लोकाच्या हातीं अधिक हक्क व अधिकार देऊन ते त्यांचा कसा उपयोग करतात तें पाहणें ह्मणजे एखाद्या भयंकर हानिकारक अशा गोष्टीचा प्रयोग पहणें आहे असें जेथें सरकारी अधिकाऱ्यांना वाटतें तेथें स्थानिक स्वराज्याचें पाऊल मुंगीच्या गतीनें तरी पुढें पडत आहे यांतच समाधान मानून वेळ भाग पडावें यांत काय आश्चर्य?

## राष्ट्रीय शिक्षणाचा आठवडा.

ता. ८ एप्रिल ते ता. १५ एप्रिल हा आठवडा राष्ट्रीय शिक्षणाचा विशेषतः मानण्यांत येऊन या आठवड्यांत हिंदुस्थानांत या विषयासंबंधानें विशेष प्रकारची जागृति व यत्न करण्याचें ठरलें आहे. हें ठरविण्यांत सर रासबिहारी घोष, मिसेस बिझांट, सर रवींद्रनाथ टागोर, लो. मा. टिळक वगैरे प्रमुख विद्वान् गृहस्थ असून त्या सर्वांच्या विचारानें या शिक्षणविषयक मोहिमीचा नकाशा आखण्यात आला आहे. तो असाः— या आठवड्यांत प्रत्येक जिल्ह्याच्या व तालुक्याच्या गांवीं व त्याच प्रमाणें खेड्यापाड्यातून ही एकेक कमिटी नेमिली जाऊन तिच्या देखरेखी खालीं राष्ट्रीय शिक्षणाचें महत्त्व लोकांना व्याख्यानांच्या गाण्यांच्या व लेखांच्या वगैरे स्थानें कळविण्यांत यावें; स्वयंसेवकाच्या साह्यानें घरोघर हिंडून वर्गणी गोळा करण्यांत यावी; प्रत्येक धंद्याच्या लोकांनीं आपापले पंच नेमून त्यांचे मार्फत वर्गणी जमा करावी; शिक्षणाचें महत्त्व दर्शविणाऱ्या ठळक अक्षरांच्या पाट्या गांवांत जागोजाग लावाव्या; या आठवड्यांत वर्तमानपत्रांनीं याच विषया वरील लेखांनीं आपले रकाने भरावे; सगळी चळवळ देशी भाषेच्या द्वारें करण्यांत यावी; व या सर्व चळवळीचें केंद्र मद्रास येथें मि. अरुंडेल यांच्या सेक्रेटरीखालीं स्थापन झालेली राष्ट्रीय शिक्षणप्रसार कमिटी समजावी. अशा प्रकारची ही चळवळ नवीन स्वरूप धारण करून हिंदुस्थानांत सर्वत्र एक आठवडाभर दिसणार आहे. कोणत्याही विषयाचा निदिध्यास लागल्याशिवाय त्या विषयाला तन मन धन अर्पिलें जात नाहीं. ह्मणून हा निदिध्यास मुद्दाम लावून घेण्याची एक युक्ति आहे. ही युक्ति पहिल्याच वर्षी कदाचित् सफल झालेली कदाचित् दिसली नाहीं, तरी भविष्यकाळीं तिला उज्ज्वल स्वरूप येणें संभवनीय आहे. दिसेंबरचा शेवटचा राष्ट्रीय सभेचा आठवडा जो आज लक्षावधि सुशिक्षितांना राष्ट्रीय सण इतका महत्त्वाचा वाटत असतो त्याला येवढें स्वरूप येईल असें तीस वर्षांपूर्वी कोणाला वाटलें होतें?

## मध्य प्रांतांतलें सहकारित्व.

मध्यप्रांतांतल्या सहकारी मंडळ्यांच्या कामांचा १९१६—१७ साला बद्दलचा रिपोर्ट नुकताच बाहेर पडला आहे. गेल्या सालीं प्रांताची सांपत्तिक स्थिति उत्तमांतली नव्हती यामुळें या चळवळीच्या अंगचा चिवटपणाचा नेम एक प्रकारें कसाला लागला असें ह्मटलें पाहिजे. दुसरीकडे ज्यास्त व्याज मिळत असतां ही लोकांनीं आपल्या ठेवी सहकारी बँकांतून व सोसायट्याचे पाशीं ठेविल्या, यावरून लोकांचा विश्वास त्यांचे ठायीं जडला आहे असें दिसतें. मंडळ्यांची संख्या गतवर्षी २६८५ होती, ती गेल्या सालीं ३६२७ झाली. या मंडळ्यांनीं आपल्या भांडवलांतून युद्धकर्जाचें रोखे खरेद केले ही गोष्ट रिपोर्टांत मुद्दाम नमूद केली आहे. शेतकी शिवाय इतर कार्यासाठीं स्थापन झालेल्या मंडळ्यांच्या कामाचें पाऊल तुलना करून पाहतां तितकें पुढें पडलेलें नाहीं. याचें एक कारण असें रिपोर्टांत सांगितलें आहे कीं कारागिराचा वर्ग आपलाच मिंधा व आपल्याच हुकमतींत राहावा अशी इच्छा धरणारेच बहुधा अशा मंडळ्यांचे चालक असल्यामुळें त्यांचे प्रयत्न देखल्या देवाला घातलेल्या दंडवताप्रमाणें कृत्रिमपणाचे असतील, खऱ्या कळकळीचे नसतील. हें कारण आह्मांला खरें वाटत नाहीं. कारागिर वर्गाची उन्नति मंडळ्या स्थापून करा असा मंडळ्यांच्या चालकांच्या डोक्यावर कोणी धोंडा दिलेला नाहीं. असें असता सद्बुद्धीनें प्रेरित होऊन चालविलेले त्यांचे प्रयत्नासंबंधानें सरकारी रिपोर्टांत अशा तऱ्हेचे निंद्य आरोप सूचित करण्यांत यावे ही दुःखाची गोष्ट आहे. त्यांचे प्रयत्नांत नेम नसण्याला स्वार्थाशिवाय अन्य कांहीं कारणांची संभवनीयता नसेल असें ह्मणण्यास आह्मी तयार नाहीं, आणि अशा प्रकारचे आरोप करण्यानें सदर चळवळीला जोर येऊन कारागिरवर्गाचें अधिक हित होईल असें जर सरकारी अधिकाऱ्यांत वाटत असेल तर ती त्यांची चूक आहे. सरकारी रिपोर्टांत प्रतिष्ठित लोकांच्या कळकळी संबंधानें अशी शंका प्रदर्शित करणें ही गोष्ट हिंदुस्थानांतच ह्मणून खपली जाते. अमेरिकेसारख्या देशांतून असे आरोप करण्याची छाती सरकारी अधिकाऱ्यांची होईल कीं नाहीं याची शंका आहे.

## 'हिंदुस्थानचे लोक नालायक!'

याला आणखी प्रमाण काय पाहिजे? पंजाबांतल्या म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डे यांच्या रिपोर्टावर सर मायकेल ओडवायर यांनीं केलेलें परीक्षण पहा; कांहीं ठिकाणीं लोकांनीं पैसे खाऊन अधिकाराचा दुरुपयोग केलेला आहे. बस झालें. कांहीं लोक तरी असे आहेतना? आणि ते ही हिंदुस्थानांतच आहेतना? मग स्थाली पुलाक न्यायानें एकंदर हिंदुस्थानच्या लोकांना नालायक ठरविण्यास कोणती हरकत आहे? बहार व ओरिसा प्रांताच्या म्युनिसिपालिट्यांतून ही असे लोक असल्याचें आढळून येतें. वरच्या विधानाला यानें नाहीं का बळकटी येत? पण दम धरा. येवढी उतावीळ करूं नका. एक मोठी भोंड या विधानाच्या आड येते आहे, ती कोणती? तर या म्युनिसिपालिट्या सरकारी सिव्हीलियनाच्या अध्यक्षपणाखालीं होत्या! त्यानें कसे हे प्रकार चालू दिले? एक तर तोही या गोंधळांत सामिल असला पाहिजे, किंवा नालायक तरी असला पाहिजे. कोणतें पत्रकर्ते बोला असें खेडसाळ हिंदी पत्रकर्ते विचारतील. हे पत्रकर्ते फार द्वाड बुवा! जेथें तेथें असे अडचणीचे प्रश्न विचारतात. यानः सरकारनें इतक्या मुसक्या घातल्या तरी यांचा नाठाळपणा जात नाहीं.

## सुधारलेल्या देशांतून काय स्थिति आहे ?

हिंदी लोकांच्या अपात्रते संबंधानें वरच्या सारखे उद्गार काढणारे सिव्हीलियन अधिकारी इंग्लंड व अमेरिका सारख्या सुधारलेल्या देशांत स्थानिक स्वराज्याची काय स्थिति आहे तें कां पाहत नाहींत? थोड्या वर्षांपूर्वी रिव्ह्यु ऑफ रिव्ह्युजचे माजी संपादक प० वा. मि. विल्यम स्टेड यांनीं इफ् क्राइस्ट केम टु शिकागो (ख्रिस्त शिकागोला आला तर) नांवाचें पुस्तक लिहून त्यांत अमेरिकेंतल्या स्थानिक स्वराज्यांतले जे अनान्वित प्रकार चवाठ्यावर आणिले ते पाहिले तर त्या मानानें आमच्या म्युनिसिपालिट्यांचा कारभार रामराज्यांतल्या कारभारासारखा निर्दोष वाटूं लागेल. रॅंडलिच व हिर्स्ट या दोघांनीं मिळून इंग्लंडच्या स्थानिक स्वराज्यासंबंधानें लिहिलेल्या ग्रंथांत ह्मटलें आहे- 'म्युनिसिपालिट्यांचा पैसा लोककार्याला अंशतः मात्र लागतो. बराचसा भाग मेजवान्या झोडण्यांत, व्यक्तींच्या हितसाधनांत, फार काय पण अनीतीच्या व लोकांचें चारित्र्य भ्रष्ट करणाऱ्या गोष्टींत सुद्धां खर्च होतो!' मि. ब्राइस यांनीं अमेरिकेंतल्या म्युनिसिपल इलेक्शनच्या वेळीं होणारे प्रकार वर्णिले आहेत, ते पाहिले तर अमेरिकन लोकांपुढें आमच्यांतले अत्यंत दुराचरणी लोक सुद्धां साधु ठरतील. पण हिंदुस्थानच्या लोकांना अपात्र ठरवावयाचेंच असा निश्चय झाल्यावर आपल्या पायांखाली काय जळतें आहे तें पाहतो कोण?

## महायुद्धाची प्रगति.

सध्याचे मुख्य प्रधान व त्याचे सोबती यांनीं मि. ॲस्क्विथ यांना मुख्य प्रधानकीची जागा सोडण्यास लाविल्या पासून मि. ॲस्क्विथ यांनीं बरीच गम खाल्लेली दिसते. तथापि मधून मधून विशेष प्रसंगीं पक्षाभिमान उचल खाऊन हल्लींच्या प्रधानमंडळाच्या कार्य पद्धतींतल्या दोषांचें अविष्करण करण्यास त्यांना प्रवृत्त करीत असतो. नुकत्याच फ्रान्समध्यें व्हर्सेलीज येथें झालेल्या वार कौंसिलच्या बैठकीनें मि. ॲस्क्विथ यांना आयती संधी ही आणून दिली व पार्लमेंट उघडतांच या कौंसिलानें केलेल्या ठरावासंबंधाच्या प्रश्नांचा भडिमार मि. ॲस्क्विथ यांनीं केला. केवळ सल्लागार मंडळ असतां सर्व राष्ट्रांच्या सैनिकांवर हुकूम बजावण्याचा अधिकार वार कॅबिनेटला कोणीं दिला असा प्रश्न मि. आस्क्विथ यांनीं विचारतांच मि. लाइड जॉर्ज यांचें ही पित्त खवळलें, आणि युद्धमंडळांतील निर्णय गुप्तच राहिला पाहिजे, तो जाहिर करणें ह्मणजे देशद्रोह होय, तो मी करणार नाहीं इतकेंच सांगून ते स्वस्थ न बसतां मि. ॲस्क्विथ यांनीं आपल्या विषयीं उच्चारलेल्या उपरोधिक शब्दांचा त्यांनीं तीव्र निषेध केला. मी उपरोधिक बोललों नाहीं, मी सरळ प्रश्न विचारले, उपरोधिकपणा असला तर उलट पक्षासच आहे असें मि. ॲस्क्विथ बोलले. शेवटीं मि. लॉइड जॉर्ज यांनीं आपले शब्द परत घेतले. अशा तप्त वातावरणाची उष्णता पार्लमेंटच्या इतर कित्येक सभासदांच्या प्रश्नांनीं व उद्गारांनीं बरीच वृद्धि पावली होती. इतकी कीं हल्लींच्या मंत्रिमंडळावर तुमचा विश्वास नसेल तर तें बदलून टाका, पण आपल्या गुप्त बातम्या चवाठ्यावर आणून शत्रूचा फायदा करून देऊं नका असें मि. लॉईड जॉर्ज यांस सांगावें लागलें. अखेर हा वाद येथेंच मिटून उठलेलें वादळ तूर्त शांत झालें.

---

या खडाजंगी वादाचा तात्कालिक परिणाम असो कीं कांहीं असो, पण इंपीरियल जनरल स्टाफच्या चीफ ऑफिसराच्या अधिकाराला व्हर्सेलिज कौंसिलनें मर्यादा घातल्याचें बाहेर आलें व ही गोष्ट हल्लींचे चीफ ऑफिसर सर वि. रॉबर्टसन यांना नापसंत होऊन त्यांनीं तत्काळ आपल्या जागेचा राजीनामा दिल्याचें व त्यांचे जागीं सर हे. विल्सन यांची नेमणूक केली असल्याचें वर्तमान लागलींच आलें. या राजीनाम्याबद्दल ही एक गूढ आहे. सर वि. राबर्टसन यांनीं राजिनामा दिला कीं त्यांना बरतर्फ करण्यांत आलें तें नक्की कळत नाहीं असें विलायतचीं पत्रें ह्मणत आहेत.

---

## तहाचे परिणाम.

युक्रेनियनांनीं जर्मनीशीं जो तह केला त्याचे परिणाम एकंदर युरोपच्या भोगावे लागतील असें विलायतचीं पत्रें ह्मणत आहेत. रशियाचा कांहीं मुलुख जर्मनीनें युक्रेनियन लोकांना देऊन त्याच्या किंमतीच्या मोबदल्यांत ( निराळ्या शब्दांनीं ह्मणावयाचें ह्मणजे युक्रेनियन लोकांना लाच देऊन ) हा तह घडवून आणिला आहे. पण याच्या योगानें पोलांडच्या हिताला मोठा धक्का बसला असल्यामुळें पॉलिश लोक ह्या विरुद्ध ओरड करीत आहेत; दुसरा परिणाम आस्ट्रियाला भोगावा लागत आहे. या भानगडीमुळें आस्ट्रियाच्या मुख्य प्रधानानें आपल्या जागेचा राजीनामा दिला आहे. ब्रेस्ट लिटोव्हस्क येथें जमलेल्या प्रतिनिधींनीं रशियाची ठरविलेली सदरहू रशियाच्या नुकसानीची आहे असें रशियाचें ह्मणणें आहे. त्याचें समाधान जर्मनीनें दिलेल्या अरेरावीपणाच्या उत्तरानें झालेलें नसल्यामुळें रशियांत असंतोषाचा वन्हि धुमसत आहे.

---

## वैमानिक चळवळी.

लंडनवर वैमानिक हल्ले करण्याचा जर्मनीचा क्रम जारीनें सुरू आहे. मागच्या शनिवारीं रात्रीं सहा जर्मन विमानें टेम्स नदीच्या मुखापर्यंत गेलीं होतीं. पैकीं पांच तर ब्रिटिश लोकांनीं माघारीं परतविलीं. पण एक विमान त्यांची नजर चुकवून थेट त्या राजधानीपर्यंत गेलें आणि त्यानें खालीं बॉंब टाकला. नुकसान ह्मणण्यासारखें झालें नाहीं. पण यावरून ब्रिटिश वैमानिकांची व्यवस्था असावी तशी दक्षतेची नसून तिच्यांत शिथिलता आहे अशी टीका इंग्रजी वर्तमानपत्रें करीत आहेत.

---

## प्रचंड बोगदा.

युरोपखंड व आशिया मैनर यांच्या मधल्या जागेखालून एक प्रचंड बोगदा खोदीत न्यावयाचा विचार आज कित्येक दिवसापासून चालला आहे. अखेर या योजने बद्दलचें बिल तुर्की पार्लमेंटनें मंजूर करून तें काम बुडापेस्ट येथील एका कंपनीकडे दिलें व ती कंपनी येत्या एप्रीलमध्यें कामास सुरुवात करणार आहे अशी बातमी कोपनहेगनहून आली आहे.

---

## लढाईची तयारी.

युक्रेनियन लोकांनीं जर्मनीशीं केलेल्या तहानें त्यांना जो फायदा मिळाला तो बोलशेव्हिक लोकांना न खपल्यामुळें ते लढाईची तयारी करीत आहेत अशा बातम्या येत आहेत. युक्रेनियावर हल्ला करून तेथील धान्याचीं कोठारें हस्तगत करावयाचीं, व त्या धान्याचा एक कणही जर्मनी व आस्ट्रिया यांना मिळूं द्यावयाचा नाहीं असा बोलशेव्हिक लोकांचा विचार आहे. इतकेंच नाहीं तर त्या लोकांनीं रेव्हल येथें पकडलेले जर्मन आपण ओलीस ह्मणून ठेवणार, व प्रसंग पडल्यास त्यांना ठारही मारणार अशी धमकी देत आहेत. यामुळें बोलशेव्हिक लोकांशीं लढाई करणें आतां अपरिहार्य आहे असें जर्मनीला वाटूं लागलें आहे, व त्याप्रमाणें त्यांची तयारीही चालली आहे. एवंच, रशियाकडून मित्रराष्ट्रांना प्रत्यक्ष मदत जरी अलीकडे कांहीं झाली नाहीं किंवा होण्याची आशाही नाहीं, तरी कांहीं जर्मन फौज आतां रशियांत गुंतवून ठेवणें जर्मनीला भाग पडेल आणि अशा अप्रत्यक्ष रीतीनें रशियाचें मित्रराष्ट्रांना थोडें बहुत साह्य होईल.

---

## संस्थानिकांना मान

सरकारकडून नुकत्या निघालेल्या एका जाहिरपत्रकावरून कळतें कीं, निजामसरकार व बिकानेर, ग्वालेर, पतियाळा व नवानगर येथील संस्थानिकांना संयुक्त युद्ध कमिटीचे उपाध्यक्ष होण्याविषयीं सरकारकडून विचारण्यांत आलें आहे. या कमिटीचे मेंबर होण्याविषयीं मुंबईचे ना. पुरुषोत्तमदास ठाकुरदास, कुर्रीचे राजा सर रामपाल सिंग व रा. रा. ब. लालचंद चौधरी (पंजाब) यांना ही विचारण्यांत आलें आहे. या कमिटीचें सभासदत्व केवळ नामधारी आहे कीं सभासदांच्या सल्ल्यानें कमिटीचे काम चालून युद्धासंबंधाच्या व्यवस्थेवर त्यांच्या मतांचा कांहीं प्रभाव पडणार आहे वगैरे कांहींच माहिती जाहिर करण्यांत आली नसल्यामुळें या नेमणुकांसंबंधानें कांहींच मत प्रकट करतां येत नाहीं. देशी संस्थानिकांच्या इभ्रतींत व मानापानांत या मानाची आणखी एक भर पडली आहे इतकेंच तूर्त आह्मी ह्मणतों.

---

## उत्पन्नावरील कर.

इनकमट्याक्स् आक्टाची पुनरावृत्ती होऊं घातली आहे. अलीकडे इनकमट्याक्सचा कारभार करणारे अधिकारी लोकांना फार भंडावून सोडतात अशा अनेक तक्रारी ऐकूं येत असतात. इनकमट्याक्स ह्मणजे एक सिंहाचें पिलूंच घरांत शिरल्यासारखें वाटतें. दोन वर्षांपूर्वींच या कराची आकारणी थोरल्या प्रमाणावर करण्याविषयीं जेव्हां कायदा पसार झाला तेव्हां तो लढाईच्या पुरताच अमलांत राहील आणि लढाईच्या कामानिमित्त ही योजना अमलांत राहील असें सांगण्यांत आलें होतें; पण आतां या आक्टाचें नवें बिल वरिष्ठ कायदेकौंसिलापुढें आलें आहे. त्याचा हेतू शेतीचीं उत्पन्नें या कराच्या सदराखालीं आणण्याचा आहे. या संबंधानें बोलतांना नामदार दादासाहेब खापर्डे यांनीं हें बिल त्याज्य आहे असें दाखविण्यासाठीं मोठें जोरदार भाषण केलें. त्यांनीं या बिलाला उपमा देतांना एका चित्रांत पुढून व आजूबाजूनें तीन चेहरे दाखविणाऱ्या फोटोची उपमा दिली. हें चित्र ह्मणजे महाराणी व्हिक्टोरिया, त्यांचे पती व किंग एडवर्ड हे तीन चेहरे दाखविणारे जुन्या शालागृहांतील चित्र होय. त्यांच्या भाषणाचा सारांश असा कीं इनकमटॅक्सचा कायदा हा कायमचा नसावा. आग विझवायला आलेले बंब आग विझल्यानंतर आपल्या बंबखान्यांत परत जातात त्याप्रमाणें हा कायदा तात्पुरत्या पैशाच्या नडीपुरता अमलांत असला पाहिजे. तेव्हां या कायदे कौंसिलाच्या ऐरणीवर हा उत्पन्नाचा नवा कायदा न येईल तितकें बरें. प्रत्यक्ष अनुभव निराळा येईल हें स्वराज्यवादी लोकांनीं पूर्वींच भविष्य सांगून ठेविलें आहे.

---

## अर्धचंद्र

### ( मानपत्राची हद्दपारी )

सरकारी मानपत्रें हा एक शिष्ट संप्रदाय बनलेला आहे; पण त्यांच्या उपयोगापेक्षां तीं जेव्हां निवळ खर्चाची बब होतात आणि व्यक्तिवाचक प्रशंसनापर अतिशयोक्तीचे अलंकार बनतात तेव्हां आह्माला तर जुन्या नाटकांतील राजदरबारांची आठवण होते. गेल्या बुधवारी सर बेंजामिन यांना आकोला जिल्हाबोर्डातर्फे रावबहादूर केशव गोविंद दामले यांनीं जें मानपत्र उच्च स्वरात वाचून दाखविलें तें अशाच दोषांनीं परिप्लुत होतें. मॅट्रिक्युलेशनला बसणारे विद्यार्थी जसा सुवचनांनीं आपला निबंध फुगवितात तसेंच हें मानपत्र निर्व्याज सुंदर आहे. सर बेंजामिन यांनीं पूर्वीं आपली पसंती प्रदर्शित केली तेव्हांच तें वाचण्यांत आलें असलें पाहिजे. तेव्हां अशा नाजुक गोष्टींत आह्मी फक्त लोकमताची दिशा दाखवून येथेंच थांबतों. या मानपत्रांत कोठेंच कल्पनेचें वैचित्र्य नाहीं, किंवा भावी राजकारभाराच्या रेषा ही कोठें आंखून दिलेल्या नाहींत, आणि स्थानिक सरकारच्या पाशीं मागण्यां इतकी याचकी श्रीमंतीही तर्थे कोठें प्रकाशित नाहीं. परितृप्त मनोरथवाला किंवा दरिद्री मनोरथवाला असेच शुष्क मानपत्र देतील. या दोहोंपैकीं आमच्या जिल्हाबोर्डाची कोटी वाचकांनींच निश्चित करावी. आमच्यामतें सरकारी किंवा बिनसरकारी संस्थांनीं यापुढें मानपत्राला अर्धचंद्र द्यावा आणि हाच मार्ग खरा शहाणपणाचा होईल.

---

## अर्थवाद.

### ( स्वराज्याची लायकी )

सर बेंजामिन यांनीं गेल्या बुधवारच्या मानपत्राच्या समारंभांत रा. रा. काशिनाथ श्रीराम जठार यांच्या या जिल्ह्याच्या उत्कृष्ट कारभाराबद्दल फार वाखाणणी केली आणि त्यांच्या जिल्हाबोर्डाच्या व ग्राम पंचायतीच्या कामगिरीबद्दल मोठा गौरव केला आहे हें कळविण्यास आल्हाद वाटतो आणि त्या भाषणाच्या ओघांत ते असेंही ह्मणाले कीं राजश्री जठार यांच्या वर्णनीय गोष्टी लोकांच्या आठवणींत चिरकाल जागृत राहतील यावरून राजश्री जठार यांची बढती जिल्हाधिकाऱ्याच्या हुद्यापासून प्रांतिक इन्स्पेक्टर जनरल नोंदणीखातें या हुद्यावर होणार आहे आह्मी असें ऐकतों, तेंही या उद्गारांत स्पष्टपणें ध्वनित आहे. देशी अधिकाऱ्याची प्रशस्ती ह्मणजे स्वराज्याच्या लायकीचा पुरावा होय आणि याच दृष्टीनें आह्मी अशा उद्गारांचें विशेष अभिनंदन करीत असतों. नाहींतर आमचा अनुभव असें सांगतो कीं कित्येक तरी जठार आमच्या मध्यें विद्यमान आहेत; पण या युरोपियन संकोचामुळें देशी बुद्धीच्या प्रसृतीला अवसरच मिळत नाहीं.

---

## स्टॅंडन रोड.

मंगरूळपीरहून आकोल्या पर्यंत जो नवा रस्ता अकोला जिल्हा बोर्डानें एक लक्ष रुपये खर्च करून तयार केला आहे त्याचें नामाभिधान आकोला जिल्हा बोर्डाच्या

पाळण्यांत स्टँडन रस्ता असें आलेशान नामदार सर बेंजमिन यांनीं गेल्या बुधवारीं मोठ्या समारंभानें ठेविलें. या पुढें जेव्हां जेव्हां आह्मी 'स्टँडन रस्ता' असा उल्लेख करूं तेव्हां तेव्हां आह्मांला आकोला जिल्हा बोर्डाला हें पब्लिक वर्क्स खात्याचें काम करण्याचा अधिकार देणाऱ्या अधिकाऱ्याची आठवण होत जाईल. राजश्री स्टँडन हे सत्यानिष्ट आहेत, कर्तव्यदक्ष आहेत आणि थोर आंग्लोइंडियन अधिकाऱ्या प्रमाणें कल्याणदृष्टीही आहेत. तेव्हां त्यांच्या सारख्या निस्पृह अधिकाऱ्याचें नांव वऱ्हाडांत अजरामर होत आहे ही आनंदाची गोष्ट होय. राजश्री स्टँडनच काय, कोणता ही कमिशनर असता तरी त्याचें नांव या रस्त्याला देण्यांत आलें असतें. आमच्या लोकांना अधिकाऱ्यांचा गौरव करण्याची संवयच लागलेली आहे आणि आकोल्याचा जिल्हा बोर्डअशाच संवयीच्या लोकांची संस्था आहे. इंग्रजी आर्य शीलाचा गौरव होईल, त्याची संस्कृती आपल्या वर्तनांत कार्यवाही करितील आणि त्यांचा तो अभिमान व स्वातंत्र्य हीं वर्तनांत उतरूं लागतील तर आह्मी या स्टँडन रस्त्यासारख्या मार्गसमर्पणाचें मनोभावानें कौतुक करूं. पण अधिकारापुढें मान लववली आहे असा जेथें त्या समर्पणांत लोकांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष ग्रह बनतो तेथें असा समर्पणाचा खरा लाभ देशास कधींच मिळत नाहीं. राजश्री स्टँडन हे आपल्या अनुभवानें व कारकीर्दीच्या मोठेपणानें पुढें मागें चीफ कमिशनर होण्याच्या पंथांत आहेत, तेव्हां आमच्या जिल्ह्यांत त्यांच्या नांवानें चालणारा हा नवा स्टँडन पंथ भावी सोईचाची पायरी होवो असें आह्मी मनोभावानें इच्छितों. सर बेंजामिन यांच्या हस्तें हा रस्ता उघडण्यांत आला व तसें करतांना त्यांनीं राजश्री स्टँडन यांची प्रशस्ती गाइली ती सरकारी अधिकाऱ्यांच्याच मुखानें नीटशी शोभत नाहीं.

## अभिवचन
### (सरकारी आशिर्वाद)

जिल्हाबोर्डाच्या मानपत्रावर उत्तर देतांना सर बेंजामिन यांनीं आपली विद्याप्रसाराविषयींची बळकट इच्छा अभिव्यक्त केली, आणि त्याबद्दल सर्व प्रजाजन त्यांचे फार ऋणी राहातील. लोक कल्याणाच्या गोष्टी या जिल्ह्यांत प्ररूढ आहेत, त्या सर्वांच्या शिरोभागीं विद्याप्रसाराचा प्रश्न होय. शेतकीची सुधारणा अंमलांत येत आहे, व सहकारी संस्था वाढत चालल्या आहेत. पण या नव्या कल्याणाच्या गोष्टी प्रसृत करण्या इतकी लोकांची आकलन शक्ती ही वाढत गेली पाहिजे. सध्याच सर्व राष्ट्रभर हिंदुस्थानाच्या अभिवृद्धीबद्दल वाद चालू असून जबाबदार सरकार प्रस्थापित करण्याविषयीं सर्वत्र प्रवृत्ती आहे. पण या थोरल्या प्रश्नांत शिरण्यापूर्वीं या नव्या सुस्थितीचा पाया चांगला मजबूत होण्यासाठीं खेडोपाडीं सार्वत्रिक विद्याप्रसार झाल्याशिवाय गत्यंतर नाहीं. नुसत्या शाळा वाढवूनच उपयोग नाहीं. शिक्षणाचा क्रमही सुधारला पाहिजे. सर बेंजामिन यांचें हें अभिवचन फार आनंदमय आहे आणि ते कृतींत उतरविण्यासंबंधानें ते सर्वपरीनें पराकाष्ठा करून सोडतील असा आह्मांस भरंवसा आहे. या नंतर त्यांनीं आकोला जिल्हाबोर्डानें शाळापट्टा वाढविण्याचा केलेला संकल्प मोठ्या आनंदानें सांगितला आणि स्थानिक सरकार या कामीं डिस्ट्रिक्ट बोर्डाचें पूर्ण सहकारी होईल असें सांगून शालागृहाकडे होणाऱ्या खर्चाचा त्यांनीं मोघमांत निर्देश केला.

---

## गत्रोंक्ति.

वऱ्हाडांत चांगले रस्ते नाहींत, मुबलक रेल्वेचें दळणवळण नाहीं आणि त्यामुळें एवढा चांगला सुंदर सुपीक वऱ्हाडसारखा प्रदेश अचाप व्यापाराच्या अभिवृद्धींत रस्त्याच्या अभावामुळें मागासलेला आहे हें लक्षांत आणून सर बेंजमिन आश्चर्यानें ह्मणालें कीं इतकीं वर्षें ही अशी दशा चालूं राहिली याचेंच मला आश्चर्य वाटतें. पूर्वीच्या नोकरशाहीच्या अमदानींत या गोष्टी घडल्या नाहींत त्या आतां आह्मी घडवून आणणार आहों असें जें त्यांनीं आपल्या भाषणांत ध्वनित केलें तें मोठ्या मौजेचें व कौतुकाचें आहे. लढाईमुळें सध्या रस्ते बंद पडले असले व रेलवेची कामें तहकूब असलीं तरी आमची तक्रार नाहीं; पण या राज्यकारभाराच्या रस्त्याच्या सोयीपेक्षां लोककल्याणाचीं विद्याकार्यें जर अगोदर हातांत घेतलीं आणि विद्यासंपन्न झाल्या नंतर पुढें दहा वर्षांनीं जरी आह्मला नवे रस्ते व रेल्वे मिळाल्या तरी आह्मी सरकारचे आभारीच राहूं.

---

## शांतिमंदीर.

ब्रिटिश सुराज्य इंडियांत कसे नांदत आहे, पण त्या बरोबर या महायुद्धाच्या वेळीं इंडिया सारखें महाद्वीप किती तरी पराक्रम शून्यदिसत आहे, हीं दोन्हीं चित्रें डोळ्यापुढें उभीं राहिलेलीं पहून राजश्री टिळक यांस इंडियाची शांती वीरश्रीच्या दृष्टीनें स्मशानशांती सारखी वाटते. आणि ह्मणूनच ते खंडवा येथील जाहिर सभेंत बोलतांना ह्मणाले कीं स्वराज्य पाहिजे तें ही स्मशानशांती मोडून टाकण्यासाठींच पाहिजे. मंगलकारक पुण्यमय व पराक्रमशाली असें शांतिमंदिर जर इंडियन राष्ट्र दाखविणार नाहीं तर ब्रिटिश साम्राज्य इंडियांत येऊन निरर्थक झालें असेंच होईल. ब्रिटिश साम्राज्याची दैवी कामगिरी अजून पुढेंच आहे आणि ती कामगिरी ह्मणजे इंडियाच्या शांति मंदिराची प्रस्थापना होय. सुराज्याचें स्वराज्य होईल तरच हार्दिक एकीभवन होण्याचा संभव आहे आणि मोठ्या आल्हादाची गोष्ट कीं आमचे राज्यकर्ते या नव्या जागृतीला ओळखून नव्या सोन्यासारख्या दिवसाची संधी साधण्याला शिकूं लागले आहेत. राजश्री मांटेग हे या नव्या संधीचे पुरस्कर्ते आहेत आणि लॉर्ड चेम्सफर्ड हे ही आपल्या कृतीला वेळीं कमी पडणार नाहींत असा आह्मांस भरंवसा वाटतो.

---

# वऱ्हाडवृत्त.

श्री टिळक यांची स्वारी भंडाऱ्याची जिल्हा परिषद संपवून आणि धामणगांवासच मुक्काम करून गेल्या शनिवारीं सकाळच्या गाडीनें मुंबईकडे रवाना झाली. वाटेंत वरणगांवास एक मुक्काम व्हावयाचा होता. एकंदरीनें वऱ्हाडचा व मध्यप्रांताचा दौरा द्रव्यदृष्टीनें पाहतां पूर्व कल्पनेच्या मर्यादे बाहेर फलदायी झाला ही आनंदाची गोष्ट होय. सुमारें १३६००० रुपये या दोन्ही प्रांतातून स्वराज्य संघाला वर्गणी ह्मणून मिळाले. त्यापैकीं वऱ्हाडनें जवळ जवळ ६० हजार रुपये दिलेले आहेत. राष्ट्रकार्यानिमित्त ही वर्गणी लोकांनीं दिली हें पवित्र कार्य होय. पण या एवढ्याः किंमतीला श्री टिळक यांच्या शिकवणीनें जी लोकामध्यें राष्ट्रजागृती झालेली आहे ती फारच मौल्यवान् आहे. ही नवी स्फूर्ती ह्मणजे राष्ट्राची नवी पावनीच होय.

विद्याखात्याला सात असिस्टंट इन्स्पेक्टर द्यावयाचा संकेत झाल्या अन्वयें त्यापैकीं ४ जागा मंजूर व्हावयाचा होत्या त्या यंदा नामदार चीफ कमिशनर साहेबांनीं मंजूर केल्या-अन्वयें येत्या एप्रिल पासून वऱ्हाडला दुसरा असिस्टट इन्स्पेक्टर देण्यांत येईल.

मांगाच्या मुली किंवा भावी दाया होण्यासारख्या असतील त्या मुलींना प्राथमिक शाळातून अनुक्रमें दरमहा १-२ व ३ रुपयांच्या शिष्यवृत्ती वयोमानाप्रमाणें देण्याचा स्थानिक सरकारचा विचार ठरला आहे. १९१५ पासून वऱ्हाडसाठीं ही पद्धत अंमलात आहे. ही दाया संबंधाची सरकारी काळजी विशेषशी परिणामकारक नाहीं. खरोखर स्त्रीशिक्षणाचा फैलावच विस्तृत प्रमाणावर झाला पाहिजे.

रा० रा० आगा महमद अक्रम डेप्युटी पुलीस सुपरिंटेंडेंट उमरावती यांची बदली एलिचपूर सबडिव्हिजनला करण्यांत आली.

आलिशान नामदार सर बेंजामिन रॉबर्टसन यांची स्वारी वाशीम, मंगरूळ, आकोला, आकोट तेल्हारा, शेगांव या भागांत फिरून आज प्रातःकाळीं बडनेऱ्याहून एलिचपुरास मोटारनें दाखल होईल. उद्या उमरावतीला परत येऊन बुधवारीं नागपुरास जाणार आहेत.

रा. रा. के. बी. आपटे असिस्टंट सर्जन हे यवतमाळास प्लेगाच्या देवी टोंचण्याच्या कामाकडे होते, तेथून त्यांची बदली आकोल्यास करण्यांत आली आहे.

प्लेग— १६ फेब्रुवारी अखेरपर्यंतच्या सप्तकांत उमरावती जिल्ह्याला १६४ प्लेगाचे मृत्यू झाले आणि आकोला ९१, बुलडाणा ३८ व यवतमाळ १ असे इतर जिल्ह्यांतील प्लेगाचे मृत्यू आहेत. सध्या पश्चिम वऱ्हाड प्लेगाच्या पीडेपासून अधिक शांत होत चालले आहे. या प्लेगाच्या उपत्तीची चिकित्सा सध्या अंदेवादांतच आहे.

वास्तुसमारंभः— आकोला सेंट्रलबँकेच्या नवीन दिवाणखान्याचा वास्तुसमारंभ गेल्या बुधवारीं सर बेंजामिन यांच्या हस्तें करविण्यांत आला. अशा समारंभांत जुन्या चालीरितीप्रमाणें जर कांहीं मंत्रोच्चार होत जातील, आणि त्यानंतर हा सरकारी संभाषणाचा शिष्टाचार अंमलांत येत जाईल तर तो उपक्रम लोकांना विशेष आवडेल. ही नवी इमारत ९००० रुपये खर्चून बांधलेली आहे आणि सर बेंजामिन यांच्या भाकिताप्रमाणें ही सेंट्रल बँक मोठी कार्यकारी, लोकांना सुखदायक व सहकारित्वाची दिशा दाखविणारी होवो!

---

## आकोला बाजार भाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९‍ ।[illegible] |
| सोनें | २७ ते २८ |
| चांदी | १-१॥ |
| तुरी | ४ ते ५॥ |
| मुग | ४॥ ते ५ |
| तांदूळ | ७ ते १० |
| तेल | ७ ते ८ |
| जवारी | ८५ ते १३६ |
| गहू काठे | ६ ते ७॥ |
| गहूं खांडवा पीवडा | ८॥ ते ९॥ |
| सरकी | ३० ते ३५ |
| कापूस | २२५ ते २३० |

---


## नोटीस

आकोला जेल करितां खालील माल खरेदी करणें आहे. ज्या व्यापाऱ्यांची अथवा शेतकऱ्यांची माल पुरविण्याची इच्छा असेल त्यांनीं आपल्या मालाचा नमुना व भाव यांची टेंडरे जेल सुपरिंटेंडेन्ट साहेब बहादुर आकोला यांचेकडे ता. १० मार्च १८ चे आंत पाठवावीत. ज्याचा माल व भाव पसंत पडेल तो घेतला जाईल.

जवारी ९००

तुरीची दाळ १००

अथवा तूर २०० मण

सही

**जॉर्ज डा सिल्व्हा**

जेल सुपरिंटेंडेन्ट, आकोला

नो० नं० ९०

---

## जाहिरात

आमची खालीं लिहिलेली मिळकत विक्रीस तयार आहे तीः———

१ घर पुलाजवळील महमदी प्रेसच्या बाजूचें.

२ ढोमणपुऱ्यांत बाबा वैंगे यांचे घराचे उत्तरेची हवेली.

३ शिवचरणबुवा यांचे समाधी जवळील चाळ.

गरजूंनीं खालील पत्यावर भेटावें.

सही

पंढरीनाथ रंगो तारे C/o अघोर ब्रदर्स अकोला

नो० नं० १००

# जाहिरात.

**मुर्तिजापूर ता. १ फेब्रुवारी १९१८**

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं म्युनिसिपाल कमिटी मुर्तिजापूर जि. अकोळा हिनें विचार केला आहे कीं १८८६ चा वऱ्हाड म्युनिसिपाल कायद्याचें कलम ११६ पोट कलम (१) बाब ई. जी. व तसेंच कलम ११६ पोट कलम (२) यांच्या अन्वयें मुर्तिजापूर म्युनिसिपाल्टीच्या हद्दींतील धर्मशाळा, गोषबाजार, भाजी बाजार, आणि कसाईखाना यांची देखरेख व योग्य व्यवस्था करण्यासाठीं आणि तसेच प्रेतें पुरण्याच्या व जाळण्याच्या स्थळांची पैर्वी आणि त्यांचा उपयोग व व्यवस्था या संबंधानें देखरेख करण्यासाठीं खालील नियम करण्यांत यावेत.

या नोटिशीच्या पहिल्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १ महिना लोटल्यानंतर हे सुचविलेले नियम पुढें विचारांत घेण्यांत येणार आहेत. तेव्हां या संबंधानें कांहीं हरकती किंवा नव्या सूचना कमिटीचे सेक्रेटरी यांच्याकडे वरील मुदत संपण्यापूर्वी धाडण्यांत आल्या पाहिजेत.

## नियम.

### भाग १ ला—सराई

१ मुनासिपल कमीटीच्या व्यवस्थेखालीं हल्लीं असलेल्या सार्वजनिक सराईचा यापुढें (सराई) या नांवानें निर्देश करण्यांत येईल. या सराईचा उपयोग जे वास्तवीक वाटसरु असतील त्यांनींच करावा.

२ सराईमध्यें कोणत्या ही उतारूला एक सारखा ७२ तासाहून अधिक काळ राहाण्याला परवानगी नाहीं. पण म्युनिसिपाल्टीच्या जबाबदार अधिकाऱ्याकडून अशी विशिष्ट परवानगी आणली तर मग हरकत नाहीं.

३ सराई लोकांच्या उपयोगाला देण्याची बंदी कमिटीला वाटल्यास ती कांहीं वेळ करील आणि सराईचा उपयोग कांहीं काळपर्यंत विशेष कार्याकडे करण्यांत येईल.

४ जो कोणी उपसर्गकारक रोगांनीं दूषित आहे, अथवा जो कोणी गैरवर्तन करील त्याला सराईच्या बाहेर म्युनिसिपाल्टीचा जबाबदार अधिकारी काढून देईल.

५ प्रत्येक सराईवर सॅनिटेशन सब कमिटीचे चेअरमन यांची देखरेख राहील आणि तिची योग्य सफाई व आरोग्य आणि तसेच या नियमांची योग्य अंमलबारी या बद्दलची मुख्यतः जबाबदारी चेअरमन साहेबाकडे राहील.

६ कोणत्याही सराईतील एक किंवा अनेक खोल्या शिष्ट उतारूंच्या सोईसाठीं राखून ठेवणें कमिटीला योग्य वाटल्यास निराळ्या राखून ठेवण्यांत येतील. आणि या मुद्दामच्या सोईसाठीं दररोज एका कोठडीमागें ४ आणे या दरानें आकारही वसूल करण्यांत येईल.

### भाग २ रा.—गोष बाजार.

१ गोषबाजाराचा उपयोग फक्त खालील पदार्थ विक्रीस मांडण्याकडे करण्यांत येईल:—

(१) कसाईखान्यांत मारलेल्या जनावराचें मांस, पण तें म्युनिसिपाल कमिटीचा जनावराचा वैद्य किंवा त्या कामीं नेमलेला दुसरा अधिकारी यानें पसंत केलेलें असलें पाहिजे.

(२) मच्छी ताजी व सुकी.

जे पदार्थ विक्रीसाठीं नाहींत ते गोष बाजारांत येऊं दिले जाणार नाहींत.

२ गोष बाजार सकाळीं ७ वाजल्यापासून रात्रीं ८ वाजेपर्यंत दररोज खुला राहील आणि या वरील वेळाशिवाय इतर वेळीं कोणतेंही दुकान तेथें खुलें ठेवण्यांत येणार नाहीं.

३ म्युनिसिपाल कमिटी वेळोवेळ दररोजचे, दरमहाचे किंवा वार्षिक भाडें ठरवील तें आगाऊ देऊन, आणि ज्या शर्ती वेळोवेळ ठरविण्यांत येतील त्या शर्तीवर गोषबाजारांतील जागा दुकान दारांस नेमून दिल्या जातील अशा नेमून दिलेल्या जागेंतच दुकानदारांनीं आपलीं दुकानें ठेवावीं आणि चबुत्रा किंवा इमारत गोष बाजारांत उभारण्याची त्यांना मनाई आहे.

४ रक्तपितीवाले, संसर्गजन्य किंवा उपसर्गकारक रोग असलेले आणि भिकारी यांना गोषबाजारांत येण्याची मनाई आहे. गैरवर्तन करणाराला मार्केटातून म्युनिसिपाल अधिकारी किंवा नोकर यांच्या करवी बाहेर हाकलून देण्यांत येईल.

५ गोष बाजारची देखरेख व व्यवस्था त्या कामीं म्युनिसिपल कमिटीनें नेमलेल्या म्युनिसिपाल अधिकाऱ्याकडे राहील. आणि तो अधिकारी मार्केटाचें आरोग्य व या नियमांची अंमलबारी यांच्याबद्दल जबाबदार राहील.

### भाग ३ रा.—भाजी बाजार.

१ भाजी बाजाराचा उपयोग खालील पदार्थ विक्रीस मांडण्याकडे फक्त करण्यांत येईल.

(अ) भाजीपाला ताजा अथवा सुका.

(ब) फळफळावळ व कंदमुळें ताजीं अथवा सुकी.

(क) केळींचीं व इतर पानें.

जे पदार्थ विक्रीसाठीं नाहींत ते या बाजारांत येऊं दिले जाणार नाहींत.

२ दुकानदारांना मार्केटांतील जागा नेमून देण्यांत येईल. त्याच्या आंतच त्यांनीं आपलीं दुकानें मांडलीं पाहिजेत. म्युनिसिपाल कमिटीच्या मंजुरातीशिवाय चबुत्रा किंवा इमारत उभारण्याची मनाई आहे.

३ भाजीबाजार पहाटेच्या ४ वाजल्यापासून रात्रीच्या ९ वाजेपर्यंत खुला राहील. या वेळा शिवाय इतर वेळीं कोणतेंही दुकान तेथें उघडें ठेवण्यांत येणार नाहीं.

४ रक्तपितीवाले, भिकारी आणि गैरवर्तन करतील त्यांस मार्केटांतून म्युनीसिपल अधिकारी किंवा नोकर यांच्या करवीं बाहेर हाकलून देण्यांत येईल.

५ भाजीबाजाराची देखरेख व व्यवस्था त्या कामीं म्युनिसिपाल कमिटीनें नेमलेल्या म्युनिसिपाल अधिकाऱ्याकडे राहील. आणि तो अधिकारी मार्केटाचें आरोग्य व अंमलबारी यांच्याबद्दल जबाबदार राहील.

### भाग ४ था—कसाईखाना.

१ हरएक कसाईखाना किंवा गुरें मारण्याची जागा या मधील योग्य त्या आरोग्यासंबंधाच्या योजना करण्यांत येतील आणि दररोज एकवेळ तरी तरी त्याची साफसूफी करण्यांत येईल.

२ कसाईखाने व गुरें मारण्याच्या जागा कमिटी वेळोवेळी जेवढे तास मुक्रर करील तेवढ्याच तासांत खुल्या राहातील आणि त्या वेळा शिवाय इतर वेळीं कोणतेंही जनावर तेथें मारण्यांत येणार नाहीं.

३ कोणतेंही रोगट जनावर या कसाईखान्यांत किंवा गुरें मारण्याच्या जागीं मारण्यांत येणार नाहीं. कसाईखान्यांत किंवा गुरें मारण्याच्या जागीं मारण्यासाठीं आणलेलीं जनावरें तपासण्यासाठीं जेथें अधिकारी नेमलेला आहे किंवा एकाद्या अधिकाऱ्याला अधिकार दिलेला आहे तेथें अशा अधिकाऱ्यानें पसंत केल्याशिवाय कोणतेंही जनावर मारण्यांत येणार नाहीं किंवा तसेच त्याचें मांस त्या अधिकाऱ्यानीं तपासून मनुष्यांच्या खाण्याला योग्य असें ठरविल्याशिवाय तेथून हलवितां येणार नाहीं.

४ मनुष्याच्या आहाराला योग्य ठरेल तर प्रत्येक मारलेल्या जनावराच्या मुड्यावर कमिटीनें त्याकामीं ठेवलेला शिक्का मारण्यांत येईल आणि कसाईखान्यांतून किंवा जनावर मारण्याच्या जागेंतून अशा प्रकारें शिक्का मारल्याखेरीज मुडदा तेथून हलविण्याची प्रत्येकाला मनाई आहे. जर मुडदा मनुष्याच्या आहाराला योग्य ठरणार नाहीं तर त्याचा नाश करण्यांत येईल.

५ कमिटी वेळोवेळ ठरवील ती फी प्रत्येक जनावरामागें आगाऊ भरल्या शिवाय कसाईखाना किंवा जनावरें मारण्याची जागा यांचा उपयोग कोणाला करतां येणार नाहीं.

६ जनावरें तपासण्यासाठीं कमिटीनें नेमलेला किंवा अधिकार दिलेला अधिकारी याला जर कोणी हरकत करील, किंवा अन्यतऱ्हेनें गैरवर्तन करील तर कसाईखान्याबाहेर किंवा गुरें मारण्याच्या जागेबाहेर हाकलून देण्याला तो पात्र होईल.

७ जीं जनावरें नापसंत केलीं जातील त्यांना कसाईखान्याच्या किंवा जनावरें मारण्याच्या जागे बाहेर लागलीच हाकलून देण्यांत येईल.

८ मारलेल्या जनावरांचीं कातडीं व आंतडीं कसाईखान्यांतून किंवा जनावरें मारण्याच्या जागेंतून बाहेर नेण्यापूर्वीं तीं चांगलीं आगाऊ स्वच्छ धुण्यांत आलीं पाहिजेत.

### भाग ५ वा

### प्रेतें पुरण्याच्या व जाळण्याच्या जागा

१ प्रेतें पुरण्याच्या प्रत्येक जागेंत, तेथें प्रेत आणणाऱ्या एक किंवा अनेक माणसांनीं खालील नियम पाळले पाहिजेत.

(१) पुरण्यासाठीं आणलेलें प्रेत फाजील वेळ न लावतां पुरण्यांत यावें.

(२) ६ फूट खोलीपेक्षां कमी खोलीच्या खड्ड्यांत प्रेत पुरतां कामा नये. पण २ वर्षें वयापेक्षां अधिक नाहीं अशा वयाच्या मुलाचें प्रेत ३ फूट खोलीहून कमी नाहीं अशा खड्यांत पुरण्याला हरकत नाहीं.

(३) प्रेत पुरण्यानंतर उकरलेली माती पुनः खड्यांत लागलीच भरून टाकली पाहिजे आणि तो खड्डा पूर्णपणें बुझविण्यांत आला पाहिजे.

(४) पूर्वींच्या १० वर्षांच्या कालांतले जर जुनें थडगें केलेलें असेल तर त्याच्यापासून २ फूटाच्या अंतराहून कमी अशा अंतरावर नवा खड्डा करून तेथें प्रेत पुरण्यांत येणार नाहीं.

२ प्रेत जाळण्याच्या जागीं जाळावयाला आणलेलें प्रेत, त्या प्रेता बरोबरचा एक किंवा अनेक इसमाकडून अधिक उशीर न करतां जाळण्यांत येईल आणि त्या एक किंवा अनेक इसमांचे प्रेताची पूर्णपणें राख होईल अशी व्यवस्था करणें हें कर्तव्य होय.

३ सार्वजनिक प्रेतें पुरण्याच्या व जाळण्याच्या हद्दींत कबर किंवा समाधी म्युनिसिपल कमीटीच्या आगाऊ परवानगी शिवाय उभारण्याची मनाई आहे.

४ प्रत्येक प्रेत पुरण्याची व जाळण्याची जागा त्या कामीं नेमलेल्या म्युनासिपल अधिकाऱ्याच्या देखरेखी खालीं व व्यवस्थेखालीं राहील आणि जाळण्याच्या जागेचें आरोग्य व या नियमांची अंमलबारी यांच्या संबंधाची मुख्य जबाबदारी त्याच्याचकडे राहील.

### भाग ६ वा—दंड

खालील नियमांचे जो कोणी उल्लंघन करील तो ५० रुपये पर्यंतच्या दंडाला पात्र होईल.

भाग १ ला यांतील नियम १ व २
भाग २ रा नियम १ ते ४
भाग ३ रा नियम १ ते ३
भाग ४ था सर्व नियम
भाग ५ वा नियम १ ते ३

(सही) **वा. मो. पंडित**
**सेक्रेटरी म्युनिसिपाल कमिटी**

नो० नं० ९०

**कागदी बादाम**

सर्वोत्तम ८१० गिरी जर्दालू ८५, जर्दालु ८४ कागदी अक्रोड ८३, गरी अक्रोट ८४, अंगुरी हिंग रु. २। आणि शाहजिरें १। रत्तल, सुरेख कस्तुरी रु. ३५, सुर्मा मर्मीरा, ३ पवित्र केशर १॥ आणि शुद्धशिलाजित ८५ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

नो. नं. १७

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.